Governor, Reserve Bank of India,

.....के क्षेत्रीय निदेशक के लिए
for Regional Director for.....

537 148

HDFC BANK

HDFC Bank Ltd.
Sandoz House, Dr. Annie
Worli, Mumbai 400 018.
Date: Phone : 49516 Fax 149

SUVARNAYUG SAHAKARI BANK LTD HEAD OFFICE PUNE-2

Date: 01/04/2002

SUVARNAYUG SAHAKARI BANK LTD
250 BUDHWAR PETH
GANPATI BHAVAN
PUNE 411 002

We hereby certify that SUVARNAYUG SAHAKARI BANK LTD is the registered proprietor of the undermentioned Central Government / State Government Loans/ Tbills held in the Constituent SGL Account maintained with FORT BRANCH as of close of business on Mar 31 2002

Account Type : Free Balance

Sr No.	Loan Code	Nomenclature of the Loan	Physical Balance	SGL Balance	Total balance of Face Value
1	80003	7.50% GOI 2010	0.00	50,000,000.00	50,000,00
2	81005	8.00% GOI 2011	0.00	50,000,000.00	50,000,00
3	01007	9.39% GOI 2011	0.00	50,000,000.00	50,000,00
4	82005	9.00% GOI 2013	0.00	30,000,000.00	30,000,00
5	02001	8.07% GOI 2017	0.00	100,000,000.00	100,000,00
6	01008	10.03% GOI 2019	0.00	50,000,000.00	50,000,00
7	01006	10.25% GOI 2021	0.00	50,000,000.00	50,000,00
			0.00	380,000,000.00	380,000,0

This is a computer generated stationary does not require the signature.

ADDITIONAL CHIEF JUDICIAL MAGISTRATE ESPLANADE, MUMBAI

296

539

सुवर्णयुग सहकारी बँक मर्या. पुणे

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८

अन्वये चौकशी अहवाल

प्रस्तावना:-

सुवर्णयुग सहकारी बँक मर्या. पुणे ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतूदीनुसार नोंदवलेली सहकारी संस्था असून, तिचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य आहे.(या पुढे तिचा उल्लेख सोयी करीता सुवर्णयुग बँक असा करण्यात येईल.)

मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी दि. २० मे २००२ रोजी आदेश पारीत करुन बँकेच्या झालेल्या रु. ५.६५ कोटी रुपयांच्या अर्थिक नुकसानीस बँकेच्या कोणकोणत्या व्यक्ती जबाबदार आहेत ? तसेच जबाबदार असणाऱ्या व्यक्तींकडून बँकेस झालेल्या नुकसानीची रक्कम व्याजासह वसूल करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी सुरुवातीस प्राधिकृत अधिकारी म्हणून श्री. ए.व्ही.गाडे, तत्कालीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१) पुणे यांची नियुक्ती केलेली होती. तदनंतर, सहकार आयुक्तालयाच्या दि. १५/०३/२००५ रोजीच्या आदेशान्वये श्री. ए.एल.घोलकर, तत्कालीन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१) पुणे यांची नियुक्ती केलेली होती. दि. ११/०७/२००७ रोजीच्या आदेशान्वये मा.सहकार आयुक्त व निबंधक ,सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य ,पुणे यांनी सदर चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून माझी नेमणूक केलेली आहे.

प्रस्तुत चौकशीचे कामी प्रधिकृत अधिकारी श्री. ए.व्ही.गाडे , श्री. ए.एल.घोलकर यांनी व मी पुढील नमुद अपचारी प्रवर्तक तसेच बॅकेचे प्राधिकृत अधिकारी यांची चौकशी केलेली आहे.

१) श्री .उल्हास नथोबा काळोखे
४०३, इंदीरा को ऑप हौसिंग सोसायटी,
सेनापती बापट रोड, पुणे ४११ ०१६.

२) श्री .उल्हास महादेव भट
फ्लॅट क्रं.३, २७/सी, बुधवार पेठ
जागेश्वरी मंदीराजवळ, पुणे ४११ ००२.

297

३) श्री .दिगंबर केशव रासने

१८९, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

४) श्री .शंकरराव शिवराम सुर्यवंशी

गुरुदत्ता छाया, फ्लॅट क्रं. सी १२

मेहुणपुरा, शनिवार पेठ पुणे ४११ ०३०.

५) श्री .वसंत डी.कोद्रे

२२३, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

६) श्री .अब्दुल [illegible] मज्जिद

१/३४, शास्त्री अपार्टमेंट, कॅम्प ,पुणे ४११ ००१.

७) श्री .रामचंद्र एस. सुर्यवंशी

फ्लॅट क्रं.६, माणिकप्रभु नगरी गृहरचना संस्था,

अ विंग, पहिला मजला, २९० शनिवार पेठ ,पुणे ४११ ०३०.

८) श्री .लक्ष्मीकांत आर. जाडे

५९१, बी रास्ता पेठ, मौर्य चेम्बर्स, ताराचंद हॉस्पिटल

पुणे ४११ ०११.

९) श्री .गजानन डी.गांजवे

लक्ष्मी नारायण नगर, बिल्डिंग क्रं.८/बी,

फ्लॅट क्रं. १५ , एरंडवणा, पुणे ४११ ००४.

१०) श्री. विजयकुमार सुदाम वांबुरे

१५३, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

११) श्री .विलास दत्तात्रय भुजबळ

४६, मुकंदनगर, पुणे ४११ ०३७.

१२) श्री. निवृत्ती बी.पोफळे

ज्युतिका आपार्टमेंट, फ्लॅट क्रं.९, साई मंदीराजवळ,

भांगरवाडी, लोणावळा ,४१०४०१.

ADDITIONAL CHIEF JUDICIAL MAGISTRATE ESPLANADE, MUMBAI

अधिकृत अधिकारी

298

१३) श्री .अशोक प्रतापराव गोडसे

२३३, बुधवार पेठ ,पुणे ४११ ००२.

१४) श्री .माणिक बी. चव्हाण

२२२, बुधवार पेठ पुणे ४११ ००२.

१५) सौ.उज्वला एस.सुर्यवंशी

फ्लॅट क्रं.६, माणिकप्रभु नगरी गृहरचना संस्था,

अ विंग, पहीला मजला, २९० ब शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०.

१६) सौ.शर्मिला एस.भोसले

पुजापार्क, बी बिल्डींग, फ्लॅट क्रं.४ व ५

चिंतामणी हॉटेल समोर, बिबवेवाडी, पुणे ४११ ००२.

१७) श्री .बाळकृष्ण व्ही.रायकर

९७, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.

१८) श्री .अरुण पी. शिंदे

वसंतबाग, फ्लॅट क्रं.४४ ,बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

१९) श्री .सुरेश एस.काळे ,तंत्कालीन सरव्यवस्थापक

४०३,युगाय अपार्टमेंट,प्लॉट नं.१७,

एरंडवणा को-ऑप.हौसिंग सोसायटी,पटवर्धन बाग, पुणे ४११ ००४.

यापुढे उपरोक्त नमुद या अपचारी प्रवर्तकांना त्यांच्या समोर नमुद केलेल्या क्रमांकासह संबोधण्यात येईल.

श्री. ए.व्ही. गाडे यांनी सुवर्णयुग बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री .उल्हास नथोबा काळोखे , तत्कालीन उपाध्यक्ष श्री .उल्हास महादेव भट, तत्कालीन संचालक श्री. दिगंबर केशव रासने, श्री. शंकरराव शिवराम सुर्यवंशी. श्री .वसंत डी.कोद्रे, श्री .अब्दुल के.के.मज्जिद, श्री. रामचंद्र एस. सुर्यवंशी , श्री. लक्ष्मीकांत आर. जाडे , श्री .गजानन डी.गांजवे , श्री .विजयकुमार सुदाम वांबुरे , श्री. विलास दत्तात्रय भुजबळ, श्री. निवृत्ती बी.पोफळे, श्री.अशोक प्रतापराव गोडसे , श्री.माणिक बी. चव्हाण, सौ.उज्वला एस.सुर्यवंशी, सौ.शर्मिला एस.भोसले, श्री बाळकृष्ण व्ही.रायकर, श्री .अरुण पी. शिंदे व सरव्यवस्थापक श्री .सुरेश एस.काळे यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम

सहकारी बँक मर्यादित पुणे
प्राधिकृत अधिकारी

297

(545)

७२(२) अन्वये दि. ३१/५/२००२ रोजी नोटीस पाठविलेली होती. सदर नोटीशीस श्री .उल्हास नथोबा काळोखे , श्री. उल्हास महादेव भट, श्री. दिगंबर केशव रासने, श्री. शंकरराव शिवराम सुर्यवंशी. श्री .वसंत डी.कोद्रे, श्री .अब्दुल के.के.मज्जिद, श्री .रामचंद्र एस. सुर्यवंशी , श्री. लक्ष्मीकांत आर. जाडे , श्री .गजानन डी. .गांजवे,श्री. विजयकुमार सुदाम वांबुरे , श्री. विलास दत्तात्रय भुजबळ, श्री. निवृत्ती बी.पोफळे, श्री .अशोक प्रतापराव गोडसे , श्री .माणिक बी. चव्हाण, सौ.उज्वला एस.सुर्यवशी, सौ.शर्मिला एस.भोसले, श्री .बाळकृष्ण व्ही.रायकर, श्री .अरुण पी. शिंदे व सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी उत्तर दाखल केलेले होते .त्यावर सदरचे म्हणणे विचारात घेऊन बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. उल्हास नथोबा काळोखे ,उपाध्यक्ष श्री .उल्हास महादेव भट, तत्कालीन संचालक मंडळ सदस्य श्री .दिगंबर केशव रासने, श्री. शंकरराव शिवराम सुर्यवंशी. श्री .वसंत डी.कोद्रे, श्री. अब्दुल के.के.मज्जिद, श्री. रामचंद्र एस. सुर्यवंशी , श्री .लक्ष्मीकांत आर. जाडे , श्री .गजानन डी.गांजवे, श्री .विजयकुमार सुदाम वांबुरे , श्री. विलास दत्तात्रय भुजबळ, श्री. निवृत्ती बी.पोफळे, श्री .अशोक प्रतापराव गोडसे , श्री. माणिक बी. चव्हाण, सौ.उज्वला एस.सुर्यवशी, सौ.शर्मिला एस.भोसले, श्री. बाळकृष्ण व्ही.रायकर, श्री .अरुण पी. शिंदे व तत्कालीन सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६१ चे नियम ७२(३) अन्वये आरोप पत्र निश्चित करुन ते दि. ८/३/२००३रोजी बजावण्यात आलेले होते. सदर आरोप पत्रावर बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. उल्हास काळोखे यांनी त्यांच्या म्हणण्याच्या पृष्ठर्थ दि. ८/१/२००४ व दि.६/१/२००६ रोजी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री. उल्हास महादेव भट, तत्कालीन संचालक श्री. दिगंबर केशव रासने,श्री.वसंत डी.कोद्रे, श्री.अब्दुल के.के.मज्जिद, श्री .रामचंद्र एस. सुर्यवंशी , श्री .लक्ष्मीकांत आर. जाडे , श्री .गजानन डी.गांजवे, श्री. विजयकुमार सुदाम वांबुरे , श्री .विलास दत्तात्रय भुजबळ, श्री. निवृत्ती बी.पोफळे, श्री.अशोक प्रतापराव गोडसे , श्री.माणिक बी. चव्हाण, सौ.उज्वला एस.सुर्यवशी, सौ.शर्मिला एस.भोसले, श्री बाळकृष्ण व्ही.रायकर, श्री अरुण पी. शिंदे या सर्वांनी त्यांच्यावतीने सदर चौकशीकामी कामकाज पाहणे,त्यांचे प्रतिनिधित्व करणे,प्रतिज्ञापत्र करणे वगैरे कामासाठी त्यांच्यापैकी एक संचालक श्री. शंकरराव सुर्यवंशी यांना दि.७/०१/२००६ रोजी कुलमुखत्यार म्हणुन नेमलेले आहे. श्री. शंकरराव सुर्यवंशी व इतर संचालक यांनी दि.७/०१/२००६ रोजी प्रतिज्ञापत्र करुन ते या चौकशीकामी दाखल केलेले आहे. सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी त्यांना बजावलेल्या आरोपपत्रावर प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही. बँकेचे अधिकारी श्री. सुनिल बारी यांनी बँकेच्या वतीने पुराव्याचे पृष्ठर्थ पतिज्ञापत्र संबंधीत कागदपत्रासह प्राधिकृत अधिकारी यांचे समोर दाखल केलेले आहे.श्री.गाडे व श्री.घोलकर यांचेसमोर सुवर्णयुग बँक व अपचारी प्रवर्तक क्र.१ते १९ यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन, श्री.गाडे व श्री.घोलकर यांनी केलेल्या चौकशी चे पुढील कामकाज चालु करण्यात आले.

[४]

300

(5,7)

तत्कालीन अधिकारी श्री. गाडे यांनी सरतपास पुर्ण करुन उलटतपासाचे कामकाज सुरु केले होते. तत्कालीन प्राधिकृत अधिकारी श्री.घोलकर यांचे समोर बँकेचे अधिकारी श्री. सुनिल बारी यांनी साक्ष दिलेली आहे. श्री. सुनिल बारी यांची उलटतपासणी श्री.उल्हास काळोखे यांचे वकील ॲड. क्षीरसागर व सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे वकील ॲड. एस.व्ही.कानेटकर यांनी घेतलेली आहे. श्री. काळोखे यांची बँकेतर्फे उलटतपासणी ॲड. खुर्जेकर यांनी घेतलेली आहे. मात्र श्री.काळोखे यांची उलटतपासणी संचालक मंडळ यांनी प्रथम घ्यावी कि सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे प्रथम घ्यावी ?यावर मुद्दा उपस्थित झाल्यावर प्राधिकृत अधिक्कारी श्री. घोलकर यांनी "श्री.काळोखे यांची उलटतपासणी सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी प्रथम घ्यावी व त्यानंतर उर्वरीत १ते १६ संचालक उलटतपासणी घेतील" असा निर्णय दिनांक १५/१२/२००६ रोजी दिल्याने सदर निर्णयावर नाराज होऊन सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी या उलटतपासणीच्या पद्धतीवर मा.विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था,पुणे यांचेकडे पुनरिक्षण अर्ज क्र. ४१६/२००६ दाखल केला होता. त्यावर दि. १८/१२/२००६ रोजी मा.विभागीय सहनिबंधक ,सहकारी संस्था,पुणे यांनी सदर चौकशीच्या कामकाजास पुढील आदेश होईपर्यंत स्थगिती दिलेली होती. सदरची स्थगिती मा.विभागीय, सहनिबंधक सहकारी संस्था, पुणे यांनी त्यांचे दि. २२/०६/२००७ रोजीच्या आदेशान्वये उठविली .त्या आदेशाविरुध्द सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्रं.५२२७/२००७ दाखल केलेली होती. मा.उच्च न्यायालयाने मुंबई यांनी "माजी अध्यक्ष श्री.उल्हास काळोखे यांची उलटतपासणी प्रथम माजी संचालकांनी घ्यावी व त्यानंतर याचिकाकर्ता श्री.काळे यांनी घ्यावी" असे दि. २८/०१/२०१० रोजी आदेश पारीत केलेले आहेत.त्यानुसार, सदरच्या आदेशास अनुसरुन अपचारी प्रवर्तकांना दि. ०६/०४/२०१० रोजी रजिस्टर्ड पोस्टाने नोटीसा पाठवून दि. २७/०४/२०१० रोजी माझ ेसमोर उलटतपासणी साठी हजर राहणेसाठी कळविण्यात आले. संचालका पैकी श्री. निवृत्ती पोफळे, श्री.वसंत कोद्रे यांना पाठविलेली नोटीस सदरील "व्यक्ती मयत" अशा पोस्टाच्या शेऱ्याने परत आल्याने कै. निवृत्ती पोफळे यांचे वारस श्री.विवेक निवृत्ती पोफळे व कै.वसंत कोद्रे यांचे वारस श्री. सागर कोद्रे, श्री. अमर कोद्रे यांना नोटीसा पाठविण्यात आल्या व त्याच बरोबर बँकेचे वकील यांनी दि. १०/१२/२०१० रोजी दिलेल्या पुरशीसेस अनुसरुन कै. दिगंबर केशव रासने यांचे वारस श्री.सुनिल दिगंबर रासने यांना १३/१२/२०१० रोजी नोटीस पाठविण्यात आली. तद्नंतर मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशास अनुसरुन उलटतपासणीचे कामकाज पुढे चालू करण्यात आले.

सुवर्णयुग बँकेच्या वतीने ॲड.एस.बी.खुर्जेकर, तत्कालीन अध्यक्ष श्री.उल्हास काळोखे यांच्या वतीने ॲड. एस.व्ही.क्षीरसागर, उपाध्यक्ष श्री.उल्हास भट, संचालक मंडळ व श्री.अमर वसंतराव कोंद्रे, व श्री.सुनील रासने यांच्यावतीने ॲड. नांगरे तर बँकेचे तत्कालीन सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांचे वतीने ॲड. एस.व्ही.कानेटकर यांनी उपस्थित राहून बाजु मांडली आहे.श्री.विवेक निवृत्ती पोफळे यांना सुनावणीची नोटिस मिळूनही उपस्थीत राहीले नाहीत.

[५]

301

श्री.उल्हास काळोखे यांची उलटतपासणी संचालकांच्या वतीने ॲड.नांगरे यांनी तर सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे यांचे वकील ॲड.एस.व्ही. कानेटकर यांनी माझे समोर घेतलेली आहे. तद्नंतर बँकेच्या इतर संचालकांनी श्री.शंकरराव सुर्यवंशी याचे नावाने कुलमुखत्यार पत्र केलेले असल्याने व या संचालकांनी चौकशीच्या वेळी सांगीतल्यामुळे श्री. शंकरराव सुर्यवंशी यांची उलटतपासणी श्री.काळोखे यांचे वकील ॲड. एस.व्ही.क्षीरसागर यांनी तर सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांचे वकील ॲड. एस.व्ही. कानेटकर यांनी माझे समोर घेतलेली आहे. बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री.उल्हास भट यांची उलटतपासणी घ्यावयाची नाही, असे ॲड. एस.व्ही.क्षीरसागर यांनी पुरशिस दाखल केली. तद्नंतर ॲड. एस.व्ही.कानेटकर यांनी बँकेचे तत्कालीन उपाध्यक्ष श्री.उल्हास भट यांची उलटतपासणी घेतली.

चौकशीवेळी उलटतपास पुर्ण झाल्यावर प्रस्तुत चौकशी कामी कोणा अपचाऱ्यांस अजुन साक्षीदार दयावयाचा असेल तर तो दि. २७/०२/२०१३ पर्यंत देण्यात यावा असे दि. २२/०२/२०१३ रोजी चौकशीच्या वेळी सांगण्यात आले होते. त्यावर ॲड.एस.व्ही.क्षीरसागर यांनी आम्हास कोणताही तोंडी वा लेखी अतिरिक्त पुरावा दयावयाचा नाही अशी पुरशीस दि.२६/०२/२०१३रोजी दाखल केली आहे . पुरावा द्यावयाचा नाही,अशी पुरसीस श्री.सुरेश काळे दि.१/०३/२०१३ रोजी यांनी दाखल केली आहे.

बँकेचे प्राधिकृत अधिकारी श्री. सुनिल बारी यांनी तसेच अपचारी क्र.१ ते १८ यांनी त्याचे म्हणण्यापष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेली आहेत.

बँकेचे प्राधिकृत अधिकारी श्री. सुनिल बारी यांनी सादर केलले प्रतिज्ञापत्र :-

सदर प्रतिज्ञापत्रात असे नमूद केले आहे की, " मी बँकेचा एक कर्मचारी असून मी सन २००१-०२ या कालावधीत अकौंटंट म्हणून कामकाज पहात होतो. याच कालावधीत विषयांकित सहकारी रोख्यांबाबत व्यवहार झालेला आहे. सदरच्या कालावधीसाठी झालेले सरकारी रोखे खरेदीबाबतचा व्यवहार मला माहिती आहे. बँकेचे कामकाज हे बँर्कीग रेगुलेशन ॲक्ट १९४९, १९६० चा सहकार कायदा, रिझर्व बँक ऑफ इंडियाने तसेस सहकार विभागाने जारी केलेली परिपत्रके तसेच बँकेच्या पोटनियमाप्रमाणे चालू आहेत. सन २००१-०२ या कालावधीत सरकारी रोख्यासंबंधी जे व्यवहार झाले व सदर व्यवहारात बँकेचे जे नुकसान झाले त्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी ही चौकशी आहे याची मला माहिती आहे. सदरची चौकशी ही दि. १०.०५.२००२ रोजीच्या जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे यांचा तपासणी अहवाल व विशेष लेखापरिक्षक यांचा दि. १०.०५.२००२ रोजीचा तपासणी अहवाल, सन १९९९-२०००,

[6]

(55)

२०००-०१ व २००१-०२ वैधानिक लेखापरिक्षण अहवाल तसेच २००१-०२ चा बँकेचा गुंतवणूकीचा लेखापरिक्षण अहवाल यावर आधारलेली आहे. मा. सहकार आयुक्त यांचे दि. २०.०५.२००२ च्या आदेशास अनुसरुन प्राधिकृत अधिकारी यांनी संचालक मंडळ , तत्कालीन सरव्यवस्थापक या अपचाऱ्यांना नोटीस बजावलेली होती. सदर नोटीशीवर त्यांनी उत्तरही दाखल केलेले आहे. मात्र प्राधिकृत अधिकारी यांचे त्यांवर समाधान न झाल्याने त्यांनी या सर्वांवर महाराष्ट्र साहकारी संस्था नियमाप्रमाणे आरोपपत्र बजावलेले आहे. मी त्याबाबतचा तपासणी अहवाल, लेखापरिक्षण अहवालातील सरकारी रोखे गुंतवणूकीबाबतचा उल्लेख असलेला भाग, तसेच नोटीस व आरोपपत्र वाचलेले आहे. बँकेने सरकारी रोखे खरेदीबाबत काही गुंतवणूक केलेली होती .बँकेच्या कागदपत्रांच्याआधारे मी पुढे सांगतो की, मागील काही वर्षापासून बँक सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करीत आहे. मी ज्यावेळी अकौंटंट म्हणून कामकाज पहात होतो त्यावेळी बँकेकडे जी सरकारी रोख्यांमध्ये गुतवणूक होत होती त्याबाबतचे व्यवहार मला माहित झाले.सदरचे व्यवहार हे बँकेच तत्कालीन अध्यक्ष व सरव्यवस्थापक पहात असत.सरकारी रोख्यांची खरेदी ही दोन स्वरुपात करायची असते याची मला माहिती आहे. काही गुंतवणूकी या दलांलाशी कॉन्ट्रक्ट नोटस् केल्यावरच सबसिडीअरी जनरल लेजर (एसजीएल) मोडमध्ये करावयाची असतात व त्या नंतर या गुंतवणूकीचे पैसे दलाल यांना द्यावयाचे . ज्यावेळी एसजी एल मोडमध्ये असे रोखे खरेदी केले जातात ते किंमतीचे रोखे मिळाल्यावरच बँकेकडून त्याच्या रकमा अदा केल्या जातात. मात्र दलाल हे रोखे खरेदी करत व त्या फिजीकल मोडमध्ये रोखे बँकेस दिले जात. तदनंतर, बँकेने कॉन्ट्रक्ट नोटस मिळत व तद्नंतर त्या कॉन्ट्रक्ट नोटस आधारे रकमा अदा केल्या जात. बँकेने किती टक्यापर्यंत गुंतवणूक करावयाची याबाबत काही निर्बंध आहेत. माझ्या माहितीप्रमाणे एनडीटी एल च्या १२.५ टक्के इतकी रक्कम बँकेस गुंतवणूक करणे आवश्यक आहे. याबाबत रिझर्व बँकेचे देखील परिपत्रक आहे. बँकेने सन २००१-०२ या आर्थिक वर्षातदेखील एनडीटीएल च्या आधारेच गुंतवणूक केली आहे. मी असे म्हणेन की, दि. ३१/०३/२००२ रोजी बँकचे एन डी टी एल रुपये २०४.६८ कोटी इतके होते. रिझर्व बँकेच्या दि. २२/१०/२००१ च्या परिपत्रकाप्रमाणे १२.५ टक्के इतक्या रकमेची गुंतवणूक करणे कायदेशीर होते त्यानुसार सदरची रक्कम २५.५० कोटी इतकी येते. बँकेकडील उपलब्ध रेकॉर्डवरुन असे दिसून येते की, बँकने रुपये ४५, २१,८७ ०००/- (रुपये पंचेचाळीस कोटी एकवीस लाख सत्यांऐंशी हजार) इतकी रक्कम बँकेने सन २००१-०२ मध्ये सरकारी रोख्यांच्या खरेदीविक्रीमध्ये रु.२४७.२४ कोटी इतक्या रकमेचा व्यवहार केला आहे. बँकेने एचडीएफसी बँकेमध्ये एसजीएल खाते उघडलेले आहे. त्याबाबतचा खातेउतारादेखील मी सादर केला आहे. त्या खातेउताऱ्याच्या आधारेच लेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण अहवाल व तपासणी अधिकारी यांनी तपासणी अहवाल केलेला आहे. सरकारी रोख्यांमध्ये दलांलामार्फत बँक गुंतवणूक करीत होते. संचालक मंडळाने अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना अशा सरकारी रोख्यांमधील गुंतवणूकीबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले होते व त्यानुसार तत्कालीन अध्यक्ष व

अधिकृत अधिकारी

303

सरव्यवस्थापक निर्णय घेत असत . त्या ठरावांच्या प्रतीदेखील सादर करणेत आलेल्याआहेत. दि. ३०.४.२००१ , ३०.०६.२००१ , ०५.०९.२००१, २४.०१.२००१ , ११.०२.२००२, ०५.०३.२००२, ११.०३.२००२, २६.०३.२००२, ६.०४.२००२, २२.०४.२००२, २६.०४.२००२ या संचालक मंडळ सभांचे इतिवृत्त मी पाहिलेले आहे. तसेच नागरी सहकारी बँकानी सरकारी रोख्यांमध्ये करावयाच्या गुंतवणूकीबाबतची रिझर्व बँकेने दि. १९.४.२००१ , ०९.०८.२००१, २२.१०.२००१ रोजी परिपत्रके जारी केलेली आहेत व सदरची परिपत्रके नागरी बँकांवर लागू आहेत. दि. १९.०४.२००१ , ०९.०८.२००१ रोजी जारी करण्यांत आलेली परिपत्रकेही नागरी सहकारी बँकांनी करावयाच्या गुंतवणूकीसंबंधी आहेत व सदरच्या परिपत्रकामध्ये असे नमूद आहे की, गुंतवणूकी एसजीएल मोडमध्ये कराव्यात. कॉन्ट्रक्ट नोटस झाल्यानंतर एसजीएल मोडमध्ये गुंतवणूक केली जात असे. बँकेला या व्यवहारातून नफा मिळत असल्यामुळे बँकही हा व्यवसाय करीत होती. बँकेचे संचालक मंडळाने दि. ३०.०४.२००१ रोजी ठराव पारित करुन अशा गुंतवणूकीबाबतचे निर्णय घेण्यासाठी अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना प्राधिकृत केलेले आहे. त्याचबरोबर सदरचे निर्णय संचालक मंडळाच्या बैठकांमध्ये मान्यतेसाठी ठेवण्यांत यावेत असाही ठराव करण्यात आलेला आहे. संचालक मंडळाच्या ठरावामध्ये सदरच्या गुंतवणूका या फिजीकल किंवा एसजीएल मध्ये कराव्यात अशीही नोंद संचालक मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तांत करण्यांत आलेली आहे. दि. ३१.०३.२००२ रोजी बँकेचे एनडीटीएल रु. २०४.३८ कोटी इतके होते. दि. २२.१०.२००१ रोजीच्या आर बी आय च्या परिपत्रकाप्रमाणे एनडीटीएल च्या १२.५ % इतकी रक्कम रु.२५.५० कोटी इतकी होती. सदर परिपत्रकाप्रमाणे कमीत कमी १२.५ टक्के ही रक्कम किमान गुंतवणूक करावयाची होती. उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे मी असेही सांगतो, की कॉन्ट्रक्ट नोटस एचडीएफसी बँकेमध्ये असलेले बँकेचे खाते व कॅशबुक व लेजरमध्ये असलेल्या नोंदी यावरुन असे दिसून येते की, बँकेने रु. ४५.२१ कोटी इतक्या रकमेची गुंतवणूक सरकारी रोख्यामध्ये केलेली होती. बँकेने मे. होम ट्रेड मार्फत सरकारी रोख्यांमध्ये गुंतवणूक केलेली होती. बँकेने कॉन्ट्रक्ट नोटस करुन देखील बँकेला रु. ५.६५ कोटी इतक्या रकमेची सरकारी रोखेची डीलीव्हरी मे. होम ट्रेड लि. यांचेकडून मिळालेले नव्हते. त्यामुळे बँकेचे एवढया रकमेचे बँकेचे नुकसान झालेले आहे. ज्यावेळेस होम ट्रेड लि. यांचेशी बँकेने व्यवहार केला त्यावेळेस कॉन्ट्रक्ट नोटस केलेल्या आहेत त्याच्या प्रती बँकेने सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये आहेत. जर बँकेस रु. ५.६५ कोटी इतक्या रकमेचे सरकारी रोखे होम ट्रेड कडून मिळाले असते तर बँकेचे नुकसान झाले नसते. ब्रोकर यांना रक्कम अदा केल्यानंतर एक ते दोन आठवडयाच्या आत सदरचे रोखे मिळावयासच हवे होते मात्र सदरचे रोखे प्राप्त न झाल्याने बँकेस इतक्या रकमेचे नुकसान झालेले आहे व सदरची वसुली निश्चित करु येवू शकेल, बँकेने या चौकशीकामी लेखापरिक्षण अहवाल, तपासणी अहवाल, इतिवृत्तांची प्रत, कॉन्ट्रक्ट नोटस, अंतर्गत लेखापरिक्षण अहवाल, रिझर्व बँकेचे परिपत्रके, पोटनियम यांच्या प्रती सादर केलेल्या आहेत त्या खऱ्या आहेत. सदरचे रोखे होम ट्रेड यांचेकडून प्राप्त न

अधिकृत अधिकारी

304

झाल्याने बँकेने सदरची बाब रिझर्व बँक ऑफ इंडिया व सहकार खाते यांना कळविलेली होती .तसेच दिवाणी न्यायालय दावा दाखल केलेला होता. बँकेने याबाबतची फौजदारी तक्रार देखील दाखल केलेली आहे. बँकेस लवादाचा निर्णयही प्राप्त झालेला आहे. बँकेस सदरच्या रु. ५.६५ कोटी इतक्या रकमेची वसूली करण्यांत यश न मिळाल्यामुळे सदरचे रकमेचे नुकसान झालेले आहे. कॉन्ट्रक्ट नोटस तसेच मूळ इतिवृत्त हे पोलीसांनी फौजदारी कारवाई कामी जप्त केलेली आहे. मात्र दाखल केलेल्या प्रती या मूळ कागदपत्रांच्या प्रती आहेत. रु. ५.६५ कोटी इतक्या रकमेच्या व्यवहारासाठीच्या मे. होम ट्रेड लि. यांच्याबरोबर केलेल्या कॉन्ट्रक्ट नोटस याच्या प्रतीही दाखल केलेल्या आहेत. "

अपचारी प्रवर्तक क्र.१ बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. काळोखे यांची दि. ०८.०१.२००४ व ७/१/२००६रोजीची प्रतिज्ञापत्रे :-

दि. ०८.०१.२००४ रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात असे नमदू केले आहे की, "श्री. सुनिल बारी यांनी दि. २०.१२.२००३ रोजी जे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे ते कायदेशीर नसून चुकीचे आहे व त्यामधील मजकूर पूर्णत: मान्य नसून त्यातील काही भाग मान्य आहे. श्री. बारी यांनी दाखल केलेले सदरचे प्रतिज्ञापत्रामध्ये गुणवत्तेचा अभाव आहे. सदरचे प्रतिज्ञापत्र हे मोघम स्वरुपाचे आहे. त्यामधील संदर्भ हे जाणीवपूर्वक चुकीचे नमूद केलेले आहे अथवा नमूद केलेले नाहीत. श्री.बारी यांच्या प्रतिज्ञापत्रावरुन असे दिसून येते की, श्री. बारी हे इतर संचालक व बँकेचे अधिकारी यांनी केलेल्या कृत्याकडे जाणिवपूर्वक डोळेझाक करीत आहेत व सदरच्या प्रतिज्ञापत्रामध्ये माझी काहीही चूक नसताना मला बळीचा बकरा बनविण्यांत येत आहे. सदरच्या प्रतिज्ञापत्रामध्ये श्री. बारी यांना बँकेने प्राधिकृत केले आहे किंवा नाही याबाबत नमूद केलेले नाही. त्याबाबतचा ठरावाची प्रतही मला दिलेली नाही. श्री.बारी यांनी सदरच्या प्रतिज्ञापत्रांमध्ये असे कोठेही नमूद केले नाही की, सदरच्या प्रतिज्ञापत्रातील मजकूर हा त्यांना माहिती असलेल्या माहितीनुसार दिलेला आहे. श्री.बारी यांनी जे दि. २०.१२.२००३ रोजी प्रतिज्ञापत्र दिलेले आहे ते करताना श्री.बारी यांनी कोणत्या कागदपत्रांचा आधार घेतलेला आहे त्यांचा उल्लेख केलेला नाही किंवा दुरान्वये उल्लेख केलेला आहे सबब सदरचे प्रतिज्ञापत्र निष्फळ ठरते. श्री. बारी यांनी संदर्भीय इतिवृत्त नोंदवही सादर केलेली नाही. त्याचबरोबर संचालक मंडळाने जो काही तथाकथीत ठराव पारित केलेला आहे .त्याच्या प्रतीही सादर केलेल्या नाहीत. त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये परिच्छेद क्र. ६ मध्ये ज्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाचा व तपासणी अहवालाचा उल्लेख केलेला आहे तो देखील सादर केलला नाही. श्री. बारी यांनी या चौकशीचा विषय असलेल्या व्यवहाराबाबतचा जो संचालक मंडळाने ठराव केलेला आहे तो त्याबाबतची कोणतीही कागदपत्रे अथवा नोंदी सादर केलेल्या नाहीत. श्री. बारी यांनी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रांतील सर्व तपशिल मी नाकारत आहे. तसेच मी जे लेखी म्हणणे सादर केलेला आहे तोही या प्रतिज्ञापत्राचा एक भाग समजण्यात यावा. श्री. बारी

(557)

यांच्या प्रतिज्ञापत्रासोबत रिझर्व बँकेच्या परिपत्रक जोडलेले नाही. श्री. बारी हे सन २००१-०२ मध्ये बँकेत अकौंटंट म्हणून कामकाज पहात होते. सदरच्या तथाकथित व्यवहाराची त्यांना असलेली माहिती त्यांनी सादर केलेली नाही. त्यांच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र. ८मध्ये काही गुंतवणूक असा उल्लेख केलेला आहे .मात्र अशा गुंतवणूकीचा तपशिल दिलेला नाही .मात्र त्याच परिच्छेदामध्ये त्यांनी उपरोक्त कागदपत्रांच्या आधारे माहिती देत आहे असे नमूद केलेले आहे . मात्र त्याबाबतचे कोणतेही कागदपत्रे चौकशी अधिकारी यांचेसमोर सादर केलेली नाही. परिच्छेद क्र. ९ मध्ये त्यांनी बँकेने केलेल्या गुंतवणूकीबाबतची विस्तृत माहिती दिलेली नाही .तसेच सदरच्या गुंतवणूकीबाबतची व्यवहाराची माहिती त्यांना कोठून मिळाली ? याबाबत त्यांनी नमूद केलेले नाही. बँकेचे अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांनी सदरचे व्यवहार कशा रितीने पहात होते ,याबाबत नमूद केलेले नाही.त्याचबरोबर त्यांच्या या म्हणण्या पृष्ठर्थ कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. परिच्छेद क्र. ९ मध्ये नमूद केलेली बाब ही प्रथम निदर्शनास आणली आहे .मात्र ती कशाच्या आधारे सांगत आहेत, याबाबत ते सांगत नाही हे आश्चर्यजनक आहे. मात्र परिच्छेद क्र.९ मध्ये नमूद केलेली बाब नाकारण्यात येत आहे. एसजीएल अकौटं हे कोणी उघडले? हे श्री. बारी यांनी त्यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये परिच्छेद क्र. ११ मध्ये कोठेही नमूद केले नाही. श्री. बारी यांनी कशाच्या आधारे हे प्रतिज्ञापत्र केलेले आहे? त्याबाबची कोणतीही कागदपत्रे सादर केलेली नाहीत. श्री. बारी यांनी परिच्छेद क्र. १२ मध्ये बँकेने केलेल्या प्रगतीबाबत विस्तृतपणे काहीही नमूद केलेले नाही.सदरच्या परिच्छेदामध्ये श्री.बारी यांनी "अध्यक्ष व सरव्यवस्थापक श्री.काळे हे निर्णय घेत असत " ,असे नमूद केलेले आहे.मात्र सदरचा म्हणण्यापृष्ठर्थ त्यांनी एकही कागद सादर केलेला नाही.श्री. बारी यांनी दि. ३०/०४/२००१ च्या संचालक मंडळ ठरावाचा उल्लेख केलेला आहे मात्र त्याबाबत विस्तृतपणे नमूद केलेले नाही. श्री. बारी यांनी मे. होम ट्रेड यांचेसोबत जो तथाकथीत व्यवहार झालेला आहे त्याबाबत त्यांनी कशी माहिती मिळाली? याबाबतचा कोठेही उल्लेख केलेला नाही. श्री. बारी यांचे प्रतिज्ञापत्र व त्यांनी घेतलेल्या कागदपत्रांचा आधार यामध्ये विसंगती येते याबाबत बारी यांची उलटतपासणी होणे महत्वाचे आहे. उलटतपासणीपर्यंत श्री. बारी यांचे म्हणणे पूर्णतः मी नाकारत आहे." श्री. उल्हास काळोखे यांनी दि.१२/०१/२००६ रोजी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे नमूद केले आहे की, "माझ्यावर जे आरोप निश्चित केलेले आहेत ते कायद्यास धरुन नाहीत. सदरचे आरोप हे दाखल केलेल्या कागदपत्रांशी विसंगत आहेत. तसेच सहकार कायद्यातील तरतूदीशीं विसंगत आहे. जोपर्यंत समाधानकारक व ठोस किंवा सबळ पुरावा माझ्या विरुद्ध मिळत नाही तोपर्यंत मला दोषी धरता येणार नाही. केवळ सदरच्या कालावधीमध्ये मी बँकेचा अध्यक्ष होतो म्हणून माझ्यावर आरोप करता येणार नाही. बँकेचे सर्व कामकाज हे संचालक मंडळाने केलेल्या ठरावानुसार कामकाज चालू होते आणि सदरच्या ठरावाची अंमलबजावणी करणे यांची संपूर्ण जबाबदारी ही सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांची होती. संचालक मंडळाने पारित केलेल्या ठरावनुसार गुंतवणूक करण्याची जबाबदारीही त्यांची होती.

306

संचालक मंडळाने गुंतवणूक कशा स्वरुपात करावी याची निश्चिती केलेली होती. सदरच्या गुंतवणूकीच्या कार्यपद्धतीबाबत सरव्यवस्थापक हे मुख्य ॲथॉरिटी होती आणि त्यांनी गुंतवणूकीबाबतच्या छोटयामोठ्या बाबीची कल्पना संचालक मंडळास देणे अपेक्षीत होते. मात्र सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी संचालक मंडळास पूर्णतः अंधारात ठेवले. संचालक मंडळाच्या बैठकीच्या इतिवृत्तांवरुन असे दिसून येते की, सरव्यवस्थापक यांनी संचालक मंडळास त्रोटक माहिती दिली तसेच संचालक मंडळाने सरव्यवयस्थापक यांच्या म्हणण्यावर अंधविश्वास ठेवून ठराव केले. मे. होम ट्रेड व बँक यांच्यामधील सर्व व्यवहार हा अध्यक्षांशी केलेला आहे. दर्शविण्यात आलेले आहे. सदरचा पत्रव्यवहार हा सरव्यवस्थापक श्री.काळे हे संचालक मंडळास व अध्यक्ष यांना सांगून रोखू शकले असते. या चौकशीवेळी बँकेने सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर केलेल्या आहेत. मूळ कागदपत्रे दाखल केलेली नाहीत कारण मूळ कागदपत्रे ही पोलीसखात्याच्या ताब्यात आहेत. साक्षीदार यांना या सर्व आरोपांबाबत व्यक्तीगत कोणतीही माहिती नाही कारण ते संबंधीत विभागामध्ये काम करीत नव्हते. ॲड.एस.व्ही.क्षीरसागर यांनी श्री. बारी यांची उलटतपासणी घेताना श्री. बारी यांना या सर्व गुंतवणूकीबाबतच्या पद्धतीची माहिती असल्याचे मान्य केले आहे. त्यांच्या बोलण्यातून व त्यावरुन यासर्व व्यवहारात मी दुर्लक्ष केले आहे असे कोठेही दिसून येत नाही. श्री. बारी यांनी एकाही वेळेस असे दाखवून दिले की, माझ्याकडून दुर्लक्ष झाले आहे. कोणताही कागद किंवा पत्र व्यवहार याद्वारे दिसून येत नाही. सदर व्यवहारात माझा संबंध नाही. उलटतपासणीमध्ये असे दिसून येते की, संचालकमंडळाच्या सभांमध्ये या सर्व व्यवहारांची चर्चा झालेली आहे व मान्यता दिलेली आहे. सरव्यवस्थापक यांनी संचालक मंडळाच्या सभांचा जो अजेंडा काढलेला आहे त्यामध्ये नसलेले विषयांचे देखील विषय इतिवृत्तांमध्ये घातलेले आहे. कागदपत्रावर कोठेही माझी सही नाही. सरव्यवस्थापक यांनी मला अंधारात ठेवले. बँकेचे साक्षीदार यांनी हे मान्य केले आहे की, माझ्यावर जे आरोपपत्र ठेवलेले आहे त्यास आधार देणारा कोणताही कागद नाही. माझ्यावर जो आरोप ठेवलेला आहे त्यास कोणताही कागदोपत्री आधार नाही. बँकेच्या पोटनियमामध्ये संचालक मंडळ व व्यवस्थापन यांच्या वेगवेगळया जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या आहेत. बँकेचे साक्षीदार यांनी देखील उलटतपासणी वेळी मान्य केले आहे की, या सर्व व्यवहारामध्ये माझा सहभाग आहे याचा कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. उलटतपासणीत पुढे असेही दिसून आले आहे की, अध्यक्षांनी बँकेकडे असलेल्या गुंतवणूकीचे रजिस्टर किंवा गुंतवणूकीचा विभाग किंवा गुंतवणूकीची पद्धती अव्हेरुन गुंतवणूक केली आहे असे घडलेले नाही. इतर संचालक मंडळाप्रमाणे माझेही म्हणणे हेच आहे की, मला गुंतवणूकीबाबतची माहिती बँकेच्या प्रशासनाने दिलेली आहे त्याबाबतचा एकही कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही. यापुढे माझे असेही म्हणणे आहे की, विषयांकित सर्व व्यवहारास संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. रिझर्व बँकेचे दि १९/०४/२००१ व ९/८/२००१ च्या परिपत्रकांचे पालन बँकेने केलेले आहे बँकेने एचडी एफसी कडून बँक कन्फर्मेशन सर्टिफीकेट प्राप्त केलेले आहे. गुंतवणूकीबाबतच्या

(Book 1 & 2) Computer Generated Page 405 of 484

(561)

सर्व मर्यादाचे पालन बँकेने केलेले आहे. सर्व कॉन्ट्रक्ट नोटस् वर संबंधीत ब्रोकर्स्च्या सहया व सिल आहे. मला बँकेच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले की, मे. होम ट्रेड हे सेबी मान्यताप्राप्त ब्रोकर आहेत. मे. होम ट्रेड लि. यांनी जो अपहार केलेला आहे त्याबाबत फौजदारी गुन्हा क्र. १३८/२००० दाखल केलेला आहे. बँकेच्या प्रशासनाकडून मला कधीही कळविण्यांत आले नाही की, बँकेने गुंतवणूकीची जे मर्यादेपेक्षा जादा गुंतवणूक केलेली आहे. तसेच बँकेच्या प्रशासनाकडून जी काही माहिती दिली गेली त्यावर विश्वास ठेवून मी व संचालक मंडळ सदस्यांनी असे गृहित धरले की, गुंतवणूक ही रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या निकषाप्रमाणे होत आहे. सर्व गुंतवणूका या बँकेच्या संचालक मंडळाच्या सभांमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार केलल्या आहेत. गुंतवणूकीबाबतच्या ज्या मार्गदर्शक सूचना आहेत त्या कधीही संचालक मंडळासमोर आणलेल्या नाहीत. संचालक मंडळाने सरव्यवस्थापक यांच्यावर विश्वास ठेवून ठराव पारित केलेले आहेत. सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे व मे.होम ट्रेड लि. यांनी हातात हात घालून सर्व व्यवहार केलेले आहेत. मी कधीही कायदेशीर बाबीचे उल्लंघन करा असे सरव्यवस्थापक यांना सांगीतलेले नाही. संचालक मंडळाने जरी ठराव पारित केलेले असले तरी त्याबाबतची अंमलबजावणी करणे हे व्यवस्थापनाचे काम असते. या सर्व व्यवहारात माझा सहभाग आहे असा कोणताही कागदोपत्री पुरावा समोर आलेला नाही. यावरुन हे निश्चित होते की, या सर्व व्यवहारास मी जबाबदार नाही. सरव्यवस्थापक यांनी त्यांच्यासोयीनुसार बँकेचे कागदपत्रे तयार केले व बँकेस किती नफा झालेला आहे हे दाखविले. यासर्व गुंतवणूकीबाबतचे रोखे बँकेस मिळालेले नाहीत याबाबतची माहिती सरव्यवस्थापक यांनी मला किंवा संचालक मंडळास कधीही दिलेली नाही. "या गुंतवणूकीबाबतचे स्वरुप किंवा व्यवहार पहाता सर्वसाधारण अशी पद्धत आहे की, सुरुवातीला गुंतवणूक करायची, त्याची रक्कम अदा करावयाची तद्नंतर फिजीकल मोडमध्ये रोखे प्राप्त होतात अशी प्रचलित पद्धत आहे "असे सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी मला सांगीतले. या व्यवहारातून बँकेस नुकसान झाले असेल, केवळ ती एक नेहमीची व साधी घटना आहे असे म्हणता येईल मात्र त्यास आम्ही जबाबदार आहोत असे कायद्याने म्हणता येणार नाही. रिझर्व बँकेच्या सूचनांनुसार बँकेने एस जी एल मोडमध्येच गुंतवणूकीचे व्यवहार केलेले आहेत. केवळ दि. ३१/१/२००१ रोजीचा व्यवहार हा फिजीकल मोडमध्ये केलेला आहे. यावरुन असे दिसून येत नाही की, बँकेने वाईट हेतूने गुंतवणूक केलेली आहे. मे. होम ट्रेड लि. यांनी वेगवेगळया बँकांना फसवलेले आहे. मे. होम ट्रेड लि. यांनी सर्व पूर्व नियोजनानेच केलेले आहे. सहकारी बँकांची गुंतवणूक करण्याच्या पद्धतींमध्येचअसलेल्या त्रटींमुळे मे. होम ट्रेड लि. यांनी हे कृत्य केलेले आहे. यासर्व व्यवहारांमुळे बँकेचे अध्यक्ष यांनी निष्काळजीपणा केलेला आहे हे म्हणता येणार नाही. आरोपपत्र जर आपण पाहिले तर त्यावरुन असे दिसून येते की, या सर्व व्यवहारात आम्ही निष्काळजी आहोत असे पूर्वानुमान काढलेले आहे. संचालक मंडळात अध्यक्ष हे दैनंदिन कामकाज पहात नाहीत बँकेस केवळ नुकसान झालेले आहे म्हणून आम्हाला दोषी धरता येणार नाही या सर्व उक्त नमूद बाबींवरुन मी अशी विनंती

308

करतो की, या सर्व व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी, मे. होम ट्रेड लि. यांनी केलेल्या बेकायदेशीर कामकाज , अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा सरव्यवस्थापक यांची पोटनियमाप्रमाणे असणारी जबाबदारी ,बँकेचे इतिवृत्त ,संचालकांचा हेतु या सर्व बाबीची चौकशी व्हावी व मला या नुकसानीस जबाबदार धरु नये."

अपचारी प्रवर्तक क्र.२ ते १८ तत्कालीन उपाध्यक्ष श्री .उल्हास महादेव भट, तत्कालीन संचालक मंडळ सदस्य श्री. शंकरराव सुर्यवंशी, श्री .दिगंबर केशव रासने, श्री .वसंत डी.कोद्रे, श्री. अब्दुल के.के.मज्जिद, श्री. रामचंद्र एस. सुर्यवंशी , श्री .लक्ष्मीकांत आर. जाडे , श्री .गजानन डी.गांजवे, श्री .विजयकुमार सुदाम वांबुरे , श्री. विलास दत्तात्रय भुजबळ, श्री. निवृत्ती बी.पोफळे, श्री .अशोक प्रतापराव गोडसे , श्री. माणिक बी. चव्हाण, सौ.उज्वला एस.सुर्यवशी, सौ.शर्मिला एस.भोसले, श्री. बाळकृष्ण व्ही.रायकर, श्री .अरुण पी. शिंदे यांनी स्वतंत्ररित्या मुद्देनिहाय दाखल केलेली प्रतिज्ञापत्रे :-

सदर प्रतिज्ञापत्रामध्ये, "मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी सरकारी रोखे गुंतवणूक प्रकरणी आलेल्या आर्थिक नुकसानी बाबत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे अंतर्गत सुरु केलेल्या चौकशीकामी आवश्यक असणारे जबाब, खुलासा व उत्तरे मा.चौकशी अधिकारी यांच्या कडे पुराव्यासह दाखल केलेला आहे. सुवर्णयुग सहकारी बँकेचे तत्कालीन सरव्यवस्थाप्क श्री. सुरेश शिवाजीराव काळे यांनी तसेच बँकेचे चेअरमन श्री.उल्हास एन.काळोखे यांनी वेळोवेळी मे.कोर्टात दाखले केलेल्या सर्व म्हणण्यामधील त्या दोघांचे कथन आम्हा संचालकांविरुध्द आकसाने नमूद केलेले असून येनकेन प्रकारे आम्हा संचालकांना त्रास देण्याचे उद्देशाने व विनाकारण प्रकरणामध्ये गोवण्याकरीता मुळातच अप्रामाणिक हेतूने नमूद केलेला असल्याने श्री.काळे व श्री.उल्हास काळोखे यांच्या म्हणण्याचा कोणताही मजकूर, आरोप, कथने कोणत्याही प्रकारे माझ्यासहित इतर सर्व संचालकांना मान्य नाहीत.संचालक मंडळाने संचालक मंडळ सभा दि. ०५/०९/२००१ च्या ठराव क्र. ३(५) अन्वये सरकारी रोखे खरेदी विक्रीबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकारतत्कालीन अध्यक्ष/उपाध्यक्ष/ तत्कालीन सरव्यवस्थापक यांना दिलेले आहेत, असे निर्णय घेतल्यानंतर कार्योत्तर मंजूरीसाठी संचालक मंडळाच्य सभेपुढे ठेवावे आणि या पार्श्वभुमीवर यासंबंधी निर्णय घेणे व त्या संबंधीचे कागदत्रांवर सहया करण्याचे अधिकार संयुक्तपण बँक अधिकाऱ्यांना देण्यांत आले आहेत. मंजूरीनंतर एस.जी.एल. परचेस / रोखे नोटवर सहया करण्याचे अधिकार बँक अधिकाऱ्यांना देण्यांत आले आहेत. त्यामध्ये सरव्यवस्थापक याचा इतर चार अधिकाऱ्यांसमवेत समावेश आहे.सन २००१ - २००२ या आर्थिक वर्षातील रोखे खरेदी विक्रीच्या व्यवहारांची संचालक मंडळाचा कोणत्याही प्रकारे संबंध आलेला नाही. सरव्यवस्थापक यांनी रोखे खरेदीविक्रीच्या व्यवहाराचा विषय वर्षभरातील कोणत्याही अजेंडयावर आणला नाही. सरकारी रोखे खरेदीविक्री जे काही निर्णय अध्यक्ष/ सरव्यवस्थापक

309

यांनी घेतले अशानिर्णयाबाबत संचालक मंडळाची कार्योत्तर मंजूरी घेतलेली नाही. कार्योत्तर मंजूरीविना मे.होम ट्रेड कंपनीला रोखे खरेदी विक्री प्रकरणी बँक व्यवस्थानाने रक्कम अदा केल्या आहेत.

सरकारी रोखे खरेदीविक्रीबाबत विषय नसलेल्या संचालक मंडळाच्या सभा.

संचालक मंडळाच्या सन २००१-२००२ या कालावधीत एकूण २३ सभा झाल्या आहेत. संचालक मंडळ सभांच्या या विषय सरव्यवस्थापक यांनी घेतलेला नाही. सभा अजेंडयावर रोख्याबाबत संचालक मंडळ सभा दि. ३०/०६/२००१,०५/०९/२००१,११/२/२००२, ०४/०३/२००२, ०६/०४/२००२, या मंडळाचे अजेंडे आणि २८/०७/२००१, २३/०८/२००१, २०/०९/२००१, २४/०१/२००२, ११/०३/२००२, २०/०४/२००२ असे सर्व अजेंडे आम्ही आमच्या दि. २९/०३/२००३, (२२/१०/२००२) चे जबाबसोबत चौकशी कामी दाखल केले आहेत.सरव्यवस्थापक हे संचालक मंडळाच्या सभांच्या पुढील विषय सभांच्या तारखा, वेळ, इत्यादी मुक्रर करीत. सन २००१ ते २००२ या आर्थिक वर्षातील संचालक मंडळाच्या सभांचे अजेंडे वरील प्रमाण असून चौकशी कामी दाखल केले आहेत. त्या विषयपत्रिकेवर सरकारी रोख्यांच्या खरेदी विक्रच्या निर्णयास संचालक मंडळाच्या मान्यता घेण्यासाठी अजेंडयावर विषय घेतलेला नाही. हे या वर्षभरातील संचालक मंडळाच्या सभांच्या विषय पत्रिकेवरुन स्पष्ट होईल.

संचालक मंडळ सभावृत्तांत

अ.क्रं.	सभा दिनांक	अजेंडयावरील विषय	सभा वृत्तांत एकूण ठराव	रोख्याबाबतचा ठराव
१.	३०/६/२००१	१ ते ७	१ ते १०	९
२.	०५/०९/२००१	१ ते १०	१ ते १७	१६
३.	२४/१०/२००१			
४.	११/०२/२००२	१ ते ८	१ ते १४	१३
५.	०५/०३/२००२	१ ते ३	१ ते ३	३ सभावृत्तांत लिहीतना अजेंडयावरील विषय बदलला.
६.	२६/०३/२००२	अजेंडा नाही	१ ते ७	३ अ व ४
७.	०६/०४/२००२		१ ते ४	३ पुर्ण व अपुर्ण सहयांचे अजेंडे

संचालक मंडळास पाठविण्यात आलेल्या अजेंडयावरील विषयांपेक्षाही अधिक ठराव अजेंडयावर विषय नसतानाही सभा वृत्तांमध्ये सरव्यवस्थापक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने घेणाऱ्या ठरावांच्या क्रमांकात बदल करुन

310

घुसडले आहेत. सरकारी कर्ज रोख्यांना संचालक मंडळ सभेत मान्यता घेतल्याने दाखविण्या करीता खोटा सभावृतांत लिहीण्यात आला आहे. या सभावृत्तांच्या झेरॉक्स प्रती बँकेने बँक प्रतिज्ञापत्रासोबत चौकशी कामी दाखल केल्या आहेत. त्याची तपासणी अजेंडयावरील विषयांशी सुसंगत नाही. या सभा वृत्तांतामध्ये अजेंडयावरील विषयाशिवाय जे ठराव सभा वृत्तांमध्ये सरव्यवस्थापक यांनी नमूद केले आहेत. ते खोटे आहेत हे स्पष्ट होईल.

संचालक मंडळाचे एक सभेचे दोन अजेंडे.

प्रधिकृत चौकशी अधिकारी यांनी दि. १०/११/२००३ चे पत्राने काळोखे / भट / काळे इतर संचालक यांना दिलेल्या बँक प्रकरणी सरव्यवस्थापक यांनी दि. १३/११/२००३ जा.क्रं. ५३४, दिनांक २००३-२००४ अन्वये चौकशीसाठी सादर केलेले पत्रातील दि. ०५/०३/२००२ ०६/०४/२००२ च्या पत्राबाबत नोंदविलेल्या मतांशी आम्ही सहमत आहोत. दि. ०४/०३/२००२ तहकुब सभा दि. ०४/०३/२००२ रोजी घेण्यात आली. दि. ०४/०३/२००२ चे सभेचे अजेंडयावरील विषयांबाबत निर्णय संचालक मंडळाने घेतले.

या सभेचा सभा वृत्तांत बँकेने मा.चौकशी अधिकारी यांना बँक प्रतिज्ञापत्र (दि.) अन्वये चौकशी कामी दाखल केला आहे. हा सभा वृत्तांत खोटा आहे. सदरचा सभावृत्तांत सरव्यवस्थापक यांनी लिहीण्यासाठी त्यांची सही नसलेला तथापी विषय क्र. ३ सरकारी कर्ज रोखे विक्रीबाबत नोंद घेणे, याचा वापर केला आहे. विनासहीचा हा अजेंडा बँकेने चौकशी कामी दाखल केला आहे. दि. ४ मार्च २००२ च्या सभेने दि. ०५/०३/२००२ च्या सभेचे अजेंडयावरुन दि. ०५/०३/२००२ चा खोटा सभावृत्तांत सादर करुन रोखे खरेदीविक्री व्यवहारास संचालक मंडळाची मंजुरी असल्याचा भास निर्माण केला आहे. दि. ०५/०३/२००२ चा सभा वृत्तांत ठराव नं.३ खोटा आहे तो अमान्य करीत आहे.

सभा दि. ०६/०४/२००२:-बँकेची या सभेबाबत दि. १३/११/२००३ आणि दि. २५/११/२००२ बाबतच्या पत्राने बँकेचे चौकशी कामी या सभेचे अजेंडे दाखल केलेले आहेत.

दि. ०२/०४/२००२ जावक क्र. ०११/२००२-२००३ असा क्र. असलेले दोन अजेंडे बँकेने चौकशीकामी दाखल केलेले आहेत. संचालक मंडळास सरव्यवस्थापक यांचा पुर्ण सहीचा जो अजेंडा बँकेने पाठविला आहे त्यावर एकूण १ ते ४ विषय आहेत. त्यामध्ये सरकारी कर्जरोखे खरेदी विक्रीबाबत विषय नाही. तथापी बँकेने बँक प्रतिज्ञापत्रासोबत चौकशीकामी दाखल केलेल्या सभावृत्तांमध्ये जो विषय अजेंडयावर नाही असा विषय क्र. ३ चौकशी कामी बँकेने सादर केलेल्या सरव्यवस्थापक यांच्या अपुऱ्या सहीचे अजेंडयावरील विषय क्र. ३ सरकारी कर्जरोखे गुंतवणूक खरेदीविक्रीस मान्यता देणे असा ठराव ३ नमूद करुन सभा वृत्तांत लिहीला आहे.

(Book 1 & 2) Computer Generated Page 409 of 484

(J७)

दि. ०६/०४/२००२ च्या खोटया अजेंडयावरील विषय क्रमांक ३ चा सभा वृत्तांतामधील ठराव सभेस चर्चेस आलेला नाही. त्याबाबत संचालक मंडळाने असा ठराव केलेला नाही. त्याशिवाय या ठरावांना कोणीही सुचक अगर अनुमोदक नाहीत, आणि ठराव गणसंख्येने मंजूर केला गेला याचा उल्लेख सभावृत्तांतामध्ये नाही.

सभा दि. २६/०३/२००२

बँकेले दि. २५/११/२००५ रोजी सभेचा जा.क्रं. ५०५/२००५-२००६ अन्वये दि. २६/०३/२००२ रोजी संचालक मंडळ सभा झाल्याचे स्पष्ट केले आहे.

दि. २६/०३/२००५ रोजी सभेचा अजेंडा नव्हता. ही सभा बँक भाग भांडवल,कर्ज मंजूरी कर्जे नुतनीकरण यासाठी होती. या सभेत रोखे खरेदीविक्रीच्या व्यवहाराबाबत कोणतीही चर्चा संचालक मंडळात झाली नाही. कोणताही ठराव त्या अनुषंगाने मांडण्यात आलेला नाही. तरीसुध्दा सभावृत्तांतामध्ये या सभेचे जे ठराव नमूद करण्यात आले आहेत त्यामध्ये खोटा ठराव क्र. ४ सरकारी कर्जरोखे खरेदी करण्याबाबत असा ठराव सभावृत्तांमध्ये नमूद आहे आणि बँकेला न मिळालेला ७.५० टक्के जी ओ आय २०१० हा फिजीकल स्वरुपात बाजारभावपेक्षा किफायतशीर किंमतीमध्ये मिळत असल्याने घेण्यात यावा असा ठराव मा. सरव्यवस्थापक यांनी नमूद करुन रोखे खरेदी विक्रीचाव्यवहार संचालक मंडळाच्या मान्यतेने मंजूर झाला असल्याने बँक कर्मचारी या नात्याने मी अंमलबजावणी केल्याचा कांगावा केला आहे.

भारतीय रिझर्व बँक

दि. १९/०४/२००१ या पत्राची नोंद संचालक मंडळाने दिनांक ११/०६/२००१ ठराव क्र. ५(२८) सरकारी रोखे यापुढे एस.जी.एल. मधूनच करण्याबाबतच्या आरबीआय माहितीप्रत्रकाची नोंद घेतली आणि रोखे खरेदीविक्रीचे व्यवहार एसलीएल मधूनच करावें असा निर्णय संचलक मंडळाने केला. तथापी संचालक मंडळाच्या अधिन राहून सरव्यवस्थापक यांनी रोखे खरेदी विक्री व्यवहाराबाबत संचालक मंडळास वर्षभरात करुनही सांगीतलेले नाही. फिजीकल स्वरुपात व्यवहार करण्याबाबत संचालक मंडळाने सरव्यवस्थापक यांना केव्हाही सांगीतलेले नाही.

दि. ०९/०८/२००१ आर बी आय ने सरकारी रोख्यांबाबतचे सर्व व्यवहार एसजीएल मोडमधुनच करण्याबाबत पाठविलेले पत्र सरव्यवस्थापक यांनी संचालक मंडळाचे निदर्शनास आणले नाही.

दि. २२/१०/२००१ आर बी आयने ३१/३/२००२ अखेर सरकारी रोख्यातील गुंतवणुकीचे प्रमाण १२.५ टक्के ठेवावे अशा सुचना केल्या होत्या या सूचनाही संचालक मंडळाच्या निदर्शनास बँक व्यवस्थापनाने आणल्या नाहीत.

(ए) आर बी आय च्या दि. १९/०४/२००१ च्या परिपत्राकाची अंमलबजावणी संचालक मंडळाने ठरावाव्दाने सूचना करुनही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली नाही.

सहकारी बँक मर्यादित पुणे
अधिकृत अधिकारी
सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८

312

(571)

(बी) आर बी आयची दि. ०९/०८/२००१ आणि २२/१०/२००१ ची परिपत्रके संचालक मंडळाच्या निदर्शनास बँकेन आणली नाहीत.

रोख्यांबाबत.

१. दि. २८/०६/२००१ ११.५० टक्के आयडीबीएल २०१० एसएल (३ कोटी) होम ट्रेड लि या कंपनीच्या या पत्रावर बँक अध्यक्ष यांची सही /शिक्का व मंजूरीचा शेरा आहे.

२. दि. ०१/०८/२००१ १०.६५ टक्के आसीआयसीआय २००६ एसएल (१ कोटी पंचाहत्तर हजार)

३. दि. ०१/०८/२००१ १०.६५ टक्के आसीआयसीआय २००६ एसएल (१ कोटी पंचाहत्तर हजार)

होम ट्रेड लि. कंपनीच्या पत्रावर बँक अध्यक्ष यांची सही शिक्का व मंजूरी शेरा आहे.

१. बिल / कॉन्ट्रक्ट नोट १३३६१ यावर अध्यक्ष/उपाध्यक्ष/सरव्यवस्थापक यांची ठरावानुसार मंजुर नाही सही/शिक्का /शेरा नाही. उल्हास भट यांची केवळ व्यक्तिगत कॅपॅसिटीमध्ये सही आहे..

२. बिल / कॉन्ट्रक्ट नोट १३७५७

३. बिल / कॉन्ट्रक्ट नोट १३७६१

या बँकेच्या सन २००१-२००२ या वर्षातील अध्यक्ष उपाध्यक्ष पदाच्या निवडणूका दि. २३/०८/२००१ रोजी घेवून श्री.भट उपाध्यक्ष झाले आहेत. तथापि त्यांच्या निव्वळ सहया दि. २८/०६/२००१, ०१/०८/२००१ च्या होम ट्रेड लि. कंपनीच्या पत्रावर, बिलावर आणि कॉन्ट्रक्टवर नोटवर घेतल्या आहेत. या कालावधीत भट हे उपाध्यक्ष नव्हते.

१. ३०/०६/२००१ ठराव नं.९ बँकेचे शिक्के सहया मंजूरी शेरे नाहीत.

२. ०५/०९/२००१ ठराव नं.१६ उल्हास भट यांची सही उपाध्यक्ष पदावर नसतांना घेतली गेली आहे.

३. ११.५० टक्के आयडीबीआय २०१० ३ कोटी दि. ३०/०१/२००२.

होम ट्रेड लि. चे या पत्रावर बँक अध्यक्ष /उपाध्यक्ष /सरव्यवस्थापक यांच्या सहया, शिक्के व मंजूरीबाबतचे शेरे नाहीत. केवळ उल्हास भट यांची व्यक्तीगत मर्यादित सही आहे ती कायदेशीर नाही.

४. ३०/०१/२००२, १३.५० टक्के महाराष्ट्र जीवन प्राधिकरण २०१० रु. ५ कोटी होम ट्रेड लि. या कंपनीच्या पत्रावर बँके अध्यक्ष / उपाध्यक्ष / सरव्यवस्थापक यांचे शिक्के, सहया, मंजुरीचे शेर नाहीत.उल्हास भट यांची व्यक्तिगत कॅपॅसिटीमध्ये सही आहे ती कायदशीर नाही.

बिल व कॉन्ट्रक्ट नोट - १५७५७.

होम ट्रेड लि. कंपनी पत्रावर बँक अध्यक्षांची सही / शिक्का व शेरे आहेत.

बिल - उल्हास भट यांची सही व्यक्तिगत कॅपॅसिटी मध्ये आहे. बँक शिक्का मंजूरी नसल्याने सही बेकायदेशीर

313

(Book 1 & 2) Computer Generated Page 411 of 484

आहे.

कॉन्ट्रक्ट नोट - केवळ उल्हास भट यांची सही आहे. बँक, शिक्का सही शेरा नसल्याने ही सही कायदेशीर नाही.

बिल नं. १६०२९ रु.५ कोटी ६८ लाख

यावर बँक अध्यक्षांची सही / शिक्का व मंजूरी शेरा आहे. दि. ०५/०३/२००२ च्या सभेतील ठराव नं. ३ हा खोटा आहे. दि. ०४/०३/२००२ च्या तहकूब सभेच्या अजेंडयावर हा विषय नाही. बिल नं. १५९११ ५ कोटी ६८ लाख. यावर बँक अध्यक्षांची सही / शिक्का व मंजूरी शेरा आहे. दि. ०५/०३/२००२ च्या सभेतील ठराव नं. ३ हा खोटा आहे. दि. ०४/०३/२००२ च्या तहकूब सभेच्या अजेंडयावर हा विषय नाही.

बिल नं. १५९११ - ५ कोटी ६९ लाख दि. ३०/०१/२००२.-यावर बँक अध्यक्ष यांचा शिक्का, सही मंजूरी शेरा आहे. उल्हास भट यांची केवळ विना शिक्याची, विना मंजूरीची सही आहे.

२८/०३/२००२ बिल नं. १६८७१ रु. ५,७३,१४,५४६.२५-.दि. ०६/०४/२००२ च्या संचालक मंडळातील ठराव नं. ३ ने दाखविलेली मंजूरी खोटी व लबाडीची आहे. या सभेचे सरव्यवस्थापक यांचे दोन अजेंडे आहेत. पुर्ण सहीचा संचालकांना पाठविलेल्या अजेंडयामध्ये सरकारी रोखे खरेदी विक्रीचा विषय नाही. त्यामुळे सभावृत्तांतातील ठराव खोटा आहे. अपुर्ण सहीचा दुसरा अजेंडा आहे. त्यात विषय नं. ३ मध्ये सरकारी रोख्याचा विषय घालून संचालक मंडळाची मंजूरी दाखवून फसवणूक केलेली आहे.यावर बँक अध्यक्ष यांचा शिक्का, सही मंजूरीचा शेरा आहे. उपाध्यक्ष यांची बँक शिक्का नसलेली सही आहे. निर्णय प्रक्रियेत उपाध्यक्ष म्हणून त्यांचा सहभाग नव्हता. दि. ३०/०३/२००२ ८.७ टक्के जी ओ आय २०१७ मध्ये ५ कोटी मे. होम ट्रेड लि. यांनी या पत्रासोबत विषय ४२ ते ४६ असे दि. फेडर बँक लि. चे पाच बॉन्डस बँकेस पाठवून मिळाल्याची पोहोच बँकेकडे मागीतलेली आहे. त्यावर अकारण श्री. उल्हास भट यांची सही घेतली आहे. बँकेच्या पदाचा शिक्का नाही. वरील संदर्भामधील पत्र्याच्या आणि त्यापूर्वीच्या पत्रांच्या अनुषंगाने नमूद करीत आहे की, मे. होम ट्रेड कंपनी समवेत बँकेने केलेल्या रु. ५.६५ कोटींच्या आर्थिक व्यवहाराशी संचालक या नात्याने आम्हा कोणाचाही संबंध नाही. संचालक या नात्याने व्यक्तिगतरित्या अथवा संचालक मंडळ म्हणून उपरोक्त व्यवहारास आम्ही केव्हाही मान्यता दिलेली नाही. आमचेविरुध्द आरोपपत्रांत नमूद असलेले आरोप आम्ही नाकबूल करीत आहोत. सदरचे आरोप चुकीचे आणि गैरसमजुतीवर आधारीत असून सत्याचा आणि वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे आहेत हे खाली बाबीवरुन स्पष्ट होईल. रोखे खरेदी व्यवहारात आम्ही कोणताही निष्काळजीपणा केलेला नाही. बँकेचे अहित हाईल, सभासदांचे आर्थिक नुकसान होईल, आणि बँकेच्या प्रतिमेस कलंक लागेल असे कोणतेही कृत्य आम्ही केलेले नाही. याबाबतचे सदरचे आणि पुर्वीचे म्हणणे विचारात घेवून आम्हा संचालकांना आपण ठेवलेल्या आरापातून पूर्णपणे मुक्त करावे.मे. होम ट्रेड कंपनीने आमच्या बँकेची रु. ५.६५ कोटी रुपयांची फसवणूक केली असल्याचे आम्हा संचालकांना दि. २२/०४/२००२ रोजीच्या

(Book 1 & 2) Computer Generated Page 412 of 484

(575)

सभेत प्रथमच सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे आणि अध्यक्ष श्री.उल्हास काळोखे यांचेकडून समजले. बँकेचे आर्थिक नुकसान होवू नये यासाठी या दिनांकापासून पुढे आम्ही जलदगतीने कार्यवाही केली आहे. मे.होम ट्रेड कंपनीला कायदेशीर नोटीस फौजदारी, दिवाणी, लावद स्वरुपाचे दावे आम्ही दाखल करुन आमची जबाबदारी पार पाडली आहे.दि. ३० मार्च २००० अखेर मे.होम ट्रेड कंपनी यांच्याशी बँकेने रोखे खरेदी विक्रीबाबत केलेले व्यवहारास संचालक मंडळाने केव्हाही मान्यता दिलेली नाही. संचालक मंडळाच्या अधिन राहून सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी रोख्याचे व्यवहार न करता स्वत:च्या अधिकारात सर्व व्यवहार केले आहेत. सरव्यवस्थापक यांनी त्यंच्या दि. १ जुलै २००२ च्या उत्तरात रोखे खरेदी विक्री, गुंतवणूक या बाबतचे निर्णय मा.अध्यक्ष आणि उपाध्यक्ष यांनी घेतल्याचे नमूद केले आहे. आणि त्यांस संचालक मंडळाने त्यानंतर मान्यता दिल्याचे ढळढळीत खोटे विधान करुन दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांचे हे विधान संचालक मंडळास मान्य नाही. मे होम ट्रेड कंपनीबरोबर फिजीकल स्वरुपात व्यवहार करण्यास संचालक मंडळाने केव्हाही मान्यता दिलेली नाही. अगर तशा अर्थाचा ठरावही संमत केलेला नाही. मे.होम ट्रेड या कंपनीबरोबर बँकेचे सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे यांनी २५.५० कोटीपेक्षा ज्या आर्थिक रकमेचा म्हणज ४५ कोटी रुपयांच्या गुंतवणूकीचा जो व्यवहार केला आहे. त्यास संचालक मंडळाने मान्यता दिलेली नाही. या कालावधीत दि. ३०/०६/२००१, २८/०७/२००१, २३/०८/२००१, ०५/०९/२००१, २९/९/२००१ अशा कितीतरी संचालक मंडळाच्या सभा झाल्या, परंतू सरव्यवस्थापक अगर बँक अध्यक्ष यांनी रोखे खरेदी विक्रीबाबतचे विषय संचालक मंडळाच्या चर्चेस आणले नाहीत आणि अध्यक्ष आणि सरव्यवस्थापक यांनी कार्योत्तर मंजूरीसाठी रोखे खरेदी विक्रीबाबतचे विषय संचालक मंडळांच्या सभांच्या अजेंडयावर घेतला नाही. विषय अजेंडयावर नसल्याने कार्योत्तर मंजूरी देण्याचाही प्रश्न निर्माण झाला नाही. अशी कार्योत्तर मंजूरी घेण्याबाबत अध्यक्ष /सरव्यवस्थापक यांनी संचालक मंडळापुढे कंसल्याही प्रकारची माहिती दिलेली नाही. यापुर्वीच्या आमच्या कथनाबरोबर संचालक मंडळाच्या सभांचे अजेंडे पुराव्यादखल सादर केले आहेत. बँकेचे सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी अध्यक्ष/उपाध्यक्ष यांनीच रोखे खरेदी विक्रीचे निर्णय घेतले. त्यास संचालक मंडळाने तद्नंतर मान्यता दिली आणि बँकेचे सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी अध्यक्ष/उपाध्यक्ष यांनीच रोखे खरेदी विक्रीचे निर्णय घेतले. त्यांस संचालक मंडळाचे तद्नंतर मान्यतादिली आणि बँकेचे सेवक या नात्याने निर्णयाची अंमलबजावणी केली अशी खोटीविधाने केली असून ती, आम्ही अमान्य करीत आहोत. संचालक मंडळाने दि. ०५/०९/२००१ रोजीच्या ठराव क्रंमांक ३(५) चे ठरावाने रोखे खरेदी विकीचे निर्णय घेण्याचे अधिकार ज्या अर्थी अध्यक्ष/उपाध्यक्ष आणि सरव्यवस्थापक यांना ठरावाने प्रदान केले आहेत, त्याअर्थी सरव्यवस्थापक हे या प्रकरणातील निर्णय प्रक्रियेत आहेतच. सरव्यवस्थापक यांनीच मे.होम ट्रेड कंपनीकडून फिजीकल स्वरुपात रोखे खरेदी केली आहेत. त्याचे आदेशावरुनच रु. ५.६५ कोटीं ही रक्कम मे.होम ट्रेडला अदा करण्यात आलेली आहे. सरव्यवस्थापक यांचा या

(Book 1 & 2) Computer Generated Page 413 of 484

(377)

व्यवहारास गलथानपणा झाला असून त्यांनी रिझार्व बँकेचे आदेश पाळले नाहीत. मे.होम ट्रेड लिमिटेड या कंपनीबरोबर फिजीकल स्वरुपात व्यवहार करीत असताना मा. सरव्यवस्थापक यांना आर बी आय ची दि. १९/०४/२००१ व दि. २२/१०/२००१ ची परिपत्रके, त्यातील मार्गदर्शक सूचना माहिती होत्या. तथापी या सुचनांचे उल्लंघन सरव्यवस्थापक यांनी केले. याबाबत मा.संचालक मंडळास सरव्यवस्थापक यांनी जाणून बूजून अंधारात ठेवले आहे. अध्यक्षांसमवेत उपाध्यक्ष सरव्यवस्थापक याबाबत कमालीची गुप्तता बाळगली आणि उपाध्यक्ष यांना पध्दतशीरपणे निर्णय प्रक्रियेतून वगळले.सरव्यवस्थापक यांनी या व्यवहाराबाबत तपशिलाव्दारे टिपण्णी (नोट) लिहीलेली नाही. यावरुन सरव्यवस्थापक मन मानेल अशा पध्दतीने एवढया मोठया गुंतवणुकीबाबत ज्याअर्थी व्यवहार करतात त्याअर्थी झालेल्या बँकेच्या आर्थिक नुकसानीची सर्वात मोठी जबाबदारी त्यांच्यावर येते. संचालक मंडळाला अंधारात ठेवून मे.होम ट्रेड कंपनीबरोबर फिजीकल स्वरुपात त्यांनी केलेल्या रु. ५.६५ कोटींची अंतिम जबाबदारी त्याचीच आहे. रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी केले आहे. नियमबाहय गुंतवणूक करुन बँकेचे अर्थिक नुकसान केले आहे. संचालक मंडळास दि. २२/०४/२००२ रोजी पहिल्यांदा मे.होम ट्रेड कंपनीबरोबर बँकेकडून झालेला रु. ५.६५ कोटी चा व्यवहार कळला असल्याने संचालक मंडळ पुर्णपणे निर्दोष आहे. सरव्यवस्थापक आणि अध्यक्ष या दोघांनीच दि. ३०/०३/२००२ अखेरचे मे.होम ट्रेड लिमिटेड व्यवहार संचालक मंडळाला अंधारात ठेवून केले असल्याने सरव्यवस्थापक आणि अध्यक्ष हेच या आरोपास जबाबदार आहे. त्यांनी केलेल्या चुकांचे परिमार्जन त्यांनीच करणें आवश्यक आहे.सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे यांनी दि. ०१/०७/२००१ च्या त्यांचे उत्तरात कलम बी मध्ये जे नमूद केले आहे. निर्णय प्रक्रियेमध्ये, गुंतवणूकींच्या व्यवहारीक पध्दतीमध्ये, त्यांचा आणि त्यांच्याबरोबर अधक्षांचा सहभाग आहे. व्यवस्थापक यांनी नमूद केले असले तरी, ते खरे नाही. या प्रकरणामध्ये त्यांनी संचालक मंडळापासून मे.होम ट्रेड लिमिटेड यांचेशी झालेला सर्व व्यवहार गुप्त ठेवला आहे. अध्यक्ष/ सरव्यवस्थापक यांनी नमूद केले असले तरी, ते खरे नाही. या प्रकरणामध्ये त्यांनी संचालक मंडळापासून मे. होम ट्रेड लिमिटेड यांचेशी झालेला सर्व व्यवहार गुप्त ठेवला आहे. अध्यक्ष/सरव्यवस्थापक यांनी मे.होम ट्रेड लिमिटेड यांचेशी फिजीकल स्वरुपात जो व्यवहार केला रु. ५.६५ कोटीं गुंतविण्याचा निर्णय केला त्याबाबत कायदा कानुन पोटनियम नितीमत्ता धाब्यावर बसवून संचालक मंडळाशी बेईमानपणा करुन बँकेचे कधीही भरुन न निघणारे नुकसान केले आहे. हे कृत्य सरव्यवस्थापक / अध्यक्ष यांनीच केले असल्याने संचालक मंडळ उपाध्यांक्षासह पूर्ण निर्दोष आहे.सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे यांनी दि. २९/०६/२००१, दि. २/८/२००१, दि. ३/८/२००१, दि. २०/२/२००२, दि. ३०/०३/२००२ या दिनांकास फिजीकल स्वरुपात मे.होम ट्रेड कंपनीकडून खरेदी विक्री केले रोख अगर त्यांची माहिती संचालक मंडळास दिलेली नाही. या बाबत संचालक मंडळाने या व्यवहारास कार्योत्तर मंजूरी दिलेली नाही. याबाबत अंतर्गत लेखा परिक्षक आणि शासकीय लेखा परिक्षक यांनीही मे.होम ट्रेड लि.

316

कडून रोख आले आहेत अगर नाहीत व्यवहाराबाबत काहीही आक्षेप नोंदविले नाहीत. त्यामुळे असा व्यवहारा बँकेत झाला आहे किंवा कसे याबाबत संचालक मंडळास शंका आली नाही. सात महिन्यापेक्षा जास्त कालावधी होवूनही मे.होम ट्रेड लि. कंपनीकडून रोखे प्राप्त झाले नाहीत व त्याबाबत पाठपुरावाही झाला नाही ३ कोटी दर्शनी किंमतीचे रोखे खरेदी केल्यानंतर, त्यासाठी बँकेची रक्कम मे.होम ट्रेड लि. कंपनीस बँक सरव्यवस्थापक यांनी दिल्यानंतर हे रोखे प्रत्यक्षात बँकेला मिळाले नसतानाही सरव्यवस्थापक / अध्यक्ष यांनी पुन्हा एक कोटी रकमेच्या रोख्यांसाठी मे. होम ट्रेड लि. कंपनीला रक्कम द्यावी यामध्ये त्यांचा निष्काळजीपणा, गाफिलपणा दिसतो. संचालक मंडळास विश्वासात न घेता वरील रक्कमेव्यतिरिक्त पुन्हा एक कोटी रुपयांची फिजीकल स्वरुपात गुंतवणूक, सरव्यवस्थापक यांनी केली. या गुंतवणुकीचा व्यवहार संचालक मंडळाच्य मंजुरीविना झालेला आहे. ऐनवेळचे विषयात मंजूरीचा ठराव सरव्यस्थापकांनी घुसडले आहेत.संचालक मंडळाने या व्यवहारास कार्योत्तर मंजूरी दिल्याचा भास सरव्यवस्थापक यांनी निर्माण केला आह त्यांनी दिलेला सभावृत्तांत खोटा आहे. कोटयावधी रकमेच्या गुंतवणूकीबाबत सभेच्या अजेंडयावर कार्योत्तर मंजूरीबाबतचाही विषय नेमून नाही आणि तरीही ठराव लिहीला नाही याचा अर्थ मे. होम ट्रेडचा व्यूहरचना आहे. सरव्यवस्थापक यांनी त्यांचे दि. ०१/०७/२००२ चे पत्रात कलम एफ मध्ये दि. ३०/०३/२००२ रोजी मे.होम ट्रेड लि. कंपनीकडून फिजकल स्वरुपात खरेदी केलेला रु. ५.६५ कोटींचे रोखे प्राप्त होण्यास विलंब झाला आणि संचालक मंडळाने दि. २२/०४/२००२ च्या सभेत या कंपनीविरुध्द कायदेशीर नोटीस बजाविण्यास सांगीतल्याचे नमूद आहे. मे.होम ट्रेड लि. बरोबर बँकेच्या सरव्यवस्थापक आणि मा.अध्यक्ष यांना दि. ३०/०३/२००२ अखेर केलेला व्यवहार प्रथमच या सभेत संचालक मंडळास सांगितला आणि मे.होम ट्रेड लि. कंपनीकडून बँकेची फसवणूक झाली असल्याचे नमूद केले. या सर्व व्यवहारात सरव्यवस्थापक/ अध्यक्ष हे किती गाफील राहिले त्यांनी जे निर्णय घेतले त्यास आधार काय होता याबाबत त्यानी संचालक मंडलास सांगण्याचे कटाक्षाने टाळले आहे. सरव्यवस्थापक यांनी आपली कातडी बचावण्यासाठी जाणून बुजून खोटा सभावृत्तांत ऐनवेळचे विषयांत नमूद करुन संचालक मंडळाने त्यास मान्यता दिल्याचा भास निर्माण केला आहे. हा सभावृत्तांत खोटा असून तो आम्हा संचालकांना मान्य नाही.सरव्यवस्थापक यांनी दि. ०१/०७/२००२ च्या त्यांच्या निवेदनांत कलम ई मध्ये नमूद केलेले जीवन प्राधिकरण रोखे बँकेत आहेत या बाबत संचालक मंडळास सरव्यवस्थापक यांनी सांगितले नाही. अथवा सदर रोखीने दाखविण्यांत आले नाहीत. सरव्यवस्थापक यांच्या ताब्यात असणार या रोख्याबाबत त्यांनी मौन पाळावे यातच सर्व काही आले. या रोख्यांवर दि.फेडरल बँक लिमिटेड, या बँकेचे नाव आहे. दि. २२/०४/२००२ नंतर संचालक मंडळास या रोख्यांची माहिती मिळाली. या प्रकरणात सी आय डी चौकशी सुरु होवून सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे आणि अध्यक्ष श्री. उल्हास काळोखे यांच्याविरुध्द १९९६ पानाचे आरोपपत्र पोलीस खात्याने दाखल केले. या सीआयडी चौकशीत बँकेला मिळालेले रोखेही खोटे आहेत असे मे.होम ट्रेड लि. संचालकांनी सांगीतल्याची आमची माहिती आहे. हे

प्रमाणित अधिकारी

37

रोखे विकल्याबाबत आणि ८०७ जीओआय २०१७ आणि ७.५० जीओआय २०१० यांच्या खरेदी विक्रीच्या निर्णय प्रकियेबाबत सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे यांनी त्यांच्या दि. ०१/०७/२००२ च्या उत्तरातील कलम ई मध्ये नमूद केलेल्या निर्णय प्रक्रियेशी संचालक मंडळाचा संबंध नाही. मे.होम ट्रेड लि. यांच्याबरोबर रोख खरेदी विक्रीच्या व्यवहाराच्या निर्णय प्रक्रियेच्या मुळाशी सरव्यवस्थापक श्री.सुरेश काळे आहेत हे स्पष्ट होत असून या निर्णय प्रक्रियेत समाविष्ट असणारे अध्यक्ष श्री.उल्हास काळोखे हे संचालक मंडळाचे प्रतिनिधीत्त करीत असूनही संचालक मंडळास ज्याअर्थी काहीच सांगत नाही त्याअर्थी हातात हात मिळवून हा व्यवहार झालेला आहे हे गुपित रहात नाही.सरव्यवस्थापक / अध्यक्ष यांनी संचालक मंडळाचा विश्वासघात करुन फिजीकल स्वरुपात मे.होम ट्रेड लि. या कंपनीशी व्यवहार केला आहे. रिझर्व बँकेच्या दि. १९/०४/२००१ आणि २२/१०/२००१ च्या सुचना संचालक मंडळाचे निदर्शनास आणल्या नाहीत. एक शेअरदलालाकडे पाच टक्के अधिक रक्कम गुंतविण्याबाबत संचालक मंडळाची मान्यता घेतली नाही. मागणी मुदत देयकेच्या १२.५० टक्के अधिक म्हणजेच ४५ कोटी रुपयांची गुंतवणूक करताना संचालक मंडळाची मान्यता घेतलेली नाही रोखे रु. ३ कोटी , १ कोटी, १ कोटी गुंतविण्यास संचालक मंडळाची मान्यता घेतली नाही, सात महिन्यावरती अधिक कालावधी होवूनही रोखे प्राप्त झाले नाहीत. तरीही संचालक मंडळापासून ही बाब लपवून ठेवण्यात आली. जीवन प्राधिकरणाचे रोखे प्राप्त झाल्यानंतर खरे / खोटे असण्याबाबतची खातरजमा करण्याबाबत पुरशी काळजी घेतली नाही. सी आय डी तपासत हे रोखे खोटे आहेत असे दिसून आले. मागणी मुदत देयकेच्या १२.५० टक्के रकमेच्या गुंतवणूकीची मर्यादा ओलांडून सरव्यवस्थापक, अध्यक्ष यांनी ४५ कोटी गुंतविले. तथापि संचालाक मंडळास याबाबत सूतराम कल्पना दिली नाही. संवालक मंडळाच्या वेळोवेळीच्या सभांच्या अजेंडयावर मे. होम ट्रेड लि. बाबत, रोख खरेदी विक्रीबाबतचा विषय जाणून बूजून घेण्याचे अध्यक्ष/सरव्यवस्थापक यांनी टाळले.सरव्यवस्थापक यांनी कातडी बचाव धोरण स्विकारुन खोटे कार्यवृत्तांत ऐनवेळचे विषयांत लिहून संचालक मंडळाच्या विश्वासाला वाटाण्याच्या अक्षता लावल्या आहेत. महत्वाच्या आणि बँकेवर परिणाम करणाऱ्या विषयांचे प्रस्तावाबाबत सविस्तर टिपण्या लिहीण्याचे टाळले आहे. ज्याअर्थी लेखापरिक्षकांचे अहवालात फिजीकल स्वरुपातील रोखे व्यवहाराबाबत काहीही त्रुटी / शंका आक्षेप नमूद नाहीत. ज्याअर्थी सरव्यवस्थापक यांनी त्यांना चुकीची / अपुरी अर्धवट माहीती दिल्याने लेखापरिक्षकांनी आक्षेप नमूद केला नसावा. मे.होम ट्रेड लि. या कंपनीला बँकेने फिजीकल स्वरुपात रक्कम रु. ५.६५ कोटीं देण्यामध्ये निर्णय प्रक्रियेमध्ये, अंमलबजावणीमध्ये अध्यक्ष आणि सरव्यवस्थापक यांचा प्रामुख्याने सहभाग आहे. याबाबतच्या पुराव्याची कागदपत्रे आमच्या पूर्वीच्या निवेदनात सादर केलेली आहेत. सरदच्या व्यवहारात सरव्यवस्थापक आणि अध्यक्ष यांच्या अगणित चुका आहे. भारतीय रिझर्व्ह बँक, सहकारी कायदा आणि मंजूर पोटनियम यांचे अधिनस्त राहून जी कर्तव्य आणि जबाबदाऱ्या सरव्यवस्थापक आणि अध्यक्ष यांनी कर्तव्य भावनेने, प्रामाणिकपणे आणि निष्ठेने पार पाडावयाच्या आहेत.

318

त्या पार पाडण्यात सरव्यवस्थापक आणि अध्यक्ष यांनी जाणीवपूर्वक कुचराई केलेली आहे. पोटनियम क्र. ३६, ४० मधील नियमांना धाब्यावर बसविले आहे. सरव्यवस्थापक यानी मन मानेल असा कारभार करुन लोकशाही कार्यपध्दतीला तिलांजली दिली आहे. बँकेच्या कारभारची सुत्रे संचालक मंडळाऐवजी स्वतःच्या अखत्यारीत ठेवून अवैध मार्गाने व्यवहार केला आहे. निर्णय प्रक्रियेत मुख्य सुत्रधार ठेवून अवैध मार्गाने व्यवहार केला आहे. निर्णय मुख्य सुत्रधार उपाध्यक्षांना वगळून मा.अध्यक्षांच्या हातात हात घालून सरव्यवस्थापक यांनी रोखे गैरव्यवहार केला आहे. संचालक मंडळाच्या अधिकारास फाटा देवून संचालक मंडळास अंधारात ठेवून सरव्यवस्थापक यांचा निर्णय प्रक्रियेत, अंमलबजावणीने अग्रभाग असल्याने बँकेच्या आर्थिक नुकसानीची व निष्काळजीपणाची जबाबदारी सरव्यवस्थापक यांची आणि सरव्यवस्थाक /अध्यक्ष यांची संयुक्त पणे राहील. संचालक मंडळ यास व्यवहाराच्या निर्णय प्रक्रियेत अंमलबाजावणीत वा कोणत्याही गैरव्यवहारात नसल्याने आणि कोणत्याही प्रकारचा हलगर्जीपणा अगर निष्काळजीपणा संचालक मंडळाकडून जाणतेपणी व अजाणतेपणी झालेला नसल्याने सर्व आरोपातून संचालक मंडळास पुर्णपुणे निर्दोषी करावे अशी विनंती आहे. बँकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस संचालक मंडळ जबाबदार नसल्याने आम्हाला आर्थिक जबाबदारीतूनही पुर्ण मुक्त करावे.आमच्या बँकेला रु. ५.६५ कोटींचा फटका बसतो आहे. असे समजताच दि. २२/०४/२००२ पासून आम्ही बँकेचे आर्थिक नुकसान भरुन काढण्याचा प्रयत्नाला लागलो. मे.होम ट्रेड लि. कंपनीस निधी व रोख्रे देण्याबाबत दि. २२/०४/२००२ रोजीचे कायदेशीर नोटीस पाठविण्याचा ठराव करुन तशी नोटीस पाठविली. फसवणूक झाली आहे असे वाटताच मे.होम ट्रेड लि. कंपनीविरुध्द फौजदारी दावा दाखल केला. मे.होम ट्रेड लि. कंपनीने दिलेल्या कॉन्ट्रक्ट नोटनुसार सेबी मान्य असल्याने स्टॉक एक्सजेंज पुणे यांच्याकडे लवाद दावा दाखल केला. रोख्यातील रु. ५.६५ कोटींची गुंतवलेली रक्कम अधिक व्याज मिळावे आणि मे. होम ट्रेडची मालमत्ता जप्त व्हावी यासाठी दिवाणी दावा दाखल केला. सर्व दावे न्यायालयाच्या अधिन आहेत. आम्हाला कळताच जलदगतीने संचालक मंडळाने कार्यवाही केली आहे. यापूर्वीचा व्यवहार संचालक मंडळाच्या मान्यतसाठी माहितीसाठी आला असता तर ते रामायण घडले नसते. रोखे व्यवहार प्रकरणी मान्यता उपाध्यक्ष यांनी केव्हाही दिलेली नाही.आम्ही संचालकांनी बँक वाढविण्यांत अपार कष्ट केले आहेत. स्वार्थी हेतूने काम केले नाही. अधिकाराचा गैरवापर केला नाही. कायदा आणि व्यवहाराची सांगड घातली. बँकेच्या आर्थिक शक्तीचा लाभ देवून सहकार चळवळीला सामर्थ दिले. आम्ही संचालक निर्दोष आहोत. आमच्यावरील आरोपपत्र रद्दबादल करावे. आर्थिक जबाबदारीतून आम्हाला मुक्त करावे हीच विनंती."

श्री. काळे यांनी त्यांच्या बचावाच्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले नाही .तत्कालीन प्राधिकृत अधिकारी श्री. गाडे यांनी त्यांना आरोपपत्र जारी करुन त्यांना त्यांचे बचावाचे पृष्ठर्थ कोणत्याही प्रकारचा कागदोपत्री पुरावा अगर

प्राधिकृत अधिकारी

319

तत्सम कागदपत्रे दि.२८/३/२००३ तत्पुर्वी सादर करणेबाबत सदर आरोपपत्रामध्ये सांगण्यात आलेले होते.त्यांनी त्यावर लेखी म्हणणे सादर केले आहे. त्या मध्ये त्यांच्यावर ठेवण्यात आलेले सर्व आरोप नाकारलेले आहेत.मात्र त्या म्हणण्यापृष्ट्यर्थ श्री. काळे यांनी प्रतिज्ञापत्र सादर केलेले नाहीत.

श्री.गाडे व श्री.घोलकर यांनी त्यांचेसमोर श्री.बारी यांची सरतपासणी व उलटतपासणी तसेच श्री.काळोखे यांची बॅकेतर्फे उलततपासणी झालेली होती.मा.उच्च न्यायालयाच्या दि. २८/०१/२०१० रोजिच्या आदेशानुसार श्री .काळोखे यांची उलततपासणी संचालकाचे वकील ॲड.नांगरे,यांनी प्रथम व तदनंतर सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे वकील ॲड.कानेटकर यांनी माझेसमोर घेतली आहे.तसेच श्री.श्री.राव सुर्यवंशी यांची उलटतपासणी श्री.उल्हास काळोखे यांचे वकील ॲड.क्षीरसागर यांनी व तद्नंतर सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे वकील ॲड.कानेटकर यांनी माझेसमोर घेतली आहे .श्री.उल्हास भट यांची उलटतपासणी सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे वकील ॲड.कानेटकर यांनी माझेसमोर घेतली आहे.

उलटतपासणी पुर्ण झाल्यावर ॲड. श्री. एस.व्ही.क्षीरसागर, ॲड.नांगरे, ॲड.कानेटकर व ॲड.खुर्जेकर यांनी युक्तिवाद केला.

बॅकेतर्फे ॲड. श्रीपाद खुर्जेकर यांनी सादर केलेला युक्तीवाद पुढील प्रमाणे:-

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी त्यांचे दि. २० मे २००२ रोजी आदेश पारीत करुन बँकेच्या रुपये ५.६५ कोटी रुपयांचे झालेल्या आर्थिक नुकसानीस बँकेच्या कोणकोणत्या व्यक्ती जबाबदार आहेत,या साठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी आदेश पारीत करण्यात आले. सदरचा आदेश सन १९९९-२००० व २०००-२००१ या कालावधी चा वैधानिक लेखापरिक्षण अहवाल तसेच जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांचा तपासणी अहवाल व विशेष लेखापरिक्षक यांचा दि. १०/०५/२००२ चा विशेष अहवाल याच्याआधारे पारीत करण्यात आलेला आहे. सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या खालील नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदवलेली सहकारी संस्था असून सदर बँकेचे कामकाज रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया ,सहकारी संस्थाच्या निबंधकाच्या नियंत्रणाने चालते. सदर बँकेचे कामकाज हे बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९, रिझर्व्ह बँक व सहकारी संस्थाचे निबंधक यांनी वेळोवेळी जारी केलेली परिपत्रके, सहकार कायदा, नियम व बँकेचे पोटनियम यानुसार करणे बंधनकारक आहे. बँकेने सरकारी रोख्यामध्ये गुंतवणुक केलेली आहे.

(Book 1 & 2) Computer Generated Page 418 of 484

डिसेंबर १९९९ पासुन बँकेने सरकारी रोख्यामध्ये गुंतवणुक केलेली होती. "रोख्यांच्या खरेदीव्यवहारामध्ये बँकेस रुपये ५.६५ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झालेले आहे. सदरचे नुकसान हे बँकेच्या कृत्यामुळे व बँकेच्या दुर्लक्षामुळे झालेले आहे." असे सन १९९९-२०००, २०००-२००१ व २००१-२००२ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व विशेष अहवालातही निरीक्षण नोंदविले आहे. डिसेंबर १९९९ ते २००२ या कालावधीत बँकेने सहकारी रोख्यामध्ये गुंतवणुक केलेली आहे. सदरच्या गुंतवणुकीचे खरेदी व विक्री चे व्यवहार हे सरव्यवस्थापक व बँकेचे अध्यक्ष यांनी हाताळलेले आहे. बँकेकडे असणाऱ्या निधीची रक्कम रोखे खरेदी साठी गुंतवायची असते व ती दोन पध्दतीमध्ये गुंतविता येते .सदरची रोखे खरेदी ही एसजीएल मोडमध्ये करावयाचे असून त्याबाबतच्या कॉन्ट्रॅक्ट नोटस या शेअर ब्रोकरशी करावयाच्या असतात. सदरच्या गुंतवणुकीची रक्कम ही ब्रोकरकडे दिली जाते .ज्यावेळेस सदरचे रोखे एसजीएल मोडमध्ये घेतले जातात, त्यावेळेस बँकेमार्फतच त्यांस रक्कम अदा केली जाते. तथापी ब्रोकर मार्फत जर बँकेसाठी रोखे खरेदी केले तर सदर रोख्याची फिजीकल डिलीव्हरी होते. नागरी सहकारी बँकेने करावयाच्या गुंतवणुकीबाबत काही बंधने घातली आहेत. बँकेच्या नेट डिमाड अॅन्ड टाईम लायबीलीटीच्या १२.५ टक्क्यापर्यंत अशी गुंतवणुक करावयाची असते. दि. ३१/०३/२००२ रोजी बँकेचे एनडीटीएल रुपये २०४.३८ कोटी इतके होते. रिझर्व्ह बँकेच्या दि. २२/१०/२००१ रोजीच्या परीपत्रकानुसार एनडीटीएल च्या १२.५ टक्के नुसार ही रक्कम २५.५० कोटी इतकी रक्कम येते व सदरच्या रक्कमेची गुंतवणुक सरकारी रोख्यामध्ये करणे आवश्यक असताना देखील रुपये ४५,२१,८७, ०००/- इतक्या रक्कमेची गुंतवणुक बँकेने केलेली आहे. बँकेने एसजीएल चे खाते एचडीएफसी बँकेमध्ये उघडलेले आहे. सदर खात्यामधुन रोखे गुंतवणुकी बाबत केलेल्याचा खातेउतारा सादर केलेला आहे. सदर खातेउतारा लेखापरिक्षक व तपासणी अधिकारी यांनी देखील त्याचा आधार घेतलेला आहे. बँकेने वेगवेगळया ब्रोकर मार्फत सरकारी रोख्यामध्ये गुंतवणुक केलेली आहे. संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकी मध्ये सदरच्या रोख्यामध्ये गुंतवणुक करण्याचे निर्णय घेण्याचे अधिकार संचालक मंडळाने बँकेचे अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना दिल्याचे ठरावाने दिलेले आहे. त्यानुसार अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांनी निर्णय घेतलेले आहेत. त्याबाबतचे ठरावाच्या इतिवृत्ताच्या प्रती दाखल केलेल्या आहेत. संचालक मंडळाच्या दि. ३०/०४/२००१, ३०/०६/२००१, ०५/०९/२००१, २४/०१/२००२, ११/०२/२००२, ०५/०३/२००२, ११/०३/२००२, २६/०३/२००२, २२/०४/२००२ व २६/०४/२००२ रोजी झालेल्या बैठकांमध्ये त्याबाबत ठराव पारीत करण्यात आलेले आहेत. सदरचे ठराव हे सदरच्या व्यवहारा बाबतचे व त्याबाबत घेतलेल्या निर्णया बाबतचे आहेत. सदरच्या ठरावाच्या प्रती दाखल केलेल्या असुन तो पुरावा आहे. रिझर्व्ह बँकेने दि. १९/०४/२००१, ०९/०८/२००१, २२/१०/२००१ रोजी जारी केलेली परीपत्रके बँकेने सादर केलेले आहेत. सदरची परिपत्रके ही इतर बँकांप्रमाणे सुवर्णयुग सहकारी बँकेवर देखील बंधनकारक आहेत. दि. १९/०४/२००१ व ०९/०८/२००१ रोजी रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या परिपत्रकांमध्ये सदरची गुंतवणुक ही

(Book 1 & 2) Computer Generated Page 419 of 484

एसजीएल मार्फतच केली जावी अशा सुचना आहेत. त्यानुसार बँकेनेही ब्रोकरशी कॉन्ट्रॅक्ट नोट केल्यावरही गुंतवणुक ही एसजीएल मोडमध्ये केलेली आहे. बँकेने नफा मिळविण्यासाठी असा व्यवहार केलेला आहे. बँकेच्या संचालक मंडळाचा दि. ३०/०४/२००१ रोजी झालेल्या सभेमध्ये सरकारी रोखे खरेदी विक्री बाबतचे निर्णय घेण्यासाठी बँकेचे अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना प्राधिकृत केलेले होते. व सदरचा निर्णय संचालक मंडळाचा सभेमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात यावा असा ठरावही पारीत करण्यात आलेला आहे. सहाजीकच या दोघांनीही रिझर्व्ह बँकेच्या परीपत्रकानुसारच निर्णय घेणे अपेक्षित आहे. रोखे गुंतवणुकीचे व्यवहार हे फिजीकल मोड अथवा एसजीएल मोड मध्ये करण्यात यावे असे इतिवृत्तांमध्ये नमुद आहे. ब्रोकरशी कॉन्ट्रॅक्ट नोट क[illegible] देखील बँकेस रुपये ५.६५ कोटीचे रोखे मेसर्स. होम ट्रेड लि. यांचे कडून प्राप्त न झाल्याने बँकेचे सदर रकमेच नुकसान झालेले आहे. बँकेने मेसर्स होम ट्रेड लि.यांचे शी केलेल्या कराराच्या प्रती सादर केलेल्या आहेत. बँकेस करार केल्यानंतर १-२ आठवडयाच्या आत सदर रोखे मिळणे आवश्यक होते. त्या प्राप्त न झाल्याने बँकेस नुकसान झालेले आहे. बँकेने लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती तपासणी अहवाल, इतिवृत्तांच्या प्रती, कॉन्ट्रॅक्ट नोटस, रिझर्व्ह बँकेचे परिपत्रके, पोटनियमाची प्रत सादर केलेली आहे. सदरची घटना घडल्यानंतर बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडीया, सहकार खाते यांना कळविले त्यांच बरोबर दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. मे. होम ट्रेड लि. यांचे विरुध्द फौजदारी कारवाईदेखील केलेली आहे. अर्बीट्रेशन प्रोसिडींग करुन वसुली आदेश मिळविलेला आहे.मात्र सदरच्या रुपये ५.६५ कोटी व त्यावरील व्याज इतक्या रक्कमेची वसुली करण्यासाठी बँकेस अद्यापही यश आलेले नाही. त्यामुळे बँकेस तेवढया रक्कमेचे बँकेस आर्थिक नुकसान झालेले आहे. सन २००२ मध्ये बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्यावर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली होती. संचालक मंडळ, अधिकारी व लेखापरिक्षक यांचे वर देखील फौजदारी स्वरुपाची कारवाई झाली आहे. त्याबाबतचे कागदपत्रांच्या प्रती सहकार न्यायालयात सादर केलेले आहेत. मेसर्स. होम ट्रेड लि. यांचे विरुध्द आवश्यक ती सर्व कारवाई करण्यात आलेली आहे. या सर्व व्यवहारा बाबत बँकेचे अधिकारी श्री.सुनिल बारी यांनी पुराव्याचे पत्र सादर केलेले आहे. श्री. सुनिल बारी हे बँकेच्या मुख्यालयात सन १९९१ पासून क्लार्क म्हणून काम पहात होते. सन २००१ मध्ये त्यांना कनिष्ठ अधिकारी म्हणून पदोन्नती मिळाली. त्यांनी अकांऊटंट व शाखाधिकारी म्हणून काम पाहिले आहे. श्री.बारी याचा सरकारी रोखे खरेदी विक्री व्यवहाराच्या निर्णयामध्ये काहीही सबंध नाही. मात्र श्री.बारी यांना सदरचे झालेल्या व्यवहाराची माहीती आहे. रिझर्व्ह बँकेचे दि. २२/१०/२००१ चे परिपत्रक बँकेस प्राप्त झालेले होते. व सदर परिपत्रकाची माहीती सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांना देखील होती असे बारी यांनी उलटतपासणीतदेखील सांगीतले आहे. रिझर्व्ह बँकेच्या दि. २०/१०/२००१ च्या परिपत्रकानुसार कामकाज करण्याची जबाबदारी ही जनरल मॅनेजर काळे यांची होती. श्री. काळे यांनी दिलेल्या सुचना नुसार बँकेचे हिशोब लिहीले जात असत. श्री. काळे हे सुनिल बारी यांना तोंडी तसेच लेखी सुचना देत असत. श्री.काळे व

अधिकृत अधिकारी

ब्रोकर यांचे मध्ये व्यवहार झाल्यानंतर कॉन्ट्रॅक्ट नोटस् केल्या जात व कॉन्ट्रॅक्ट नोटस् मिळाल्यानंतर त्या हिशोब विभागाकडे दिल्या जात. तद्नंतर श्री.काळे यांनी विनंती केल्यावर उपाध्यक्ष त्याच्यावर सहया करीत. ज्यावेळी बँकेचे अध्यक्ष बँकेमध्ये त्यावेळेस सदरच्या रोखे खरेदी विक्रीच्या व्यवहाराबाबत व सदरच्या कॉन्ट्रॅक्ट नोटस् बाबत अध्यक्ष यांना श्री.काळे हे माहीती देण्यासाठी श्री.बारी यांना सांगत. अध्यक्ष बँकेत आल्यावर हिशोब विभागामध्ये बिले व पत्रे मंजूरी साठी श्री.काळे अध्यक्षांकडे पाठवित. हिशोब विभागाला श्री. काळे हे तोंडी सुचना देत असत. तसेच कॉन्ट्रॅक्ट नोटस् बाबत व्यवहाराच्या नोंद श्री.काळे यांचेकडून केली जात. श्री.काळे यांनी दिलेल्या सुचना नुसार रोखे खरेदी विक्री, त्यावर व्याज याची लेजरमध्ये नोंद घेत असे. कॅश लिक्वीडीटी रेशोचे रजिस्टर हे रोजच्या रोज लेखा विभागाच्या संबंधीत क्लार्क कडून लिहीले जात व ते जनरल मॅनेजर यांना सादर केले जात असे. पोटनियमातील तरतूद तसेच पध्दतीनुसार बँकेमध्ये ही रजिस्टर्स ठेवण्याची जबाबदारी जनरल मॅनेजर यांची होती. रिझर्व्ह बँकेच्या सुचनानुसार करावयाच्या गुंतवणुकी साठी ही रजिस्टर्स उपयोगी पड़त. सदरच्या रजिस्टर्सची तपासणी लेखापरिक्षक तसेच वैधानिक लेखापरिक्षक यांनी केलेले आहे. जनरल मॅनेजर श्री. काळे हे एकटेच आर.बी.आय.च्या सुचने नुसार करावयाच्या गुंतवणुकीबाबत निर्णय घेत असत. रिझर्व्ह बँकेच्या परिपत्रकानुसार बँकेने गुंतवणुक केली असल्यामुळे रिझर्व्ह बँकेचे परिपत्रकाचे उल्लंघन झालेले नाही. मात्र गुंतवणुकही एसजीएल मोडमध्ये करावयाचे ऐवजी फिजीकल मोडमध्ये केलेली आहे. दि. २६/०३/२००२ च्या संचालक मंडळाच्या सभेतील ठराव क्रं.चार नुसार बँकेने वादग्रस्त रुपये ५.६५ कोटी गुंतवणुकीचा व्यवहार केलेला आहे. बँकेने जे फिजीकल मोडमध्ये गुंतवणूक केलेली आहे. ती अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांनी केलेली आहे. ती ठरावानुसार केलेली आहे. बँकेच्या संचालक मंडळाने गुंतवणुकी बाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना दिलेले होते आणि ती दोघानीच केलेली आहे. मेसर्स होम ट्रेड लि. यांचे बरोबर केलेल्या गुंतवणुकी मुळे बँकेचे जे ५.६५ कोटी रुपयांचे जे नुकसान झालेले आहे. त्यानुकसानीस ते दोघे जबाबदार आहेत. गुंतवणुकी बाबतच्या काटेकोर छानणी करण्याची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी या नात्यांने अध्यक्ष व सरव्यवस्थापक श्री.काळे यांची आहे. केवळ संचालक मंडळाचे सदस्यांनी आरबीआय दि. १९/०४/२००१ रोजीचे परिपत्रकाची जाणीव करुण दिली म्हणून सरव्यवस्थापक श्री.काळे व अध्यक्ष काळोखे हे जबाबदारी टाळू शकत नाहीत. २००१ ते २००२ या कालावधीत फिजीकल मोडमध्ये एकूण चार व्यवहार झाले. त्याबाबत श्री.बारी यांनी उलटतपासणी मध्ये सांगीतले आहे. बँकेने जुन २००१ ते मार्च २००२ या कालावधीतल्या व्यवहाराचे उतारे सादर केलेले आहे. एकूण पाच वेळा व्यवहार झालेला आहे. बँकेस ८.०७ जीओआय २०१७ व ७.५० टक्के जीओआय २०१० हे सरकारी रोखे प्राप्त झालेले नाहीत हे कागदपत्रावरुन दिसून येते सदरचे दोन्ही व्यवहार हे वेगवेगळया तारखांना झालेले आहेत. पहीला व्यवहार हा दि. २०/०२/२००२ रोजी झालेला असून सरकारी रोखे खरेदी करुन तो दि. ३०/०३/२००२ रोजी त्याची विक्री

(Book 1 & 2) Computer Generated Page 421 of 484

केलेली आहे. ७.५० टक्के जीओआय २०१० हे रोखे दि. ३०/०३/२००२ रोजी खरेदी केले आहेत. बँकेस मे.होम ट्रेड लि.यांच्या मुळे आर्थिक नुकसान झालेले आहे. तालीकेवर असलेल्या बऱ्यांचा ब्रोकर्समध्ये मेसर्स. होम ट्रेड लि.यांचा समावेश आहे. जनरल मॅनेजर श्री. काळे यांना मेसर्स होम ट्रेड लि.चे श्री.केतन शेठ व शैलेश मेहता यांचे समवेत रोखे खरेदीच्या व्यवहारा बाबत बोलणी करण्यासाठी सांगण्यात आले होते. बऱ्यांचवेळा सदरची बोलणी दुरध्वनी वरुनच होत असे सरव्यवस्थापक श्री.काळे हे व्यवहार निश्चित करीत व त्या बाबतची चर्चा अध्यक्ष श्री.काळोखे यांचेशी करीत. सदरच्या रोख्याबाबत खरेदीची तारीख डिलीव्हरीची तारीख व्याजाचा दर विक्रीची तारीख याबाबतची माहिती देण्याबाबत कर्मचाऱ्यांना सुचना देण्यात येत असत. व तद्नंतर झालेल्या व्यवहाराची नोंद घेतली जात असे. सदरच्या व्यवहारास मंजूरी साठी अध्यक्ष श्री.काळोखे यांचेकडे पाठविले जात असे. तद्नंतर श्री. काळोखे व श्री.काळे हा व्यवहार पुर्ण करीत असत. अध्यक्ष श्री.काळोखे त्या व्यवहारास मंजूरी देत असत.बँकेमध्ये अशा व्यवहारास मंजुरी साठी संचालक मंडळाकडे अध्यक्ष यांचे कडे टिपणी पाठविण्याची पध्दत नव्हती. व्यवहार पुर्ण झाल्यावर श्री.काळे हे चेक्स देणे लेजर मध्ये नोंद घेणे याबाबतच्या सुचना श्री.काळे यांनी दिल्यावर त्याबाबतीच कार्यवाही कार्यालयामध्ये केली जात असे. या सर्वावर नियत्रंण व पर्यवेक्षण श्री.काळे यांचे होते हे सत्य आहे. एसजीएल किंवा फिजीकल मोडमध्ये करावयाच्या गूंतवणुकीचा निर्णय श्री.काळे यांचा होता. जून २००१ ते मार्च २००२ या कालावधीत जे व्यवहार झाले त्यास सदरव्यवहार झाल्यावर संचालक मंडळाची कायोत्तर मान्यता घेण्यात आली आहे.दि.३०/०३/२००२ रोजी झालेल्या व्यवहाराचे सरकारी रोखे बँकेस मिळालेले नाहीत. संचालक मंडळाच्या दि. २६/०३/२००२ रोजी झालेल्या सभेमध्ये गुंतवणूक ही फिजीकल मोड मध्ये करावी असा ठराव पारीत करण्यात आलेला आहे. व दि. ०६/०४/२००२ च्या ठरावामध्ये कार्यत्तर मंजुरी घेतली आहे. श्री. काळोखे यांची उलटतपासणी झालेली आहे. व त्यांनी पुरावाही सादर केला आहे. श्री.काळोखे यांना रोखे खरेदी विक्री बाबतची कार्यपध्दती आहे. या बाबत त्यांना काहीही माहिती नसुन सदरचे सर्व व्यवहार सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी केलेले आहेत असे श्री.काळोखे यांनी उलटतपासणी मध्ये सांगण्याचा प्रयत्न केलेला आहे. श्री.काळे व श्री.काळोखे या दोघांची विधाने परस्पर विरोधी आहेत. अध्यक्ष व संचालक मंडळ सदस्य या दोहोंची ही जबाबदारी आहे असे श्री.काळे यांचे म्हणणे आहे. मात्र ती सिध्द होऊ शकत नाही. बँकेच्या सदर संचालक मंडळ सभाचे इतिवृत्तांस आव्हान दिलेले नाही. संचालक मंडळाची सभाही सरव्यवस्थापक बोलावीत .त्यासभेमध्ये विषयांबाबत अध्यक्ष व उपाध्यक्ष चर्चा करीत व संचालक मंडळ उचलून धरत. सरकारी रोखे खरेदीविक्री व्यवहारास कार्योत्तर मंजुरी दिली जात असे. सरकारी रोखे खरेदीविक्रीबाबतचे अधिकार संचालक मंडळाने अध्यक्ष व जनरल मॅनेजर यांना दिलेले होते .निर्णय घेण्याची प्रक्रिया ही दि. ११/०३/२००१, ३०/०४/२००१, ०५/०४/२००१ रोजीच्या सभेच्या ठरावान्वये दिसून येते. तत्कालीन अध्यक्ष व जनरल मॅनेजर हे दोघेच निर्णय घेत व त्या निर्णयाची अंमलबजावणी लेखाविभाग करीत असे. सरव्यवस्थापक यांनी सुचना दिल्या

नंतर नोंद घेतल्यावर व अध्यक्षांनी सही केल्यावर सदरचा व्यवहार पुर्ण होत असे. बँकेस फक्त शेवटच्या व्यवहारामध्ये रुपये ५.६५ कोटी इतक्या रकमेचे नुकसान झालेले आहे. श्री.काळे यांनी कोणतीही साक्ष दिलेली नाही. तसेच बँकेने सिध्द केलेला पुरावा त्यांनी नाकारलेला नाही. झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करताना लेखापरिक्षण अहवाल व तपासणी अहवाल विचारात घेणे गरजेचे आहे. संचालक मंडळ बरखास्त झालेवर बँकेवर प्रशासक नेमण्यात आला प्रशासक नेमल्यावर सरव्यवस्थापक यांना निलंबित करण्यात आले. व त्यांची चौकशी ॲड. फटाले यांनी केलेली आहे. सदरचा चौकशी अहवाल दि. १५/०५/२००६ रोजी सादर केलेला असून श्री.काळे यांना ॲड.फटाले यांनी जबाबदार धरले आहे .श्री.काळे यांच्यावर पोटनियमान्वये तसेच संचालक मंडळाने ठरावाने ही जबाबदारी टाकलेली होती. आरबीआयने वेळोवेळी जारी केलेली परीपत्रके, निर्देश यांचा विचार करुन त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी श्री. काळे यांची होती. पोटनियम क्रं.४(८) व क्रं.४० अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करण्याची जबाबदारी श्री.काळे यांची होती. संचालक मंडळाची दि. ०५/०९/२००१ रोजीच्या ठरावान्वये दिलेले अधिकार श्री.काळे व चेअरमन श्री.काळोखे यांनी नाकारलेली नाही. मेसर्स होम ट्रेड लि. यांचे मार्फत जो रुपये ५.६५ कोटी रुपयांचा व्यवहार झाल्यामुळे झालेल्या नुकसानीस श्री.काळे व श्री.काळोखे हे जबाबदार आहेत. रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाच्या परिपत्रकांचे उल्लंघन करुन तसेच संचालक मंडळास त्याबाबतची पुर्ण माहीती न देता सर्व व्यवहार केलेला आहे. या सर्व बाबी पहाता सरकारी रोखे खरेदी विक्रीच्या या व्यवहारात ज्यांनी निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये भाग घेतलेला आहे. असे जबाबदार असणारे पदाधिकारी व अधिकारी यांचे विरुध्द योग्य ते आदेश व्हावेत.

अपचारी प्रवर्तक क्र.१ श्री. उल्हास काळोखे यांच्यावतीने ॲड. श्री. एस.व्ही.क्षीरसागर यांनी पुढीलप्रमाणे तोंडी युक्तिवाद केला :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मा. सहकार आयुक्त यांनी रोखे खरेदीमध्ये झालेल्या गैरव्यवहारामुळे बँकेचे जे नुकसान झालेले आहे .त्याची जबाबदारी निश्चित करणेसाठी प्रस्तुत आदेश जारी केलेले आहे. सदरच्या आदेशामध्ये अधिकाराचा गैरवापर ,तसेच सभासदांचा विश्वासघात असे आरोप ठेवण्यांत आलेले आहेत. सदर कृत्यास सर्वजण एकत्रितरित्या व सामुदायिकरित्या जबाबदार आहेत असा आरोपही ठेवलेला आहे. अध्यक्ष श्री. काळोखे व सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी जी कृत्ये केलेली आहे त्या कृत्यास संचालक मंडळही जबाबदार आहेत. सन १९९६ पासून बँकेस रोखे गुंतवणूकीमुळे भरपूर नफा झालेला आहे. प्रत्येक संचालकास या गुंतवणूकीबाबत माहिती आहे. जर हे कृत्य अध्यक्ष वा सरव्यवस्थापक करीत होते तर ते संचालक मंडळाने त्यांना का नाही थांबविले?. संचालक मंडळाने सादर केलेल्या म्हणण्यात ,तसेच प्रतिज्ञापत्रामध्ये "उपाध्यक्ष श्री. भट यांनी कॉन्ट्रक्ट

(Book 1 & 2) Computer Generated Page 423 of 484

(537)

नोटसवर जी सही केलेली आहे ती व्यक्तिगत क्षमतेत केलेली आहे "असे नमूद केलेले आहे. जर १९९६ पासून या गुंतवणूकीमुळे बँकेस नफा झालेला आहे तर आताच इतर संचालक मंडळ सदस्यअसा बचावात्मक पावित्रा कसे घेवू शकतात ?. जर गुंतवणूकीस परवानगी दिलेली आहे. याचाच अर्थ ते सर्वजण एकत्रित व सामुदायिकरित्या जबाबदार आहेत. या चौकशीत बँकेचे प्राधिकृत अधिकरी श्री. बारी यांनी जे उलटतपासणीत सांगीतलेले आहे ते महत्वाचे आहे. श्री. बारी यांनी उलटतपासणीमध्ये जे म्हटले नाही ,ते लेखी युक्तिवादामध्ये रेकॉर्डमध्ये आहे. चांगल्या कामासाठी जसे संचालक मंडळाने श्रेय घेतले आहे तर घडलेल्या दृष्यकृत्यासही सर्वजण जबाबदार आहेत. रोखे गुंतवणूकीचा निर्णय हा संचालक मंडळाने एकत्रितरित्या घेतलेला आहे. १९९६ पासून या गुंतवणूकीच्या व्यवहाराची तक्रार नाही. अध्यक्ष तसेच सरव्यवस्थापक यांनी रोखे खरेदीबाबतचा ठराव घुसडलेला आहे असे जे नमूद केलेले आहे त्या पृष्ठर्थ संचालक मंडळातील इतर सदस्य कोणताही कागदोपत्री पुरावा सादर करु शकले नाहीत. श्री. काळे यांनी मी मुख्य कार्यकारी अधिकारी नव्हतो ,त्यामुळे मी जबाबदार नाही असा जो बचाव घेतलेला आहे तो निश्चितच चुकीचा आहे. पोटनियमामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांची जबाबदारी निश्चित केलेली आहे. श्री. काळे यांचे पद नुसतेच महत्वाचे नाही तर श्री.काळे काय काम करत होते ,हे श्री. बारी यांच्या साक्षीमध्ये दिसून येते. बँकेचे अध्यक्ष हे बँकींग व्यवसायातील तज्ञ नसल्यामुळे, बँकेचे संचालक मंडळाने व सरव्यस्थापक यांनी कॉन्ट्रक्ट नोटसवर यांच्या सहया नाहीत असा जो बचाव घेतलेला आहे तो निश्चितच चुकीचा आहे. कॉन्ट्रक्ट नोटसवर जरी त्यांच्या सहया नसल्या तरी ते अप्रत्यक्षरित्या जबाबदार आहेत. दि. २२/०४/२००२ रोजी संचालक मंडळाचे सभासद यांनी त्याबाबतचे इतिवृत्त बँकेने दाखल केलेले आहे. जर बँकेने रु.४५ कोटी रुपयांची गुंतवणूक करुन फायदा झालेला आहे त्यामध्ये ते यश मात्र सर्वाचे आणि रु.५.६५ कोटी रुपयांचे नुकसान व त्यास मात्र अध्यक्ष जबाबदार आहेत असे कसे म्हणता येईल, मे. होम ट्रेड लि. हे दलांलाच्या नामतालिकेवर होते. बँकेस सुमारे रु.२० कोटींचा या रोखे गुंतवणूकीद्वारे फायदा झालेला आहे. बँकेने या गुंतवणूकी वेळोवेळी केलेल्या आहेत. अध्यक्ष ,उपाध्यक्ष व व्यवस्थापक यांना संचालक मंडळाने रु. ५.६५ कोटी रुपये गुंतवणूक करण्याचे अधिकार दिलेले होते. सदर व्यवहारामुळे बँकेची फसवणूक झालेली आहे, असे लक्षात आल्यावर संचालक मंडळाने दि. २२/०४/२००२ च्या संचालक मंडळ सभेच्या ठरावान्वये चौकशीसाठी श्री.शंकरराव सुर्यवंशी व चार्टर्ड अकौटंट शेखर साने यांची द्विसदस्यीय समिती नेमली. सदर समीतीचा अहवाल संचालक मंडळाच्या दि.२६/०४/२००२ च्या बैठकीत सादर केलेला आहे. सदरच्या समितीच्या अहवालात 'संचालक मंडळाच्या परवानगीने गुंतवणुकीचे सर्व व्यवहार हे सक्षम प्राधिकारी यांच्या परवानगीने व संचालक मंडळाच्या मंजुरीने परिपुर्ण आहेत.' असे नमूद केलेले आहे. जर सदरचा अहवाल संचालक मंडळावर संघर्षकारक आहे तर त्या संचालक मंडळाने श्री. काळोखे व श्री.काळे हे दोषी आहेत असे म्हणू नये दि. २६/४/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये हा अहवाल

CHIEF JUDICIAL MAGISTRATE
प्राधिकृत अधिकारी

स्विकारला गेलेला आहे. रोखे गुंतवणूकीबाबतचा विषय संचालक मंडळाच्या बैठकीच्या विषय पत्रिकेवर नव्हता ऐनवेळी विषय घुसडविलेले आहेत असा बचाव संचालक मंडळाने घेतला. दि २२/०४/२००२ च्या सभेत समिती नेमली गेली, दि .२६/०४/२००२ रोजी अहवाल दिला व तो अहवाल संचालक मंडळाने संचालक मंडळाच्या सभेमध्ये स्विकारला. या अहवालामध्ये अध्यक्ष श्री. काळोखे हेच दोषी आहेत असे कोठेही नमूद केलेले नाही. श्री. बारी यांचा सरतपास व उलटतपास महत्वाचा आहे. संचालक मंडळ हे बँकींगच्या व्यवसायामध्ये तज्ञ नाहीत. म्हणून आर.बी.आयचे परिपत्रकांचा अभ्यास करुन त्याची माहिती संचालक मंडळास देणे, दलांलाशी संपर्क करणे हे काम कोणत्याही संचालक मंडळाने करणे अपेक्षित नाही व ते सरव्यवस्थापक यांनीच करावयाचे आहे. जर चुकीची गुंतवणूक होत होती तर सरव्यवस्थापक यांनी कोणत्याही संचालक मंडळ सभेमध्ये त्यावर भाष्य का नाही केले? व ही गुंतवणूक का रोखली नाही?.सदरच्या व्यवहारात सर्वांचाही सक्रीय सहभाग आहे. खरेदी विक्रीचा दर हा सरव्यवस्थापक ठरवित असत. सदरच्या गुंतवणूकीसाठी बँकेने गुंतवणूक तज्ञ / सल्लागार अथवा समिती नेमलेली नव्हती. संचालक मंडळाने जे लेखी म्हणणे मांडलेले आहे त्यामध्येदेखील तफावत आहे. गुंतवणूक तज्ञ नेमले नसल्यामुळे सरव्यवस्थापक हेच त्यामध्ये तज्ञ असतात. रिझर्व बँकसुद्धा सरव्यवस्थापक यांच्याशीच संपर्क ठेवते. श्री. बारी यांच्या उलटतपासणीमध्ये श्री.बारी यांनी सांगीतले संचालक मंडळाची सभेचे इतिवृत्त सरव्यवस्थापक यांनी सूचना दिल्यावर लिहीत असत जर कार्योत्तर मंजूरी घेत होते तर सरव्यवस्थापकांवर संचालक मंडळाने कारवाई का केली नाही? मे. होम ट्रेड यांचेबरोबर केलेला पत्र व्यवहार हा श्री. काळे यांनी केलेला आहे. होम ट्रेड यांना सदरचे चेक देण्यासाठी सरव्यवस्थापक श्री.काळे जर चेक काढत असत. सन १९९९ पासून मे. होम ट्रेड बरोबर बँक व्यवहार करीत होती ती मान्यताप्राप्त होते. कॉन्ट्रक्ट नोटसवर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्या सहया आहेत असा जो संचालक मंडळाचा बचाव आहे तो चुकीचा आहे. श्री. काळे यांच्यापेक्षा कोणीही वरिष्ठ अधिकरी बँकेत कार्यरत नव्हता. पोटनियम क्र. ४० (अ) , (ब)(९) यानुसार गुंतवणूकीची जबाबदारी वरिष्ठ अधिकारी या नात्याने श्री. काळे यांची होती.ज्या दिवशी गुंतवणूकीची विक्री त्याच दिवशी खरेदी होत असे. संचालक मंडळाच्या ठरावान्वये रोखे खरेदी बाबतचे अधिकार अध्यक्ष व उपाध्यक्ष, सरव्यवस्थापक यांना दिलेले होते तर सहया या तिघांच्या का नाहीत?. सरव्यवस्थापक श्री.काळे जर जबाबदारी नाकारत आहेत त्यांनी त्यांचे लेखी म्हणणे तसेच प्रतिज्ञापत्र का दिलेले नाही. शपथेवर का म्हणणे दाखल केलेले नाही ?पुरावा का दिलेला नाही ?हे मुद्दे निश्चितच महत्वाचे आहेत. श्री. बारी यांनी दिलेले लेखी म्हणणे व त्यांनी दिलेल्या उलटतपासातील म्हणणे यामध्ये विसंगती आहे. श्री. काळोखे यांचे नाव लेखी म्हणण्यामध्ये आहे ,मात्र श्री बारी यांनी उलटतपासामध्ये कोठेही त्याबाबत सांगीतलेले नाही.गुंतवणूकीबाबतचे निर्णय श्री. काळोखे व सरव्यवस्थापक घेत असत असे चुकीचे नमूद आहे. रिझर्व बँकेच्या परिपत्रकाची कल्पना सरव्यवस्थापक श्री.काळे व बँक यांना होती. त्याबाबतची पूर्तता करणे याची जबाबदारी

(Book 1 & 2) Computer Generated Page 425 of 484

(61)

सरव्यवस्थापक श्री.काळे यांची होती. श्री. बारी यांनी सादर केलेल्या लेखी युक्तिवादामध्ये श्री. काळे यांचे नाव आहे. श्री. काळोखे यांचे नाव नाही. सरतपास पुरावा, उलटतपासणी यामध्ये जे आलेले नाही ते लेखी युक्तिवादात नाही. सरव्यवस्थापक श्री.काळे हे तोंडी सुचना देत असे असे परिच्छेद क्र. ८ ग मध्ये नमूद केलेले आहे . गुंतवणूकीबाबतचे दर देखील श्री. काळे ठरवत असत. श्री. काळे एकटेच या गुंतवणूकीबाबत निर्णय घेत असत.श्री. बारी यांच्या युक्तिवादातील परिच्छेद क्र. १० मध्ये बँक १९९६ पासून सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करीत होती असे नमूद केले आहे मात्र अध्यक्ष श्री. काळोखे हे एकटेच कसे दोषी आहेत?. लेखी युक्तिवादातील परिच्छेद क्र. ११ मध्ये पुढे असेली नमूद केले आहे की, सरव्यवस्थापक श्री. काळे हे मे. होम ट्रेड व श्री. मेहता यांचे बरोबर बोलणी करत. त्यानुसार काळे हे बँकेच्या कर्मचाऱ्यांना सूचना देत व त्यापुढील कार्यवाही करत. सूचना दिल्यानंतर अध्यक्ष श्री. काळोखे हे त्यास मंजूरी देत असत. बँकचे अध्यक्ष हे संचालक मंडळाचा एक भाग आहे. अध्यक्ष हे सभेचे इतिवृत्त लिहीत नाहीत. श्री. बारी यांच्या युक्तिवादातील परिच्छेदा क्र. १३ मधील संचालक मंडळास गुंतवणूकीबाबत नंतर माहिती दिली जायची असे जे नमूद केले आहे ते चुकीचे आहे. कारण त्यांना ती माहिती पटत नसे तर संचालकांना या सर्व गोष्टी वेळीच का नाही थांबविल्या श्री. बारी यांनी दिलेल्या उलटतपासात कोठेही म्हटलेले नाही की बँकेचे अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांच्या बैठका होत. मात्र ही बाब त्यांच्या लेखी युक्तिवादामध्ये आलेली नाही. जर श्री. काळे यांनी त्यांच्या म्हणण्या पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र दिलेले नाही, पुरावा दिलेला नाही, सरतपास उलटतपास दिलेला नाही तर सरव्यवस्थापक श्री.काळे जर श्री. काळे यांच्या म्हणण्यावर विश्वास कसा ठेवावयाचा? संचालक मंडळ सदस्यांनी श्री. शंकरराव सुर्यवंशी यांना या चौकशी कामी कुलमुखत्यारपत्र दिलेले आहे. जे काही श्री.सुर्यवंशी यांनी म्हटलेले आहे ते संचालक मंडळावर बंधनकारक आहे. सभेची इतिवृत्त पाहिले तर संचालक मंडळाने तसेच सरव्यवस्थापक यांनी विषयांकित रोखे खरेदी व्यवहाराच्या गुंतवणूकीस कोठेही विरोध केलेला दिसून येत नाही. श्री. सुर्यवंशी यांनी प्रतिज्ञापत्रात जो मजकूर लिहीलेला आहे ,त्याच्या विरुद्धच उलटतपासात सांगीतलेले आहे. जर संचालक मंडळ सभांना हजर होते तर त्या सभांच्या विषयपत्रिका काढलेल्याच नव्हत्या असे कसे म्हणतात? जर पाच विषयांकरिता सभा झाली व सहा विषय मंजूर झाले याचा अर्थ सदरची सभा बेकायदेशीर आहे असे म्हणावयाचे का? सदरची सभेस कोणीही आव्हान दिलेले नाही अगर सदरच्या सभा बेकायदेशीर आहेत असा कोणत्याही न्यायालयाने निकाल दिलेला नाही. कॉन्ट्रक्ट नोटसवरील श्री. उल्हास भट यांची सही व्यक्तिगत क्षमतेतीलआहे असे संचालक मंडळ म्हणत आहे. ती सही व्यक्तिगत कशी असू शकेल ?.जर संचालक मंडळाचे जे म्हणणे श्री. भट यांचे बाबतीत लागू आहे तर अध्यक्ष श्री. काळोखे यांच्या बाबतीत का लागू पडत नाही?. दि. २३/०८/२००१ रोजीच्या सभेत श्री. भट यांची उपाध्यक्ष म्हणून निवड झालेली आहे तर जून २००१ च्या कागदपत्रांवर श्री. भट यांच्या उपाध्यक्ष म्हणून सहया कशा? हाच बचाव अध्यक्ष श्री. काळोखे यांचे बाबतीत का लागू

(Book 1 & 2) Computer Generated Page 426 of 484

नाही. श्री. सुर्यवंशी यांच्या प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.२३ मध्ये असे नमूद केले आहे की, रोख्याचे व्यवहार स्वत:च्या अधिकारात अध्यक्षांनी केलेले आहेत असे नमदू केलेले आहे मात्र सदर व्यवहारास संचालक मंडळाने मान्यता दिलेली नाही असे नमूद केलेले आहे मात्र यामध्ये अध्यक्षांनी व्यवहार केलेा आहे हे नमूद केलेले नाही. या सर्व व्यवहारात सरव्यवस्थापक श्री. काळे यांचा गलथानपणा दिसून येतेा. सरव्यवस्थापक यांनी अध्यक्ष श्री. काळोखे यांना जाणूनबूजून अंधारात ठेवले आहे. संचालक मंडळाने दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांनी हात मिळवणी केली असे नमूद केलेले आहे मात्र त्यांच्या उलटपासामध्ये याबाबतचा उल्लेख केलेला नाही. पोटनियमानुसार गुंतवणूकीचे मूल्यमापन करण्याची जबाबदारी अध्यक्षांची नाही. श्री. सुर्यवंशी यांनी दिलेल्या उलटतपासामध्ये सदरचे व्यवहार सरव्यवस्थापक करीत होते असे सांगीतलेले आहे. संचालक मंडळ म्हणते की, हा गैरव्यवहार अध्यक्ष श्री. काळोखे व सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी केलेला आहे. सरव्यवस्थापक श्री.काळे म्हणतात की, हा सर्व व्यवहार संचालक मंडळाने केलेला आहे माझा संबंधही नाही,तर अध्यक्ष श्री. काळोखे म्हणणे आहे की या सर्व व्यवहारास सरव्यवस्थापक व सर्व संचालक जबाबदार आहेत. अध्यक्षांनी चांगल्या हेतूने काम पाहिले कोणत्याही प्रकारे दिरंगाई झालेली नाही. १९९६ पासून अशा गुंतवणूकीवर रु.४५ कोटींच्यावर नफा झालेला आहे. अध्यक्षांचे कोणतेही कर्ज नाही बँकेकडून अध्यक्षांच्या नातेवाईकांनाही कर्ज दिलेले नाही. केवळ या व्यवहारात दोषी केलेले आहे. सबब याबाबत योग्य निर्णय घ्यावा.

अपचारी प्रवर्तक क्र.२ ते १८ यांच्यावतीने ॲड. नांगरे यांनी युक्तिवाद केला तो पुढीलप्रमाणे :-

या चौकशीमध्ये वादग्रस्त कागदपत्रे समोर आलेली नाहीत सभेचा अजेंडा, इतिवृत्त, रक्कम दिल्याच्या पावत्या व इतर आवश्यक कागदपत्रांच्या योग्य प्रती आलेल्या नाहीत. या सर्व व्यवहारांमध्ये कोणी कोणी कागदपत्रांवर सहया केलेल्या आहेत ,कोणत्या प्रकारे व्यवहार करण्यात आले त्यावर नीटपणे प्रकाश पडलेला नाही. बँकेचे संचालक मंडळ कार्यरत असते, मात्र त्या संचालक मंडळातील सर्वच सदस्यांनी रोजचे कामकाज बँकेत उपस्थित राहून रोज पहावे हे अभिप्रेत नाही. म्हणून संचालक मंडळातील एका व्यक्तिस बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडलेले आहे व अध्यक्ष हे निर्णय घेतात. प्रशासनाचे कामकाज हे सरव्यवस्थापक यांनी पहावयाचे असते. विषयांकित व्यवहार हा अध्यक्ष व सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी केलेला आहे. त्याकालावधीत श्री. काळोखे हे अध्यक्ष म्हणून कामकाज पहात होते. पोटनियम क्र. ४(८) नुसार सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे हे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कामकाज पहात होते. निर्णय घेण्यासाठी सरव्यवस्थापक श्री. काळे यांची परवानगी आवश्यक होती. घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करताना श्री. काळे यांची भूमिका अनिवार्य होती. सरव्यवस्थापक श्री.काळे यांच्या प्रत्यक्ष सहभागाशिवाय किंवा संमती

(Book 1 & 2) Computer Generated Page 427 of 484

(15)

शिवाय कोणतेही कामकाज शक्य नव्हते. सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी कैफियत अथवा प्रतिज्ञापत्राद्वारे स्पष्ट भूमिका या चौकशीत मांडलेली नाही. तसेच सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी स्वतःला उलटतपासणीसाठी उपलब्ध करुन दिलेले नाही. सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी शपथेवर पुरावा देण्याचे जाणिवपूर्वक लेखी / तोंडी पुरावा देण्याचे टाळलेले आहे. या चौकशी दरम्यान श्री. काळे हे वैयक्तिकरित्या वकीलांसह हजर आहेत. अध्यक्ष व संचालक मंडळ यांचा पुरावा नोंदविण्यासाठी श्री. काळे यांनी सहभाग घेतलेला आहे मात्र त्यांनी जाणीवपूर्वक उलटतपास देण्याचे नाकारले आहे. इंडियन इव्हिडंन्सस ॲक्टच्या कलम ११४ अन्वये जर उलटतपास देण्याचे अमान्य केले अथवा शपथेवर जर कथन केले नाही तर प्रतिकुल अनुमान (adverse interference)काढता येतो. सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी मा. सहकार न्यायालय क्र. १ येथे दावा क्र. १८४/२००८ हा बँके विरुद्ध तसेच तत्कालीन प्रशासक यांचे विरुद्ध दाखल केलेला आहे. तसेच सदर दाव्यामध्ये निशाणी .१२ वर बँकेने लेखी म्हणणे सादर केलेले आहे. निशाणी क्र. १७ वर श्री. काळे यांनी जे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे त्यावर बँकेच्या वतीने ॲड. खुर्जेकर यांनी उलटतपास घेण्यात आलेला आहे. निशाणी क्र. १८७- अ वर बँकेचे प्राधिकृत अधिकारी श्री. बारी यांचा सरतपास व उलटतपास झालेला आहे. निशाणी क्र. १९३ -अ अन्वये विशेष लेखापरिक्षक यांचा सरतपास व उलटतपास झालेला आहे. मात्र या दाव्यामध्ये संचालक मंडळ पक्षकार नाही. संचालक मंडळाविरुद्ध कोणतीही मागणी नाही. सदरचा वाद हा बँकेच्या विरुद्ध असून बँकेविरुद्ध दावा दाखल केलेला आहे या दाव्याबाबतची माहिती या प्राधिकृत अधिकाऱ्यांसमोर सादर केलेली नाही व का सादर केलेली नाही याबाबत स्पष्टीकरणही दिलेले नाही. बँकेच्या वतीने सुरुवातीच्या काळात सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी फौजदारी तक्रार दाखल केलेली होती. मा. सहकार न्यायालयातील वाद क्र. २८४/२००८ व फौजदारी तक्रार या दोन्हीही तक्रारी श्री. काळे यांनी दाखल केलेल्या आहेत. मा. सहकार न्यालयात दाखल केलेला दावा हा श्री. काळे यांनी व्यक्तिगतरित्या दाखल केलेला आहे. तर फौजदारी दावा हा बँकेचे सरव्यवस्थापक या नात्याने दाखल केलेला आहे. दोन्ही दाव्यामध्ये श्री.काळे यांनी प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे व त्यामध्ये श्री. काळे यांनी बँकेच्या दैनंदिन कामकाजात सहभाग मान्य केलेला आहे. श्री. काळे यांना बँकेच्या कामकाजासाठी सर्व समावेशक माहिती असल्याचे नमूद करुन दोन्ही दाव्याचे काम केलेले आहे. श्री. काळे यांना बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून व्यवहारातील प्रत्येक कृतीची माहिती होती. संचालक मंडळाने ठरावाद्वारे आर बी आय च्या निर्देशानुसार रोख्याचे व्यवहाराबाबतचे अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. काळे व अध्यक्ष श्री. काळोखे यांना दिलेले होते. त्यानुसार दि. २२/०४/२००२ रोजी बँकेची रोखे व्यवहारात फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यावर संचालक मंडळाने तत्परतेने होम ट्रेड लि. यांचे विरुद्ध दिवाणी दावा दाखल केला. पोलिसांकडे देखील तक्रार नोंदविली. फसवणूकीबाबतच्या तक्रारीची गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी झाली आहे असे संचालकांचे म्हणणे आहे. गुन्हे अन्वेषण विभाग, तसेच पोलीस या

प्राधिकृत अधिकारी

330

सक्षम व सर्व तपासाचे सर्व हक्कांनी परिपूर्ण यंत्रणेमार्फत सखोल तपास झाल्यावर श्री. काळोखे व श्री. काळे यांचे विरुद्ध गुन्हा दाखल झालेला आहे. त्यांना त्यांचेमध्ये अटक होवून तुरुंगवास झालेला आहे. त्याचेविरुद्ध आरोपपत्र दाखल झाले त्याच फौजदारी खटल्यान्वये प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र.४ यांचे कोर्टामध्ये भारतीय दंडविधान कलम ४०९, ४२०, ४६८ अन्वये बाब न्यायप्रविष्ठ झालेली आहे. संबंधीत सक्षम यंत्रणांकडून सखोल तपास होवूनही संचालकांतील कोणत्याही सदस्यांस जबाबदार धरण्यांत आलेले नाही. रोख्यांच्या गैरव्यवहारास बँकेचे अध्यक्ष श्री. काळोखे यांनाच केवळ जबाबदार धरले नसुन सरव्यवस्थापक श्री.काळे यांचेविरुद्धही फौजदारी खटला देखील न्यायप्रविष्ठ आहे. पोलीस अथवा गुन्हे अन्वेषण विभाग यांनी देखील संचालक मंडळास जबाबदार धरले नाही. रोख्यांचे व्यवहार करताना दलालास रोख्यांची रक्कम देण्याचे कोणतेही अधिकार संचालक मंडळाने मुख्य कार्यकारी अधिकारी व अध्यक्ष यांना दिलेले नव्हते. व त्याबाबतचा ठरावही केलेला नाही. नियमबाह्य पद्धतीने श्री. काळे व श्री. काळोखे यांनी रोखे खरेदी व्यवहाराचे पैसे मे. होम ट्रेड कंपनीस दिले. रोख्यांचा व्यवहार करताना काळजी घेण्याची आवश्यकता असताना देखील बँकेच्या वतीने या दोघांनी काळजी घेतलेली नाही. दलालास पैसे दिल्याची बाब संचालक मंडळापासून लपवून ठेवली. रोख्याबाबत फसवणूक झाली आहे अशी कल्पना संचालक मंडळास दि. २२/०४/२००२ रोजी झाली. त्याअगोदर रोख्यांबाबतचे व्यवहार आर्थिक व्यवहाराची गणिते, आर्थिक व्व्हारातील तज्ञ म्हणून श्री. काळे यांनी श्री. काळोखे यांचेबरोबर विचार करुन त्यांचे संमतीने बँकेकरीता कायदेशीरपणे करावयाची होती. संचालक मंडळ रोख्यांबाबतच्या आर्थिक व्यवहारात तज्ञ नाहीत. तसेच आर्थिक विशेषतः रोख्यांबाबतचे व्यवहार करताना संचालक मंडळाच्या ठरावानुसार रोख्यांबाबतचें व्यवहार झाल्यानंतर होण्याऱ्या नंतरच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये रोखे व्यवहार करीत असल्याबाबतची माहिती श्री. काळोखे व श्री. काळे यांनी संचालक मंडळास सभेत दिल्यावर त्यास संचालक मंडळाची कार्यात्तर मंजूरी घेण्याची कायदेशीर पद्धत निश्चित करण्यात आलेली होती. त्यानुसार अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना अधिकार देण्याचा ठराव पारित केलेला होता. रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार रोखे गुंतवणूकीचे प्रमाण व व्यवहाराची रक्कम निश्चित करण्याचे सर्वाध्किार मुख्य कार्यकारी अधिकरी म्हणून श्री. काळे व अध्यक्ष श्री. काळोखे यांचेकडेच होते. दि. ०५/०९/२००१ च्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्र. ३ अन्वये सरकारी रोखे खरेदी व्यवहार करण्याचे सर्वाधिकार सरव्यवस्थापक श्री. काळे व अध्यक्ष श्री. काळोखे यांना देवून सदर दोघांनी अगोदर केलेल्या व्यवहारांची माहिती व मंजूरी संचालक मंडळाच्या पुढील सभांमध्ये संचालक मंडळास देण्यांचे निश्चित करण्यांत आलेले होते. रोखे खरेदी व्यवहारांच्या खरेदी विक्रीच्या नोटस् वर सहया करण्याचे अधिकार संचालक मंडळास कधीच नव्हते. सहकार तज्ञ / आर्थिक तज्ञ म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी / अध्यक्ष या नात्याने संपूर्ण जबाबदारी श्री. काळे व श्री. काळोखे यांची आहे. बँकेच्या दैनंदिन कामकाजातील तसेच कामकाजाच्य नियमावलीतील बँकेशी संबंधीत म्हणून ,

NATIONAL COOPERATIVE JUDICIAL MAGISTRATE
अधिकृत अधिकारी

33

संचालक म्हणून तसेच अध्यक्ष म्हणून संपूर्ण माहिती व ज्ञान श्री. काळोखे यांचेकडे आहे. बँकेशी संबधीत ते ३५ ते ४० वर्ष आहेत. बँकेबाबत अनभिज्ञता होवू शकत नाही. सरव्यवस्थापक श्री.काळे जर श्री. काळे देखील ३० ते ३५ वर्ष नोकरीस होते. त्यानीदेखील विविध पदांवर दैनंदिन रित्या याच बँकेत काम केलेले आहे. ते अनेक पदांवर काम करीत तसेच बँकेच्या विविध विभांगांची सखोल माहिती घेत. श्री. काळे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कामकाज पाहिलेले आहे. काळे यांचा बँकेबरोबरील प्रदिर्घ कामामुळे श्री. काळे यांना बँकेच्या संपूर्ण कामकाजाची महिती व नियमावली यांचे सखोल ज्ञान आहे. श्री. काळे व श्री. काळोखे यांनी त्यांचेकडे असलेले बँकेच्या कामकाजाचा प्रचंड अनुभवाचा व संचालक मंडळावर अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांचेवर टाकलेल्या विश्वासाचा गैरफायदा घेवून बँकेची फसवणूक करुन रोखे खरेदी व्यवहार केलेली आहेत. संचालक मंडळाच्या कार्यात्तर मंजूरीशिवाय बँक व्यवस्थापनाने होम ट्रेड कंपनीस रोखे व्यवहारातील रकमा अदा केलेल्या आहेत. संचालक मंडळ सभेच्या अजेंडयावर कर्ज रोख्याबाबतचा विषयाचा अंतर्भाव नाही. दि. २९/०३/२००३ व २२/१०/२००२ या कालावधीचे जबाब पाहण्यांत आले. सभा बोलवणे सभेची विषय पत्रिका निश्चित करणे याबाबतचे सर्व अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. सन २००१ ते २००२ या कालावधीमध्ये बँकेच्याएकूण २३ सभा झालेल्या आहेत. सभेच्या विषयपत्रिकेमध्ये सभेचा अजेंडयांवर कर्ज रोख्याबाबतचा एकदाही विषय आलेला नाही व कार्यात्तर मंजूरीस देखील नाही. ऐनवेळेच्या विषयामध्ये ठराव घुसडविलेले आहेत .या सर्व बाबीची वस्तुस्थिती श्री. काळे, श्री. काळोखे व बँकेचे प्राधिकृत अधिकारी यांनी देखील नाकारलेली नाही सबब त्यानां हे मान्य आहे. दि. ०५/०२/२००२ रोजीची सभेच्या विषयपत्रिकेवर सही नाही. प्रस्तुत चौकशी कामी माहिती देण्याचा प्रामाणिक प्रयत्न संचालकांनी केलेला आहे. पोलीस किंवा गुन्हे अन्वेषण विभाग यांचेकडून कागद पत्रे मागण्याचा अधिकार बँकेचा आहे. संचालकांनी दाखल केलेले म्हणणे प्रतिज्ञापत्र व युक्तिवाद यांमध्ये काहीही बदल केलेला नाही. या सर्वांच्या प्रती यापूर्वीच सर्वांना दिलेल्या आहेत व त्याबाबत काहीही वाद नाही. सभांबद्दल , विषयपत्रिका इतिवृत्त यांबाबत प्रतिज्ञापत्रामध्ये जी माहिती दिलेली आहे ती खोटी आहे असे कोणीही म्हटलेले नाही. सभेची विषय पत्रिका इतिवृत्त लिहिण्याची तसेच सभेच्या कामकाजा विषयाबाबतचे सर्वाधिकार अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आहेत. संचालकांच्या प्रतिज्ञापत्रातील सभांचे बिषय पत्रिका , ठराव इतिवृत्त व कायदेशीरपणांच्या विसंगती ज्या संचालकांनी चौकशी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणलेल्या आहेत त्याचुकीच्या किंवा दिशाभूल करण्या-या आहेत असे श्री. काळोखे किंवा श्री. काळे यांचे म्हणणेदेखील नाही. रोखे खरेदीचे विषय व ठराव हे ऐनवेळच्या विषयामध्ये विषय घुसडवून ठराव पारित करण्यांत आलेले आहेत. दि. ०६/०४/२००२ च्या सभेचे दोन वेगवेगळे ठराव आहेत. सदरचा ठराव पारित करताना गणसंख्या अगर बहुमत नमूद केलेले नाही. दि. २६/०३/२००२ रोजी सभांच झालेली नाही हे श्री. काळोखे, श्री. काळे व श्री. बारी यांनी नाकारलेले नाही. सदरच्या सभेची

NATIONAL CHIEF JUDICIAL MAGISTRATE
अधिकृत अधिकारी

332

(११)

विषयपत्रिकादेखील नाही. मात्र त्याचे इतिवृत्त लिहीण्यात आलेले आहे. रिझर्व बँकेचे दि. १९/०४/२००१ चे सरकारी रोख्यामध्ये गुंतवणूक करण्याबाबतचे जे परिपत्रक आहे ते परिपत्रक संचालकांच्या निदर्शनास आणलेले नाही. दि. २८/०६/२००१ रोजी जो व्यवहार केलेला आहे त्याच्या मंजूरीस अध्यक्ष श्री.काळोखे यांची सही असून अध्यक्ष श्री.काळोखे यांनी हे नाकारलेले नाही. दि. ०१/०८/२००१ च्या मंजूरीस देखील अध्यक्ष यांची सही व शिक्का आहे. कॉन्ट्रक्ट नोटवरील सहया या अध्यक्ष यांच्या आहेत. तत्कालीन उपाध्यक्ष श्री. उल्हास भट यांना सहीचे अधिकार आहेत किंवा नाही याची खातरजमा न करता श्री. भट यांची सही घेण्यात आलेली आहे. श्री. उल्हास भट यांची उपाध्यक्ष पदावर दि. २३/०८/२००१ च्या संचालक मंडळ सभेत निवड झालेली आहे मात्र दि.२८/६/२००१ व ०१/०८/२००१ रोजीच्या कॉन्ट्रक्ट नोटवरील सहया श्री. उल्हास भट यांच्या आहेत. या कॉन्ट्रक्ट नोटस खोट्या आहेत. उपाध्यक्ष यांनी ज्या सहया केलेल्या आहेत त्याचे टिपण अथवा शेरे देखील नाहीत. कॉन्ट्रक्ट नोट बाबतचे विस्तृत विश्लेषण हे प्रतिज्ञापत्रात केलेले आहे तसेच या युक्तिवादात देखील नमूद केलेले आहे. मात्र या सर्व बाबी श्री. काळे , श्री. काळोखे व श्री. बारी यांनी नाकारलेले नाही. अगर ते चुकीचे वा खोटे असल्याचे नमूद केलेले नाही. बँकेने परिपत्रकानुसार रुपये २५.५० कोटी इतकी रक्कम सरकारी रोख्यामध्ये गुंतववयाची होती मात्र ते परिपत्रक मंडळाच्या निदर्शनास न आणता रुपये ४५ कोटीची गुंतवणूक केलेली होती. दि. ०५/०९/२००१ रोजी संचालक मंडळाने जो ठराव केलेला आहे त्या अनुसरुन श्री. काळे व श्री. काळोखे यांनी कृती केलेली नाही. सरव्यस्थापक श्री. काळे यांनी दिलेल्या निर्देशास अनुसरुन मे. होम ट्रेड लि. यांना रक्कम अदा करण्यात आलेली आहे. सरव्यवस्थापक श्री.काळे जर श्री. काळे यांनी रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांविरुद्ध बेजबाबदारपणे , संचालक मंडळास कोणतीही माहिती न देता व्यवहार केले असून श्री. काळे व श्री. काळोखे यांनी ठरावाविरुद्ध , रिझर्व बँकेच्या निर्देशाविरुद्ध केलेल्या गैरव्यवहारास, बँकेच्याझालेल्या फसवणूकीस संचालक मंडळ कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. बँकेचे पोटनियम क्र. ४(८) व पोटनियम क्र. ३६व ४० हे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या जबाबदारीशी संबंधीत आहे मात्र श्री. काळे व श्री.काळोखे यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये सदरची जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न केलेला आहे. अध्यक्ष श्री. काळोखे यांनी दिलेल्या उलटतपासामध्ये माहिती नाही , आठवत नाही, समजत नाही अशी त्यांच्या अनुभवाला, पदाला, ज्ञानाला तसेच वयाला न शोभणारी उत्तरे दिलेली आहे. गैरव्यवहार उघडकीस येवू नये म्हणून जाणिवपूर्वक अशी उत्तरे दिलेली आहेत. सदरची उलटतपास देत असताना युक्तिवादावेळी पुरावे सादर करेन ,असे श्री. काळोखे यांनी ठाम पणे सांगीतलेले होते मात्र ते सादर केलेले नाहीत. उलटतपास झाल्यानंतर आज अंतिम युक्तिवाद सादर केल्यानंतर देखील सादर केलेले नाही. यामुळे त्यांनी उलटतपास देताना जाणिवपूर्वक श्री. काळोखे व श्री. काळे यांच्या गैरव्यवहाराचे कामी चौकशीचे कामी निष्पन्न होवू नयेत म्हणून जाणिवपूर्वक चुकीची उत्तरे दिली असल्याचे स्पष्ट होत आहे. मे. होम ट्रेड लि. यांना पैसे देण्याची काही आवश्यकता

337

(Book 1 & 2) Computer Generated Page 431 of 484

नव्हती. केवळ गैरव्यवहाराच्या उद्देशाने श्री. काळे व श्री. काळोखे यांच्या नियमबाह्य व बेकायदेशीर , गैरव्यवहारास संचालक मंडळ कोणत्याही प्रकारे जबाबदार नाहीत. दि. २२/०४/२००२ रोजी रोख्याबाबत झालेल्या फसवणूकीची माहिती संचालक मंडळास झाल्यानंतर तातडीने संचालक मंडळाच्या प्रभावी पुढाकाराने मा. दिवाणी न्यायालय यांचेकडे मे. होम ट्रेड लि. यांचे विरुद्ध वसूली दावा दाखल केलेला आहे तसेच मे. होम ट्रेड विरुद्ध लवाद प्रकरण तसेच पोलीस व मा. न्यायालय यांचेकडे फौजदारी तक्रारी कायदेशीपणे आवश्यक असल्यामुळे कायदेशीर कृती म्हणून करण्यांत आलेल्या आहेत यापैकी लवाद प्रकरणांचा निर्णय बँकेच्या बाजूने झालेला आहे. बँकेत कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेची माहिती या चौकशी अधिकाऱ्यांसमोर सादर केलेली नाही. बँकेने मा. लवाद न्यायालय, मा. फौजदारी न्यायालय, व मा. सहकार न्यायालय यांचसमोर रोखे व्यवहाराबाबत कायदेशीर प्रकरणांची माहिती तसेच सरव्यवस्थापक श्री. काळे यांच्याशी संबंधीत असलेली न्यायालयीन प्रकरणांची माहिती स्वत:हून चौकशी अधिकाऱ्यासमोर चौकशीकामी दिलेली नाही. वरील सर्व कोर्ट प्रकरणांमध्ये संचालकांविरुद्ध ठपका ठेवण्यांत आलेला नाहीत तसेच संचालकांना कोणत्याही प्रकारे संबंधीत म्हणून जबाबदार धरण्यांत आलेले नाही. या रोखे गैरव्यवहरात संचालकांचा कोणताही संबंध नाही. रोखे व्यवहारास संचालक मंडळ कोणत्याही प्रकारे जबाबदार नाही. सबब हे सर्व संचालक निर्विवादपणे निर्दोष आहेत. तरी त्यांना दोषमुक्त करण्यात यावे.

अपचारी प्रवर्तक क्र.१९ श्री.सुरेश काळे यांच्या वतीने ॲड.कानेटकर यांनी पुढील तोंडी युक्तीवाद केला :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, यांनी दि. २०/०५/२००२ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये पारीत केलेला आहे. सदरच्या आदेशाचे अवलोकन केले असता मा.सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांनी सदरचा आदेश जारी करण्यापुर्वी बँकेचा सन १९९९-२०००, २०००-२००१ चा लेखापरिक्षण अहवाल, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचा तपासणी अहवाल तसेच विशेष लेखापरिक्षक यांचा अहवाल 'वाचले' मध्ये नमूद केले आहे. वैधानिक लेखापरिक्षण अहवाल, विशेष लेखापरिक्षक यांचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, यांचा अहवाल या सर्व अहवालामध्ये रोखे खरेदी विक्रीमुळे झालेले नुकसानीस सरव्यवस्थापक जबाबदार आहेत, असे कोठेही नमुद केलेले नाही. मा.सहकार आयुक्त यांचे आदेशामध्ये '(१) बँकेने रुपये ४५.३३ कोटी इतकी रक्कम सरकारी रोख्यात प्रत्यक्ष गुंतविली आहे. बँकेने आर बी आय निर्देशांचे उल्लंघन केले आहे. (२) बँकेने मे. होम ट्रेड लि. यांचे बरोबर केलेल्या व्यवहारापैकी रुपये ५.६५ कोटी इतक्या रकमेचे रोखे बँकेस प्रत्यक्ष त्यांचे कडून मिळालेले नाहीत व याबाबत बँकेच्या संचालक मंडळाने पुरेशी दक्षता घेतली नाही (३) मे.होम ट्रेड लि. हे सदर व्यवहारासाठी सेबी मान्यताप्राप्त दलाल नसतानाही त्यांच्याशी व्यवहार केलेले आहेत. सदर व्यवहार करताना संचालक मंडळाने अधिकृत

सहकारी बँक मर्यादित पुणे अधिकृत अधिकारी

334

ब्रोकर्स मार्फत कोटेशन्स मागविलेले नाहीत. तसेच मे. होम ट्रेड लि. या व्यवहारात कोणताही करार केलेला नाही. बँकेचे एकूण रुपये ५.६५ कोटी व त्यावरील दि. ३१/०१/२००१ पासून व्याजाचे नुकसान झालेले आहे. संचालक मंडळाने बँकेच्या अर्थिक व्यवहारावर योग्य ते नियंत्रण ठेवलेले नाही ' असे निरीक्षण मा. सहकार आयुक्त यांनी त्यांच्या सदर आदेशामध्ये नोंदविलेले आहे. मा. सहकार आयुक्त यांनी बँकेच्या संचालक मंडळास जबाबदार धरलेले आहे. यात कोठेही सरव्यवस्थापक श्री.काळे यांच्यावर आरोप केलेले नाहीत. तसेच सदर आदेशामध्ये त्यांनी संचालक मंडळाने केलेल्या विविध कर्ज रोखे प्रकरणामूळे आर्थिक गैरव्यवहार आर्थिक अनीयमितता यास संचालक मंडळास जबाबदार धरले आहे. सबब या चौकशी मध्ये सरव्यवस्थापक श्री.काळे यांना जबाबदार धरता येणार नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७२(२) अन्वये नोटीस जारी करण्यापूर्वी ७२(१) मध्ये नमूद केलेली आवश्यक त्या सर्व बाबीची पुर्तता तत्कालीन प्राधिकृत अधिकारी यांनी करणे आवश्यक होते. कायद्यानुसार, नियम ७२(१) अन्वये कार्यवाही करणे आवश्यक होते. मात्र त्यांनी तसे केलेले नाही. महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ७२(२) अन्वये नोटीस जारी केलेली नाही. विश्वासघांताचा आरोप हा विश्वस्ताविरुध्द असतो. जर सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी त्यांच्या कर्तव्यमध्ये कसूर केलेली असेल तर त्याचा उल्लेख नियम ७२(१) अन्वये करावयाचा होती. नियम ७२(१) अन्वये तसा अहवाल दिलेला नाही. नियम ७२(१) अन्वये अहवाल देणे कायदेशीर रित्या बंधनकारक आहे. नियम ७२(२) प्रमाणे नोटीस दिलेली नाही .सदर नोटीसीत नियम नमुद केलेला नाही. केवळ कलम ८८ खाली नोटीस दिलेली आहे .सदर नोटीशीमध्ये मा.सहकार आयुक्त यांचे आदेशामधील भाग घातलेलाआहे .नोटीशीमध्ये संचालक मंडळाचा उल्लेख आहे. मात्र सरव्यवस्थापक श्री.काळे यांचा उल्लेख नाही. सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी सदर नोटीसीस दि. ०१/०७/२००२ रोजीच उत्तर दिलेले आहे .सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी अधिकाराचा दुरुपयोग केलेला नाही. दि. ०९/०७/२००२ रोजी पुन्हा एकदा नोटीस काढलेली आहे .सदरची नोटीस नियम ७२(२) नुसार सदर नोटीशीत "संचालक मंडळाच्या सभेमध्ये मंजूरी घेतल्याचे दिसून येते" असे नमुद केले आहे मात्र, सरव्यवस्थापक श्री.काळे जर यांचे विरुध्द काहीही नमुद केलेले नाही. मा. उच्च न्यायालय यांनी सदरचे दि. ०९/०७/२००२ रोजीची नोटीस रद्दबादल ठरवलेली आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० चे कलम चे ७३(१)(अ)(ब)नुसार झालेल्या कृत्यास समिती जबाबदार राहील .त्यामध्ये अधिकारी अथवा कर्मचारी यांचा उल्लेख नाही. केवळ संचालक मंडळ सदस्य जबाबदार आहेत. सरव्यवस्थापक श्री.काळे हे संचालक मंडळाचे सदस्य नाहीत. संचालक मंडळाचे कोणत्याही सदस्याने दि. ०९/०७/२००२ ची नोटीस आव्हानित केलेली नाही .म्हणजेच, संचालक मंडळाने हे मान्य केल्यासारखेच आहे. मा.उच्च न्यायालयान प्राधिकृत अधिकारी यांनी जारी केलेल्या नोटीसा रद्द केलेल्या आहेत. तरीही नवीन नोटीस जारी केलेली नाही. मा.उच्च न्यायालय यांनी सुचना करुन सुध्दा नियम ७२(१), ७२(२) प्रमाणे कार्यवाही नाही. आरोप एकदमच निश्चित केलेले आहेत .मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशात

(Book 1 & 2) Computer Generated Page 433 of 484

आरोपपत्र निश्चित करा ,असे कोठेही नमुद नाही. तत्कालीन चौकशी अधिकारी यांचे समोर सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी दि. ०१/०७/२००२ रोजी जे म्हणणे दाखल केलेले होते ते समाधानकारक नाही असे ,त्यांनी कोठेही म्हटले नाही. ही चौकशी पुर्णत: चुकीची बेकायदेशीर व आधारविरहीत आहे. सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे विरुध्द प्राधिकृत अधिकारी आरोप निश्चित करु शकले नाही. श्री.काळे यांच्यावर आरोप निश्चित केलेले नाहीत म्हणून त्यांनी पुरावा व साक्ष दिलेली नाही. महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ७३(१)(अ)(ब) अन्वये व्यवस्थापन समितीने बँकेचे धोरण निश्चित करावयाचे असते ,कामाकाजासाठी निर्णय घ्यावयाचे असतात मात्र सरव्यवस्थापक यांनी या सर्व निर्णयाची अमंलबजावणी करावयाची असते. बँकेचे पोटनियम ३६(८),३६(९), ३६(१६) मध्ये संचालक मंडळाचे अधिकार व काम दिलेले आहे. पोटनियम ३६(१६) नुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची नेमणूक संचालक मंडळ करते. पोटनियम क्रं.४० हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेशी संबंधीत आहे.मात्र श्री.काळे यांची नेमणूक मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून झालेली नव्हती संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अमंलबजावणी करणे हे पोटनियम क्रं.४० मध्ये नमूद केलेले आहे. जर संचालक मंडळाने पारीत केलेल्या ठरावाच्या व्यतिरिक्त जर श्री.काळे यांनी कृत्य केले असेल तर त्यांनी विश्वासघात केला असे म्हणता येईल. श्री.काळे यांच्या दि. २५/११/१९९९ च्या नेमणूक पत्रामधील अट क्रं. ४ चे अवलोकन व्हावे. सदर अटीमध्ये असे नमुद केलेले आहे कि, 'आपली नियुक्ती पोटनियम क्र.४०(अ) मधील मुख्य कार्यकारी म्हणुन होणार नाही'. दि. ०८/०३/२००३ रोजी श्री.काळे यांच्या विरुध्द जे तथाकथीत आरोप ठेवलेले आहेत ते पूर्णत: बेकायदेशीर असून ते सिद्ध होत नाहीत. दि. ०९/०७/२००२ रोजीच आरोप पत्रास उत्तर दिलेले आहेत. मा. सहकार आयुक्त यांनी जारी केलेली कायदा कलम ८८ बाबतचे आदेशास कोणीही आव्हान दिलेले नाही. मा. सहकार आयुक्त यांच्या आदेशामध्ये संचालक मंडळाने केलेल्या कृत्याबद्दल निरिक्षण नोंदविलेले आहे. तत्कालीन प्राधिकृत अधिकारी यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई, यांनी रिट याचिका क्र. ५२५०/२००२ मध्ये दिलेल्या आदेशांचे पालन केलेले नाही. बँकेकडून रिझर्व बँकेने दिलेल्या निर्देशांचे उल्लंघन झालेले आहे.श्री. काळे यांच्याकडून झालेले नाही. सदर निर्देशामध्ये बँकेने न्यूनतम गुंतवणूक किती करावयाची ? याबाबत नमूद केलेले आहे. मात्रजास्तीत जास्त किती गुंतवणूक करावयाची याबाबत कोठेही नमूद नाही. मा. सहकार आयुक्त यांनी त्यांचे दि. ३१/०५/२००२ रोजीच्या आदेशामध्ये संचालक मंडळाने केलेल्या कृत्यास संचालक मंडळास जबाबदार धरलेले आहे. सरव्यवस्थापक यांना जबाबदार धरलेले नाही. रिझर्व बँकेने ज्या १९/०४/२००१ रोजी रोखे गुंतवणूकीबाबतच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत त्यामध्ये रोखे गुंतवणूकीबाबतचे सर्व व्यवहार हे फिजीकल मोडमध्ये करता एसजीएल मोडमध्ये करावे अशा सूचना आहेत. या सूचनांबाबत अध्यक्ष यांना दि. ०६/०६/२००१ रोजीच्या पत्राने सरव्यवस्थापक यांनी कळविलेले होते. तसेच अशा एसजीएल मोडमधील गुंतवणूक करणेबाबत अंतर्गत लेखापरिक्षक साने आणि कं. यांनी दि. ०२/०४/२००१ रोजीच्या

(Book 1 & 2) Computer Generated Page 434 of 484

पत्राने बँकेस सूचना केलेल्या आहेत. त्याचबरोबर त्याबाबतचा अहवाल देखील अध्यक्ष यांना सादर केलेला आहे. सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी एप्रिल २००० मध्ये एचडीएफसी बँकेत एसजीएल साठीचे खाते उघडलेले आहे. श्री. बारी यांनी मा. सहकार न्यायालयात देखील ही बाब मान्य केलेली आहे. दि. ०६/०६/२००१ रोजी श्री. काळे यांनी संचालक मंडळाला एक पत्र देवून रिझर्व बँकेच्या दि. १९/४/२००१ च्या परिपत्रकाबाबत कल्पना दिलेली होती. त्या परिपत्रकाची नोंद संचालक मंडळाच्या दि. ११/०६/२००१ रोजी झालेल्या सभेमध्ये ठराव क्र. (५/२) अन्वये घेण्यात आलेली आहे. सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी संचालक मंडळाला या परिपत्रकाची माहिती दिलेली आहे. श्री. बारी यांनी दिलेल्या उलटतपासणी मध्ये देखील सदर परिपत्रक व श्री. काळे यांनी दिलेल्या पत्रांचा उल्लेख आलेला आहे. लेखापरिक्षक यांनी त्यांच्या अहवालामध्ये सदरच्या परिपत्रकाबाबत उल्लेख करुन, सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी सदर परिपत्रकाबाबत अध्यक्ष यांना पत्राने कळविणे, संचालक मंडळाच्या दि.११/०६/२००१ रोजीच्या बैठकीमध्ये त्याबाबतचा ठराव पारित होणे , उलटतपासामध्ये श्री. बारी यांनी सदरच्या पत्रावर श्री.काळे यांची सही असल्याचे मान्य करणे यासर्व बाबी पहाता प्राधिकृत अधिकारी यांनी श्री.काळें विरुद्ध जे आरोप क्र. १,२ व ५ जारी केलेले आहेत ते श्री.काळे यांच्याविरुद्ध सिद्ध होत नाहीत. आरोपपत्रातील आरोप क्र. ३ हा श्री.काळें विरुद्ध नाही. मोघम प्रमाणे आरोप केलेले आहेत. दि. ०१/०७/२००२ रोजी उत्तर दिलेले आहे. सदरचा आरोप हा होम ट्रेड लि. ही कंपनी मान्यता प्राप्त नाही याबाबत आहे. दि. ३१/०५/२००२ रोजी पुणे स्टॉक एक्सचेंज यांनी सुवर्णयुग बँकेस दिलेल्या पत्रामध्ये होम ट्रेड लि. ही कंपनी सेबी नोंदणीकृत असून तिचा आयएनबी ११०६२४६३८ असा आहे असे कळविलेले आहे .सबब आरोप क्र. ३ हा सिद्ध होत नाही. आरोपपत्रामधील आरोप क्र. ४ हा संचालक मंडळाने केलेल्या कृत्याबद्दल आहे, श्री.काळेंबद्दल नाही. आरोप क्र. १ , २, ३, ४ , ५ हे श्री.काळेंविरुद्ध सिद्ध होत नाहीत. आरोप क्र. ६ मध्ये असे नमूद केले आहे की, संचालक मंडळ सभा दि. ५/९/२००१ रोजीच्या सभेतील ठराव क्र. ३ ने रोखे गुंतवणूकीबाबतच्या व्यवहाराबाबत निर्णय घेण्याचे अधिकार अध्यक्ष / उपाध्यक्ष/ सरव्यवस्थापक यांना दिलेले आहेत. तसेच रुपये ५.६५ कोटी ची रोखे गुंतवणूक व्यवहाराबाबतचे निर्णय घेताना सरव्यवस्थापक या नात्याने जबाबदारी पार पाडल्याचे दिसून येत नाही. सदरचा आरोप हा मोघम स्वरुपाचा आहे. या सर्व व्यवहाराची जबाबदारी ही संचालक मंडळाची आहे. श्री.काळें तर मुख्य कार्यकारी अधिकारी नसून सरव्यवस्थापक आहेत. सरव्यवस्थापक श्री.काळेंवरील आरोप अत्यंत मोघम स्वरुपाचा आहे. कायदा व पोटनियमाप्रमाणे सर्व कृत्यास संचालक मंडळ जबाबदार आहे. जर केलेल्या कृत्यामुळे कर्तव्याचा भंग होत असेल तरच विश्वासघात केला आहे असे म्हणता येईल कारण श्री.काळें यांच्यावर कोणत्याही प्रकारची जबाबदारी सोपविलेली नव्हती. श्री काळे हे विश्वस्त नव्हते. माझ्याकडून कोणत्याही प्रकारच्या अधिकाराचा दुरुपयोग झालेला आहे असे म्हणता येणार नाही .कारण नियम ७२(१) अन्वये दयावयाच्या नोटीशीमध्येच त्याचा उल्लेख करणे आवश्यक होते.

337

(८५)

नियम ७३(३) अन्वये आरोपपत्र निश्चित करणेपूर्वी लेखापरिक्षण अहवाल, विशेष अहवाल किंवा कलम ८३ अन्वये करावयाच्या चौकशी अहवालामध्ये सरव्यवस्थापक यांचेबाबत उल्लेख असणे आवश्यक होते. त्याचबरोबर श्री.काळे विरुद्ध मा. सहकार आयुक्त यांच्या आदेशात तसेच तपासणी अहवालामध्ये देखील उल्लेख नाही. जर श्री.काळे विरुद्ध कोणताही पुरावा नसेल तर माझ्यावर आरोपपत्र कसे ठेवले?. दि. ०५/०९/२००१ रोजीच्या ठरावानुसार रोखे गुंतवणूक करण्याबाबतचे निर्णय घेण्याचा अधिकार अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष किंवा सरव्यवस्थापक यांना दिलेले होते त्यानुसार रुपये ५.६५ कोटी रुपयांचे रोखे खरेदी व्यवहार करण्याचा निर्णय हा सरव्यवस्थापक यांनी घेतला होता काय? या प्रश्नाचे उत्तर निश्चितच नाही असे आहे. सदरचा निर्णय केवळ अध्यक्ष, उपाध्यक्ष, सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी घेतलेला नाही. हा निर्णय सर्वस्वी संचालक मंडळाचा होता. दि. २६/०३/२००२ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये विषय क्र. ४ मध्ये ७.५०% जी ओ आय २०१० हा कर्जरोखा फिजीकल मोडमध्ये खरेदी करण्याचे ठरविण्यांत आले आहे. सदर कर्जरोखा फिजीकल फॉर्ममध्ये प्रचलित बाजारभावापेक्षा किफायतशिर किंमतीमध्ये मिळत असल्याने नफा क्षमता वाढणार असल्याने सदर प्रस्ताव होम ट्रेड लि. या पार्टीने बँकेस मांडल्याने सदर पार्टीकडून किफायतशीर दरात वरील कर्जरोख खरेदी करावा असे सर्वानुमते ठरविण्यांत आले असा ठराव पारित करण्यांत आलेला आहे. सदरच्या ठरावास दि. ०६/०४/२००२ रोजी झालेल्या संचालक मंडळातील बैठकीमध्ये विषय क्र. ३ अन्वये त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सभेतील विषय क्र. १ अन्वये मागील सभेच्या सभावृत्तांत कायम करण्यांत आलेला आहे. निर्णय जर संचालक मंडळाने घेतला तर माझ्यावर आरोप ठेवता येणार नाही. नियम ७२(२) च्या नोटीशीमध्ये '---------- हरकत घेतली नसल्याचे दिसून येते.' असे नमूद केलेले आहे. हे वाक्य संचालक मंडळास लागू आहे. श्री. बारी यांनी दि. २३/११/२००५ रोजी दिलेल्या उलटतपासणीमध्ये देखील असे म्हटले आहे की, रोखे खरेदीबाबत सरव्यवस्थापक श्री. काळे यांनी कोणताही निर्णय घेतलेला नाही. रुपये ५.६५ कोटी च्या रोखे खरेदीबाबतचा ठराव हा नंतरच्या संचालक मंडळ बैठकीत कायम करण्यात आलेला आहे. अध्यक्ष श्री. काळोखे यांनी दि. १७/१२/२००२ रोजी दिलेल्या उलटतपासणीत देखील रोखे खरेदीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असे नमूद केलेले आहे. श्री. काळे यांनी हा निर्णय घेतलेला नाही. दि. ०५/०२/२०१३ रोजी संचालक मंडळाच्या वतीने श्री. शंकरराव सुर्यवंशी यांनी जी उलटतपासणी झाली त्यामध्ये देखील ते दि. २६/०३/२००२ रोजीच्या संचालक मंडळ सभेस हजर होते, रुपये ५.६५ कोटीच्या रोखे खरेदीचा निर्णय संचालक मंडळाने घेतला असे सांगीतलेले आहे. दि. २२/०३/२०१३ रोजी तत्कालीन उपाध्यक्ष श्री. उल्हास भट यांचे उलटतपासणीच्या वेळी श्री. भट यांनी सांगीतले की, ते दि. २६/०३/२००२ रोजी संचालक मंडळाच्या सभेस हजर होते. दि. २६/०३/२००२ व दि. ०६/०४/२००२ च्या संचालक मंडळाच्या सभेतील रोखे खरेदीबाबतच्या ठरावास विरोध केलेला नाही. ते ठराव कायम करण्यात आले .त्यास त्यांनी विरोध केलेला नाही.

अधिकृत अधिकारी

सारांश एवढाच की, सरव्यवस्थापक श्री. काळे यांचे विरुद्ध याबाबतचा पुरावा नसणे , दि. ०५/०९/२००१ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीत संचालक मंडळज्ञने ठराव पारित करणे, दि. २६/०३/२००२ रोजी संचालक मंडळाने रोखे खरेदी बाबत ठराव पारित करणे त्यास संचालक मंडळाच्या दि. ०६/०४/२००२ रोजीच्या सभेने कायम करणे हे सर्व मुद्दे लक्षात घेता आरोप क्र. ६ हा माझ्या विरुद्ध सिद्ध होत नाही. रोखे खरेदीच्या संपूर्ण घटनेमुळे बँकेने श्री. सुर्यवंशी यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती व त्याचा अहवाल देखील या चौकशीच्या वेळी दाखल करण्यांत आलेला आहे. सदरची समिती ही दि. २२/०४/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये झालेल्या ठरावनुसार श्री. शंकरराव सुर्यवंशी व अंतर्गत लेखापरिक्षक श्री. शेखर साने यांची ही द्विसदस्यीय समिती नेमण्यांत आलेली होती व तसा उल्लेख सदर समितीने , श्री. शंकाराव सुर्यवंशी यांनी दिलेल्या अहवालात देखील नमूद केलेले आहे. मात्र उलटतपासंणीच्यावेळी श्री. सुर्यवंशी म्हणतात की, हा अहवाल मी दिलेला नाही. सदरच्या अहवालामध्ये सरव्यवस्थापक श्री.काळे हे दोषी आहेत असे कोठेही नमूद केलेले नाही. सदर गुंतवणूक निर्णय घेणारे पदाधिकारी / अधिकारी यांनी प्रत्येक वेळी संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या चाकोरीत राहूनच निर्णय घेतले असल्याचे झालेल्या प्रकरणात त्यांना दोषी धरता येणार नाही असे मत व्यक्त केले आहे. सदर अहवालाचा उल्लेख देखील श्री. बारी यांच्या उलटतपासणीमध्ये आलेला आहे.श्री.बारी यांनी दिलेल्या उलटतपासणीदेखील "श्री. सुर्यवंशी यांची सही ओळखतो , सदरचा अहवाल संचालक मंडळाने स्विकारलेला असून कोणताही ठपका ठेवलेला नाही "असे म्हटलेले आहे. दि. १७/१२/२०१२ रोजी श्री. काळोखे यांच्या झालेल्या उलटतपासणीदेखील श्री. काळोखे यांनी" सदर समिती नेमलेली होती , सदर अहवालामध्ये दोषारोप ठेवण्यांत आलेला होता किंवा नाही याबाबत काहीही सांगता येणार नाही, सरव्यवस्थापक जबाबदार आहेत असे कोठेही नमूद केलेले नाही "असे सांगीतले. आरोप पत्रांतील आरोप क्र. ७ हा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बाबत आहे. सदरचा आरोप हा मा. सहकार आयुक्ताच्या आदेशान नमूद कलेल्या पैकी नाही. हा आरोप कसा आला हेच कळून येत नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकारणाच्या रोखेच्या विक्री करणे व दुसरा कोणता रोखा खरेदी करणे हा आरोप असू शकत नाही. त्यामुळे सदरचा व्यवहार हा फायदेशीर नाही असे म्हणता येणार नाही.सदरच्या व्यवहारामुळे बँकेला फायदाच झालेला आहे मात्र हा व्यवहार मी केलेला नाही. प्रस्तुत चौकशी रुपये ५.६५ कोटीच्या रोखे खरेदीबाबतची आहे. हा आरोप चौकशीतील मुद्दयांमध्ये कसा समाविष्ट केला हे कळून येत नाही. हा आरोप होवूच शकत नाही .सदरच्या आरोपामध्ये *शक्यता* असा शब्द नमूद आहे हा आरोप मोघम स्वरुपाचा आहे .संपूर्ण आरोपच हा सरव्यवस्थापक यांच्या विरुद्ध आहे. केवळ पूर्वग्रहदूषित मनाने हा आरोप केलेला आहे. सदरची रोखे खरेदी ही संचालक मंडळाच्या दि. ११/०२/२००३ रोजीच्या झ ालेल्या संचालक मंडळ सभेमध्ये झालेला आहे. सदरच्या रोखेची विक्री करुन बँकेस रुपये १.४४ लाख इतका नफा झालेला आहे. तदनंतर रुपये १०.६५ लाख इतका नफा झालेला आहे. श्री. [illegible] उलटतपासणीत

339

(६५)

देखील दि. ०१/०४/२००४ रोजी बँकेस या रोखेच्या विक्रीमुळे फायदा झालेला आहे असे सांगीतलेले आहे. तसेच त्यांनी कॉन्ट्रक्ट नोटसवरील सहया या सरव्यवस्थापक यांच्या नाहीत, व बॅकेस झालेल्या फायदयाबाबत हिशोबामध्ये दिसून येत आहे. सबब हा आरोप चौकेशीच्या कार्यकक्षेबाहेर असून तो चुकीच्या पद्धतीने निश्चित केलेला आहे व तो सिद्ध होत नाही. आरोप क्र. ८ मध्ये संचालक मंडळाच्या सभेच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये सरकारी रोखे ८.०७ जी ओ आग व ७.५० जीओआय खरेदीबाबत जे निर्णय झालेले आहे त्या निर्णयास कार्योत्तर मंजूरीसाठी लगतच्या संचालक मंडळाच्या कार्यक्रम पत्रिकेत अंतर्भूत करणे आवश्यक होते. सदरचा आरोप हा निश्चित स्वरुपाचा नाही मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या आदेशांचे पालन झालेले नाही. रुपये ५.६५ कोटीच्या रोखे खरेदीबाबतचा निर्णय २६/३/२००२ रोजी ठराव पारित करुन रोखा फिजीकल मोड मध्ये घ्यावा असे नमूद कलेले आहे. तद्नंतर दि. २८/०३/२००२ रोजी सदरचा रोखा खरेदी केलेला आहे तसेच हा निर्णय संचालक मंडळाच्या दि. ०६/०४/२००२ रोजी झालेल्या सभेत कायम करण्यात आलेला आहे. सदरच्या व्यवहारास कोणत्याही प्रकारे कार्योत्तर मंजूरी नाही. आरोप पत्रात नमूद केल्याप्रमाणे आपण जरी असे गृहित धरले की, विषय पत्रिकेवरीत व सभेच्या नोटीशमध्ये सदर विषयाचा अंतर्भाव नव्हता तरी नोटीशीमध्ये जो विषय नाही तर आम्ही निर्णय घेणार नाही. असे कोणत्याही संचालकांना हरकत घेतलेली नाही. जर तुम्ही सभेस उपस्थित राहून ठराव पारित केलेला आहे तर आता हा बचाव घेता येणार नाही. श्री. शंकरराव सुर्यवंशी यांनी दि. २१/०१/२०१३ रोजी दिलेल्या उलटतपासणीच्या वेळी असे सांगीतलेले आहे की, असे ठराव सरव्यवस्थापक श्री.काळे हे घुसडवित असत .जर असे असेल तर श्री. सुर्यवंशी यांनी त्याबाबतची तक्रार कोठेही का केली नाही मा. सहकार आयुक्त यांचे आदेशमध्ये देखील " घुसडविल्याबाबत " नमूद नाही. तत्कालीन प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या नोटीशीत देखील ठराव घुसडविलेले आहेत असे नमूद केलेले नाहीत. बँकेचा लेखापरिक्षण अहवाल , तपासणी अहवाल, मा. सहकार आयुक्त यांचे आदेश यामध्ये कोठेही ठराव घुसडविल्याबाबत नमूद कलेले नाहीत. तरी देखील आरोपपत्रांमध्ये तसा उल्लेख केलेला आहे .जर ऐनवेळेच्या विषयामध्ये हा रोखे खरेदीचा विषय घातला होता ,तर संचालक मंडळाने त्यावेळी हरकत का घेतली नाही?, कॉन्ट्रक्ट नोटसवर 'श्री. काळे यांच्या सहया नाहीत' असे उलटतपासणीच्यावेळी सांगण्यात आलेले आहे. या सर्व म्हणण्यापृष्ठर्थ एआयआर मा. सर्वोच्च्य न्यायालय पान क्र. २१७ ही ॲथॉरिटी सादर केली. कोणत्याही संचालकांने ठराव पारित झलेले नाहीत असे सांगीतलेले नाही.सर्व संचालकांनी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहेत. आरोपपत्र निश्चित होण्या अगोदर त्यांनी लेखी म्हणणे सादर केलेले आहे. सदरच्या लेखी म्हणण्यामध्ये देखील असा ठराव घुसडविलेला आहे ,असे नमूद कलेले नाही. सबब या आरोपा पृष्ठर्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही. श्री. बारींच्या प्रतिज्ञापत्रातदेखील असा ठराव घुडविलेला आहे ,असे नमूद नाही. आरोपपत्र निश्चित केलयानंतर श्री.काळोखे व संचालक मंडळ यांनी जे लेखी म्हणणे सादर केलेले आहे त्यामध्ये प्रथमत: ठराव घुसडविल्याचे नमूद

[४४]

340

(627)

केलेले आहे. सबबचा श्री. सुरेश काळे यांचे विरुद्ध कोणताही पुरावा नसल्याने हा आरोप बिनबुडाचा आहे. आरोप क्र. ९ हा संचालक मंडळ सभेच्या इतिवृत्तांवरुन सरव्यवस्थापक श्री.काळे यांच्या सहयांबाबतचा आहे. इतिवृत्तांवर जरी सरव्यवस्थापक श्री. काळे यांच्या सहया असल्या तरी सदरचा निर्णय हा संचालक मंडळाचा होता.रोखे खरेदीबाबतचा निर्णय सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी व्यक्तिशः घेतलेला नाही .तो संचालक मंडळाच्या ठरावानुसार घेतलेला आहे. प्राधिकृत अधिकारी यांनी या आरोपामध्ये ज्या सर्व मुद्दयांचा समावेश केलेला आहे तो रिट याचिका क्रमाक ५२५०/२००२ मध्ये जे प्रतिज्ञापत्र प्राधिकृत अधिकारी यांनी सादर केलेले आहे त्यात कोठेही उल्लेख नाही. आरोप क्र. ९ हा चौकशी कक्षाबाहेर असून श्री. काळे यांचेविरुद्ध कोणताही पुरावानसल्याने तो सिद्ध होवू शकत नाही. बँकेच्या वतीने अॅड. खुर्जेकर यांनी जो युक्तिवाद केला आहे तो पहाणे गरजेचे आहे. नुकसान हे बँकेचे झालेले असून त्याबाबत बँकेने कोणत्याही संचालकांची उलटतपासणी अॅड . खुर्जेकर यांनी घेतलेली नाही. कोणत्याही संचालकाने बँकचे अधिकारी श्री. बारी यांची उलटतपासणी घेतलेली नाही. तथापि श्री. काळोखे यांच्या वकीलांनी श्री. बारी यांची उलटतपासणी घेतलेली आहे. मा. सहकार आयुक्त, विशेष लेखापरिक्षक, प्राधिकृत अधिकारी यांनी दिलेल्या नोटीशीमध्ये देखील संदर्भीय निर्णय संचालक मंडळाने ठरावाने घेतलेले आहेत, असे नमूद केलेले आहे .श्री. काळे हे फोनवरुन निर्णय घ्यायचे असे मात्र अॅड खुर्जेकर हे सिद्ध करु शकले नाहीत. अॅड. खुर्जेकर यांनी जो लेखी युक्तिवाद सादर केला आहे त्यामध्ये देखील पान क्र. ९ परिच्छेद क्र.१० मध्ये असे नमूद केले आहे की, --------- violation by the bank ----- . हा युक्तिवाद कायदयास धरुन नाही. निर्णय हा संचालक मंडळ घेत असत याबाबत पुरावा देखील आहे. बँकेचे त्याच्या झालेल्या नुकसानीबाबत काहीही बोलत नाही. "As per resolution both of them are liable" असे अॅड खुर्जेकर कसे नमूद करु शकतात .अॅड. खुर्जेकर हे बँकेच्या वतीने बोलत आहेत कि संचालक मंडळाच्या वतीने बोलत आहेत?.सरव्यवस्थापक श्री. काळे मुख्य कार्यकारी अधिकारी नव्हते. संचालक मंडळाची कर्तव्ये याबाबत पोटनियमात उल्लेख आहे. अॅड खुर्जेकर यांच्या लेखी युक्तिवादामध्ये पान क्र. ७ वर "श्री. उल्हास भट हे श्री. काळे यांनी विनंती केल्यावर सह्या करत "असे जे म्हटलेले आहे ते पूर्णतः चूकीचे आहे. माझेविरुद्ध कोणत्याही प्रकारचा पुरावा नाही सबब पुरावा नसल्यामुळे श्री. काळे यांनी साक्ष देण्याची गरज नाही. उगीचच चुकीचा तर्क करता येणार नाही याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांनीदेखील निर्णय दिलेले आहेत. अॅड. खुर्जेकर यांच्या लेखी म्हणण्यामध्ये अॅड. फटाले यांनी केलेल्या चौकशीबाबत नमूद केलेले आहे. मात्र सदरची चौकशी प्रशासकीय स्वरुपाची होती त्याचा या चौकशीशी काहीही संबंध नाही.अॅड. एस.व्ही.क्षीरसागर यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये झालेलया नुकसानीची जबाबदारी ही संचालकांच्या निर्णयामुळे एकत्रित व सामुदियीक रित्या झालेली आहे असे नमूद केलेले आहे. अॅड .नांगरे यांनी केवळ अजेंडयावर विषय नाही म्हणून झालेल्या नुकसानीस संचालक मंडळ जबाबदार नाही असे जे म्हटलेले आहे ते पूर्णतः

341

चुकीचे आहे. अशा उपस्थित झालेल्या मुद्दयांवर मा. सर्वोच्च न्यायालय यांनी देखील निर्णय दिलेला आहे. सारांशाने एवढेच म्हणता येईल कि,श्री. काळे यांनी रोखे गुंतवणूकीबाबतचा कोणताही निर्णय घेतलेला नसून सदरचे निर्णय संचालक मंडळाने घेतलेला असून त्याचा उल्लेख मा. सहकार आयुक्त यांचे संदर्भ क्र. १ आदेश, विशेष अहवाल यामध्ये झालेला असून सरव्यवस्थापक श्री.काळे यांना सदरच्या आरोपामधून मुक्त करण्यांत येवून त्याना झालेल्या नुकसानीस जबाबदार धरण्यांत येवू नये , सदरच्या व्यवहारामुळे झालेल्या नुकसानीस ज्या कोणी इतर व्यक्ति जबाबदार असतील त्यांना जबाबदार धरण्यात यावे.

निरिक्षण,निष्कर्ष व अभिप्राय :-

बँकेच्या वतीने श्री. बारी यांनी त्यांचे म्हणणे पृष्ठर्थ प्रतिज्ञापत्र सादर कलेले आहे .तसेच बँकेने कागदपत्रे उदा. संचालक मंडळ सभांच्या इतिवृत्तांच्या प्रती, कॉन्ट्रक्ट नोटसच्या प्रती ,सेबी कडून दि. ३१/०५/२००२. रोजी प्राप्त झालेले पत्र, रिझर्व बँकेची विषयांकीत परिपत्रके, पोटनियमाची प्रत ही कागदपत्रे सादर केलेली आहेत. सदर कागदपत्रांचे मी स्वत: अवलोकन केलेले आहे. अपचारी प्रवर्तक क्र.१ ते १८ यांनी सादर केलेले म्हणणे, त्यासोबतची कागदपत्रे ; त्यांच्या बचावापृष्ठर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्रे , बँकेचे अधिकारी श्री. सुनिल बारी यांचा सरतपास तसेच ॲड.क्षिरसागर, ॲड.नांगरे, ॲड. कानेटकर यांनी घेतलेला त्यांचा उलटतपास, अपचारी श्री. काळोखे यांचा ॲड नांगरे, ॲड, श्रीकांत कानेटकर व ॲड. खुर्जेकर यांनी घेतलेला उलटतपास, अपचारी क्र. १ते १८ यांनी चौकशीकामी कुलमुखत्यार पत्र करुन दिलेले श्री. शंकरराव सुर्यवंशी यांचा ॲड. क्षिरसागर, ॲड. कानेटकर यांनी घेतलेला उलटतपास , श्री. उल्हास भट यांचा ॲड.कानेटकर यांनी घेतलेला उलटतपास मी विचारात घेतलेला आहे. बँकेच्या वतीने ॲड. खुर्जेकर यांनी केलेला युक्तिवाद , श्री.काळोखे यांच वतीने ॲड.क्षीरसागर यांनी केलेला युक्तिवाद, संचालक मंडळ यांचे वतीने ॲड. नांगरे यांनी केलेला युक्तिवाद, तसेच सरव्यवस्थापक श्री.काळे यांचे लेखी म्हणणे ,त्यांचे वतीने ॲड. श्रीकांत कानेटकर यांनी केलेला युक्तिवाद मी विचारात घेतलेला आहे.

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सदर बँकेने केलेल्या रोखे गुंतवणूकीच्या व्यवहारामुळे रुपये ५.६५ कोटीचे जे नुकसान झालेले आहे त्या नुकसानीस संचालक मंडळ व इतर व्यक्ती जबाबदार आहेत त्याची निश्चिती करण्याकरीता संदर्भीत आदेश पारित केलेले आहेत. रिझर्व बँकेच्या दिनांक २२/१०/२००१ रोजीच्या परिपत्रकानुसार एनडीटीएल च्या १२.५ टक्के इतकी रक्कम राखण्यामध्ये गुंतवावी असे निर्देश आहेत. मात्र बँकेने रुपये ४५.२१ कोटी इतक्या रकमेची गुंतवणूक सन २००१-०२ मध्ये केलेली आहे.

[४६]

सर्वप्रथम बँकेचे पोटनियम व पोटनियमातील संचालक मंडळाचे अधिकार पहाणे आवश्यक आहे.

१)पोट नियम क्र. २ (८):-

मुख्य कार्यकारी अधिकारी (चीफ एक्झीक्यूटिव्ह ऑफीसर) म्हणजे संचालक मंडळाने कार्यकारी संचालक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती. कार्यकारी संचालक नेमलेला नसेल तर संचालक मंडळाने सरव्यवस्थापक, व्यवस्थापक, किंवा सचिव म्हणून नेमलेली व्यक्ति बँकेची मुख्य कार्यकारी अधिकारी असेल.

२)पोटनियम क्र. २९:-

पोटनियम क्र. २९ मध्ये संचालक मंडळाची रचना दिलेली आहे. पोटनियम २९(४) मध्ये सदर संचालक मंडळाची रचना दिलेली असुन त्या रचनेमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी हा संचालक मंडळा पदसिद्ध (Ex-Officio) सभासद असेल असे नमूद केलेले आहे.

३) पोटनियम क्र. ३६ (८):-

बँकेचे पोट नियम क्र. ३६ (८) नुसार संचालक मंडळास सरकारी ऋणपत्रे, विश्वस्थ निधी, ठेवी व इतर मान्य केलेल्या तारणपत्रातील गुंतवणूकीस मान्यता देणे असे अधिकार दिलेले आहेत.

४) पोटनियम क्र. ३८ :

पोटनियम क्र. ३८ मध्ये इतिवृत्ताबाबत असे नमूद केले आहे की, "संचालक मंडळाचे / उपसमिती सभांचे इतिवृत्त त्यासाठी ठेवलेल्या पुस्तकात नोंदले जाईल .सदरहू पुस्तकाच्या प्रत्येक पानावर क्र. टाकणे आवश्यक आहे. इतिवृत्तावर त्या सभेच्या अध्यक्षांनी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सहया केल्या पाहिजेत" .

५) पोटनियम क्र. ३९ :-

पोटनियम क्र. ३९ मध्ये अध्यक्ष यांचे अधिकार व कामे नमुद केलेले आहेत .

अ) संचालक मंडळ, उपसमित्या व इतर नेमलेल्या समित्याच्या सभेचे अध्यक्ष पद भूषविणे

ब) बँकेच्या सर्वसाधारण कामावर देखरेख ठेवणे.

६) पोटनियम क्र. ४०:-

पोटनियम क्र. ४० (अ) हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी संबंधीत असून, पोटनियम क्र. ४० (ब) मध्ये असे नमुद केलेले आहे कि,मुख्य कार्यकारी अधिकारी हे संचालक मंडळास जबाबदार राहतील. त्यांची कामे व अधिकार नमुद केलेले आहेत .त्यापैकी या चौकशीसाठी पोटनियम क्र. ४० (ब) मधील मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे पुढील अधिकार विचारात घेणे आवश्यक आहे.

१) सर्वसाधारण सभेने व संचालक मंडळाने संमत केलेल्या ठरावांची व निर्णयांची अंमलबजावणी करणे.

सुरुवीकृत सहकारी बँक मर्यादित पुणे
अधिकृत अधिकारी
सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८

२) सर्वसाधारण सभा, संचालक मंडळाची सभा, उपसमित्यांच्यासभा बोलाविणे व त्यास हजर राहून त्यांच्या वृत्तांत इतिवृत्त पुस्तकात नोंदविणे व त्यावर अध्यक्षांसह स्वाक्षऱ्या करणे.

३) बँकेचे वतीने पत्रव्यवहार करणे.

४) रिझर्व बँक कर्जपुरवठा करणारी वरिष्ठ संस्था यांचे सूचनेप्रमाणेव सहकार कायदा व नियमाखाली आवश्यक असणारी हिशोब पुस्तके रजिस्टर ठेवणे.

९) बँकेच्या वतीने पैशाचे/ निधीचे गुंतवणूक करणे

१०) रोख शिल्लक , स्थावर व जंगम मालमत्ता, दस्तऐवज, सिक्यरिटीज वैगेरे ताब्यात घेण्याची / सांभाळण्याची व्यवस्था करणे.

११) हाताखालील कर्मचाऱ्यांची नियुक्ती संबंधीत आदेश संचालक मंडळा / कर्मचारी समिती यांचे कडून घेवून त्याची अंमलबजावणी करणे.

१२) कर्मचारी वर्गामध्ये कामाची वाटणी करणे कामकाज सोपविणे व त्यावर देखरेख करणे.

१७) उपलब्ध निधीची संचालक मंडळाच्या धोरणानुसार गुंतवणूक करुन संचालक मंडळाच्य पुढील सभेत त्याची माहिती देणे.

१८) संचालक मंडळाने अथवा अध्यक्षाने दिलेल्या अधिकारानुसार कामे करणे , कार्यवाही करणे.

१९) ठेवी , सोन्या चांदीचे दागिने , यांचे तारणावर व सरकारी कर्ज रोख्यापोटी संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादेत कर्ज मंजूर करणे . तसेच स्थावर मालमत्तेखेरीज संचालक मंडळज्ञने संमत केलेल्या इतर तारणापोटी रुपये ५०००/- कर्ज मंजूर करणे मात्र अशा मंजूर केलेल्या कर्जाचे पत्रक संचालक मंडळाच्या पुढील सभेत सादर केले पाहिजे.

२०) कायदेशीर कारवाई बाबत बँकेचे प्रतिनिधित्व करणे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(१)(अ ब):-

कायद्यातील या कलमाखालील असलेली तरतुद पहाणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(१)(अ ब) मध्ये संचालक मंडळाच्या जबाबदारीबाबत अशी तरतूद आहे की," समितीने तिच्या कालावधीत संस्थेच्या कामकाजाशी असे जे निर्णय घेतले असतील अशा सर्व निर्णयासाठी समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथकपणे जबाबदार असतील .संस्थेच्या हितास हानी पोचविणाऱ्या सर्व कृतींना व अकृतींना समितीचे सदस्य संयुक्तपणे व पृथ्थकपणे जबाबदार असतील." सदर तरतूदीमध्ये पुढे असेही नमूद केले आहे की, " समितीच्या कोणत्याही सदस्यांला समितीचा कोणताही ठराव किंवा निर्णय मान्य नसल्यास त्याचेविरुद्ध

सुवर्णयुग सहकारी बँक मर्यादित पुणे
प्राधिकृत अधिकारी
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८

मत सभेच्या इतिवृत्तामध्ये नमूद करावयास पाहिजे आणि असा सदस्य समितीच्या ठरावामधील निर्णयाला, कृतीला किंवा अकृतीला जबाबदार राहणार नाही. विरुद्ध मत असलेला सदस्य आपले विरुद्ध मत निबंधकाला सात दिवसांत लेखी कळविल. जो सदस्य समितीच्या निर्णय घेण्याच्या सभेला हजर नसेल आणि सभेच्या कृतीला दुजोरा देत नसेल असा सदस्य सदर सभेमध्ये घेतल्यागेलेल्या निर्णयास जबाबदार राहणार नाही ".कायदयातील या तरतूदी प्रस्तुत चौकशीकामी विचारात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

रिझर्व बँकेचे युबीडी/बीआर/परी.४२/१६.२६.०००/२०००-०१ दि.१९/४/२००१ रोजीच्या परिपत्रकानुसार बँकेने सरकारी रोख्यातील गुंतवणूकी एसजीएल मोडमध्येच करावीत असे निर्देश दिले आहेत. रिझर्व बँकेचे परिपत्रक क्र. युबीडी/बीआर/१६.२६.००/२००१-०२ दि.०८/०८/२००१ व परिपत्रक क्र. युबीडी /बीआर /सीएलआर/ १९/ ५६-२६-००/२००१-०२ दि.२२/१०/२००१ नुसार बँकेने एकूण निव्वळ मुदत देयतेच्या १२.५० टक्के सरकारी रोखे मध्ये गुंतवणूक करणे आवश्यक होते. दि.३१/०३/२००२ नुसार बँकेचे एकूण मागणी व देयकात २०४३८.३६ कोटी एवढी रक्कम असून त्याच्या १२.५० टक्के रक्कम सरकारी रोख्यामध्ये रुपये २५.५० कोटी इतकी करणे आवश्यक होते मात्र बँकेने रुपये ४५.२१ कोटी इतकी रक्कम गुंतवलेली आहे.

बँकेचे तत्कालीन अध्यक्ष श्री. उल्हास काळोखे,उपाध्यक्ष श्री.उल्हास भट, संचालक मंडळातील सदस्य, बँकेच्या वतीने श्री. सुनिल बारी यांनी प्रतिज्ञापत्र तसेच उलटतपासणीही दिलेली आहे. श्री. काळोखे यांच्या प्रतिज्ञापत्रामध्ये बँकेच्यावतीने श्री. सुनिल बारी यांनी दाखल केलेले प्रतिज्ञापत्र हे कोणत्या कागदपत्रांच्या आधारे दाखल केलेले आहे याबाबत विचारणा करुन श्री. बारी याचे प्रतिज्ञापत्रांमध्ये नमूद केलेल्या बाबी नाकारलेल्या आहेत. श्री. काळोखे यांचे वकील ॲड. श्री. एस.व्ही.क्षीरसागर यांनी युक्तीवादावेळी वारंवार असे सांगीतले आहे की, जे काही निर्णय घेतलेले आहेत ते अध्यक्ष, उपाध्यक्ष ,संचालक मंडळ व सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी घेतलेले असुन हे सर्वजण झालेल्या नुकसानीस जबाबदार आहेत. तसेच दि.१९/१२/२०१२ रोजी ॲड. कानेटकर यांनी माझ्यासमोर घेतलेल्या उलटतपासणीच्यावेळी श्री. काळोखे यांनी "रोखे व्यवहाराबाबतचा जो रु. ५.६५ कोटी इतक्या रकमेचा व्यवहार मी एकटयाने केलेला आहे हे म्हणणे खरे नसून संचालक मंडळाने केलेला आहे असे सांगीतले आहे".

दि.२६/३/२००२ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेमध्ये विषय क्र. ४ हा सरकारी कर्जरोखे खरेदी करणेबाबत पारित केलेला आहे. सदर सभेच्या इतिवृत्तामध्ये असे नमूद केले आहे की, "७.५० टक्के जीओआय २०१० हा

प्राधिकृत अधिकारी

कर्जरोखा फिजीकल मोडमध्ये खरेदी करण्याचे ठरविण्यात आले आहे. सदर कर्जरोखा फिजीकल फॉर्ममध्ये प्रचलित बाजारभावापेक्षा किफायतशिर किमतीमध्ये मिळत असल्याने नफा क्षमता वाढणार असल्यानेच सदर प्रस्ताव होम ट्रेड लि. या पार्टीने बँकेस मांडल्याने सदर पार्टीकडून किफायतशीर दरात वरील कर्जरोखे खरेदी करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आले." पुढे सदरचा ठराव हा दि. ३०/०६/२००२ रोजीच्या सभेमध्ये कायम करण्यात आलेला आहे.

संचालक मंडळाच्या दि.६/४/२००२ च्या सभेचे इतिवृत्त पहाता विषय क्र. ३ मध्ये असे नमूद केले आहे की, विषय क्र. ३:- सरकारी कर्जरोखें खरेदीस मान्यता देणे.

खरेदी

०४/०४/२००२	६.८५जीओआय२०१२	४,००,००,०००	१००.२५
०५/०४/२००२	६.८५जीओआय२०१२	१,००,००,०००	१००.००
०५/०४/२००२	६.६५जीओआय२००९	१,००,००,०००	१००.००
३१/०३/२००२	७.५० जीओआय२०१०	५,६५,००,०००	९९.६५

श्री. काळोखे यांचे वकील ॲड. श्री क्षीरसागर यांनी युक्तिवादाचे वेळी असे सांगीतले आहे की, संचालक मंडळांच्यासभांमध्ये रोखे गुंतवणूकीबाबतचा निर्णय घेतलेला आहे. संचालक मंडळाच्या दि.३०/०४/२००१ च्या सभेमध्ये "सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री बाबतचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यात आले आहेत व कार्योत्तर मंजूरीसाठी संचालक मंडळ सभेपुढे ठेवण्यात यावेत" असा ठराव पारित करण्यात आलेला आहे. सदर ठराव तद्नंतरच्या सभांमध्ये कायम करण्यात आलेला आहे. दि.०५/०९/२००१ च्या सभेमध्ये देखील सरकारी कर्ज रोख्यामध्ये केलेल्या गुंतवणूकीची नोंद घेवून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या सभेतदेखील कार्योत्तर मंजूरी व माहितीसाठी संचालक मंडळाच्या सभेपुढे ठेवण्यात यावेत असाही निर्णय घेण्यात आलेला आहे. दि.२४/०१/२००२ च्या सभेमध्ये देखील सरकारी कर्ज रोखे गुंतवणूकीस संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. दि.११/०२/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये देखील विषय क्र. १३ ने सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री गुंतवणूक खरेदी विक्रीस सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे व सदर सभेच्या ठरावामध्ये मे. होम ट्रेड लि. यांचे मार्फत फिजीकल मोडमध्ये रोखे खरेदी केलेले आहेत. दि.०५/०३/२००२ च्या सभेमध्ये देखील विषय क्र. ३ च्या ठरावामध्ये असे नमुद केले आहे कि, सरकारी कर्ज रोखे गुंतवणूकीमध्ये खरेदी विक्री व्यवहाराची नोंद घेवून त्यास सर्व संचालक मंडळ सदस्यांनी मान्यता दिलेली आहे .या संचालक मंडळाच्या सभेमध्ये मे. होम ट्रेड लि. यांचेकडून फिजीकल मोडमध्येच रोखे खरेदी केलेली आहेत, त्याबाबतची नोंद इतिवृत्तामध्ये आहे. दि. ११/०३/२००२ रोजीच्या संचालक मंडळ सभेत देखील रोखे खरेदी विक्री

(Book 1 & 2) Computer Generated Page 444 of 484

बाबतची माहिती तयार करुन कार्योतर मंजूरीसाठी संचालक मंडळ सभेमध्ये मांडण्यात यावी असे ठरविण्यात आलेले आहे. दि.२६/०३/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये विषय क्र.४ नुसार "७.५०% GOI२०१० महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हा कर्ज रोखा फिजीकल मोडमध्ये खरेदी करण्याचे ठरविण्यांत आलेले आहे .सदर कर्ज रोखा फिजीकल मोडमध्ये प्रचलित बाजार भावापेक्षा किफायतशीर किंमतीमध्ये मिळत असल्याने नफा क्षमता वाढणार असल्याने व सदर प्रस्ताव मे. होम ट्रेड या पार्टीने बँकेस मांडल्याने सदर पार्टीकडून किफायतशीर दरात वरील कर्ज रोखा खरेदी करावा ,असे सर्वानुमते ठरविण्यात आलेले आहे "असा ठराव पारित केलेला आहे. दि. ०६/०४/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये विषय क्र. ३ हा " सरकारी कर्ज रोखे गुंतवणूक खरेदी विक्रीस मान्यता देणे " विषय असून सदरच्या सभेमध्ये "जो ७.५०%GOI२०१० रु.५,६५,००,०००/- हा कर्ज रोखे फिजीकल फॉर्म मध्ये घेतल्याने सदर रोख्याची कागदपत्रे लवकर मागून घ्यावीत "असा ठराव करण्यात आलेला आहे. याचा अर्थ रिझर्व बँकेच्या दि .१९/०४/२००१,९/८/२००१, २२/१०/२००१रोजीच्या परिपत्रकानुसार सरकारी गुंतवणूकीमधील रोखे खरेदी ही फिजीकल मोडमध्ये न करता एसजीएल मोडमध्ये कराव्यात या सूचना अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ , सरव्यवस्थापक यांना माहीत असुनही या परिपत्रकांचे उल्लंघन केलेले आहे. संचालक मंडळाने ठराव केलेला आहे.त्यानुसार गुंतवणुका एस.जी.एल.मोडमध्ये होत होत्या किंवा नव्हत्या याची खातरजमा करणे अगर त्या बाबतची आवश्यक ती कार्यवाही केली आहे किंवा नाही हे पहाणे सर्व संचालक मंडळ सदस्यांचे कर्तव्य होते. त्यांचे हे कृत्य बॅकेच्या झालेल्या नुकसानीस कारणीभुत ठरलेले आहे. पारीत केलेल्या ठरावानुसार गुंतवणुका या एस.जी.एल.मोडमध्ये होत होत्या किंवा नव्हत्या याची खातरजमा करणे अगर त्या बाबतची आवश्यक ती कार्यवाही केली आहे किंवा नाही हे पहाणे सर्व संचालक मंडळ सदस्यांचे कर्तव्य होते .अपचारी २ते १८ यांनी यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये सभेचो वृत्तांत खोटा आहे असे नमुद केलेले आहे तर त्या सर्वांनी सदर ठरावाविरुद्ध दाद का नाही मागितली?आता चौकशीच्यावेळी मात्र या कृत्यास जबाबदार असल्याचे आरोप करीत एकमेकांविरुद्ध आहेत.

अपचारी क्र.१९ श्री. सुरेश काळे यांचे वकील ॲड .कानेटकर यांनी युक्तिवादावेळी " मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांनी संदर्भ क्र. १ चे जे आदेश काढलेले आहेत त्या आदेशान्वये संचालक मंडळाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व त्याखालील नियम , बँकींग रेगुलेशन ॲक्ट १९४९ , व बँकेचे उपविधी यानुसार त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली नाही. तसेच रोखे खरेदी व्यवहारामधील रुपये ५.६५ कोटी इतक्या रकमेचे रोखे बँकेस प्रत्यक्ष मे. होम ट्रेड यांचेकडून मिळालेली नाहीत. व त्याबाबत बँकेच्या संचालक मंडळाने पुरेशी दक्षता घेतलेली नाही असे संदर्भ क्र. १ च्या आदेशात मा. सहकार आयुक्त यांनी नमूद केलेले आहे",असा युक्तिवाद केला आहे. तथापि सदर आदेशाचे अवलोकन केले असता त्यामध्ये पुढे असेही नमूद केल आहे की," बँकेच्या संचालक मंडळाने केलेल्या

347

(641)

विविध कर्ज रोखे प्रकरणांतील आर्थिक गैरव्यवहार व आर्थिक नियमितता यामुळे सदर आदेशामध्ये नमूद केलेल्या बँकेच्या झालेल्या आर्थिक नुकसानीस बँकेच्याकोणकोणत्या व्यक्ति जबाबदार आहेत व या जबाबदार व्यक्तिकडून बँकेस झालेल्या नुकसानीची रक्कम व्याजासह वसून करणेसाठी "प्रस्तूत आदेश पारित केलेले आहेत .सबब अड. कानेटकर यांचे "या व्यवहारास केवळ संचालक मंडळ जबाबदार आहेत "हे जे म्हणणे आहे ते चुकीचे आहे. ॲड. कानेटकर यांनी पुढे असेही म्हटले आहे की, "तत्कालीन प्राधिकृत अधिकारी यांनी नियम ७२(३) अन्वये आरोपपत्र जारी केलेली नाही". मात्र य। जारी केलेल्या आरोपपत्राविरुद्ध श्री.सुरेश काळे यांनी दाद मागावयास हवी होती. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३(१)(अब) मध्ये देखील संस्थेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये संचालक मंडळ एकत्रित व संयुक्तीक रित्या जबाबदार असते अशी तरतूद आहे. तथापि,सरव्यवस्थापक श्री. सुरेश काळे यांनी संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये जे निर्णय घेतले जात होते त्यावेळेस रिझर्व बँकेची परिपत्रके यानुसारच एसजीएल मोडमध्ये गुंतवणूक करणे आवश्यक आहे असे कोठेही सांगीतल्याचे अगर अभिप्राय दिल्याचे टिपण दिसून येत नाही. ॲड. कानेटकर यांनी श्री. सुरेश काळे हे बँकचे मुख्य कार्यकारी अधिकारी नव्हते असा युक्तीवाद केला आहे. मात्र श्री. सुरेश काळे यांना बँकेने दि.२५/११/१९९९ रोजीच्या बँकेचे सरव्यवस्थापक म्हणून नेमणूकीबाबतचे जे पत्र दिलेले आहे (त्याची प्रत ॲड.कानेटकर यांनी सुनावणीवेळी सादर केली आहे),त्या नेमणूकीच्या पत्रामध्ये अटी व शर्ती नमूद केलेल्या आहेत. यासाठी बँकेचे पोटनियमातील तरतुदी विचारात घेणे महत्वाचे ठरते. बँकचे पोट नियम क्र. २ (८) मध्ये अशी तरतुद आहे की, "मुख्य कार्यकारी अधिकारी (चीफ एक्झीक्यूटिव्ह ऑफीसर) म्हणजे संचालक मंडळाने कार्यकारी संचालक म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती. कार्यकारी संचालक नेमलेला नसेल तर संचालक मंडळाने सरव्यवस्थापक, व्यवस्थापक, किंवा सचिव म्हणून नेमलेली व्यक्ति बँकेची मुख्य कार्यकारी अधिकारी असेल." श्री. काळे यांची नेमणूक ही सरव्यवस्थापक म्हणून जरी केली असली तरी पोटनियम क्र. २(८) नुसार श्री. काळे हेच मुख्य कार्यकारी अधिकारी होते. पोटनियम क्र.४० प्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदारी पार पाडण्याची जबाबदारी श्री. काळे यांची होती. रोखे खरेदीबाबतच्या संचालक मंडळाच्या सर्व बैठकांमध्ये फिजीकल मोडमध्ये रोखे खरेदी करण्याबाबतचे जे ठराव पारित केलेले आहेत त्यास सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी कोठेही विरोध केलेला नाही अगर त्याबाबतचे विरोधाचे टिपण संचालक मंडळाच्या सभांमध्ये अगर बँकेच्या निबंधकांकडे सादर केलेले नाहीत. बँकेच्या पोटनियमानुसार पोटनियम क्र. ४० नुसार श्री. काळे यांच्यावर जबाबदाऱ्या सोपविलेल्या आहेत.त्यामध्ये क्र. ४०(२), ४०(१०) या नुसार सरव्यवस्थापक श्री.काळे यांनी त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारी पार पाडणे आवश्यक होते, क्रमप्राप्त होते. श्री. काळे हेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणूनच काम पहात होते. ते पोटनियमानुसार संचालक मंडळाचे पदसिद्ध (Ex-Officio) सदस्य होते. याबाबत बँकेने सादर केलेल्या कागदपत्रांन्वये रिझर्व बँकेशी व

(Book 1 & 2) Computer Generated Page 446 of 484

इतर कार्यालयांशी त्यांनी व्यवहार केलेला आहे. त्यामुळे बँकेच्या आर्थिक नुकसानीस ते ही जबाबदार आहेत. श्री. काळे यांनी आरबीआय परिपत्रकाचे उल्लंघन होत आहे याबाबत संचालक मंडळांच्या सभांमध्ये लेखी / तोंडी विरोध केल्याचे दिसून येत नाही .त्याबाबतचे विस्तुत टिपणही संचालक मंडळापुढे ठेलेले दिसून येत नाही. केवळ कान्ट्रक्ट नोटवर सहया नाहीत, संचालक मंडळाने रोखे खरेदी व्यवहाराचे ठराव पारित केलेले आहेत म्हणून सरव्यवस्थापक श्री.काळे या आर्थिक नुकसानीस जबाबदार नाहीत, हे ॲड.कानेटकर यांचे जे म्हणणे आहे ते निश्चितच चुकीचे आहे. बँकेने या सर्व व्यवहारांची चौकशी करण्यासाठी ॲड. फटाले यांची चौकशी अधिकारी म्हणुन नेमलले होते व त्यांचा अहवाल बँकेचे वकील ॲड. खुर्जेकर यांनी युक्तिवादावेळी सादर केलेला आहे. सदर अहवालामध्ये "श्री काळे यांनी त्यांच्यावर पोटनियमानुसार जी जबाबदारी होती ती पार पाडलेली नाही ". सदरच्या अहवालामध्ये श्री. काळे यांना दोषी धरलेले आहे. सदर अहवालामध्ये "रोखे खरेदी गैरव्यवहार प्रकरणी रिझर्व बँकेचे परिपत्रक, नियम माहिती असूनही रोखे व्यवहार फिजीकल स्वरुपात होवू नये म्हणून कोणतीही पावले उचलेली नसल्यामुळे बँकेच्या रुपये ५.६५ कोटी या रकमेच्या नुकसानीमध्ये त्यांनी त्यांच्या जबाबदारीचे पालन न केल्यामुळे ते ही जबाबदार आहेत" असे मत चौकशी अधिकारी श्री फटाले यांनी नमूद केलेले आहे. सदरच्या अहवालास श्री. काळे यांनी कोणत्याही न्यायालयात आव्हान दिल्याचे अगर सदरचा अहवाल कोणत्याही न्यायालयाने रद्बादल ठरविलेला आहे.या बाबत श्री.काळे यांनी काहीही म्हटलेले नाही.

अपचारी प्रवर्तक क्र.१ श्री. काळोखे यांचे वकील ॲड. क्षीरसागर यांनी युक्तिवादावेळी असे सांगीतले आहे की, बँकचे अध्यक्ष हे सभेचे इतिवृत्त लिहीत नाहीत .हा बचाव निश्चितच चुकीचा आहे.श्री.काळोखे यांची ॲड.खुर्जेकर यांनी जी उलटतपासणी घेतली आहे त्यावेळी "सरकारी कर्जरोखे गुंतवणुकीबाबत मला अध्यक्ष म्हणुन कोणीही माहीती देत नव्हते.सदरची माहीती सरव्यवस्थापक यांनी मला देणे अपेक्षीत होते मला दिली नाही."असे सांगीतले आहे.हे बॅकेचे अध्यक्ष कसे म्हणु शकतात.त्यांना माहीती देत नव्हते तर त्यांनी कारवाई का केली नाही.संचालक मंडळाच्या सभांमध्ये जे निर्णय घेतलेले आहेत, ते संचालक मंडळाच्या बैठकांमध्ये ठराव पारित करुन सर्वानुमते घेण्यात आलेले आहेत. हे संचालक मंडळांच्या सभांच्या इतिवृत्तावरुन स्पष्ट दिसुन आलेले आहे. श्री. काळोखे यांचे वकील ॲड.क्षीरसागर यांनी युक्तिवादाचे वेळी असे सांगीतले आहे की, संचालक मंडळाच्यासभेमध्ये रोखे गुंतवणूकीबाबतचा निर्णय घेतलेला आहे. संचालक मंडळाच्या दि.३०/०४/२००१ च्या सभेमध्ये सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री बाबतचे निर्णय घेण्याचे सर्वाधिकार अध्यक्ष व सरव्यवस्थापक यांना देण्यात आले आहेत व कार्योत्तर मंजूरीसाठी संचालक मंडळ सभेपुढे ठेवण्यात यावेत असा ठराव पारित करण्यात आलेला आहे. सदर ठराव तदनंतरच्या सभांमध्ये तो कायम केला आहे. दि.०५/०९/२००१ च्या सभेमध्ये देखील सरकारी कर्ज रोख्यामध्ये केलेल्या गुंतवणूकीची नोंद घेवून त्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या सभेतदेखील कार्योत्तर मंजूरी व माहितीसाठी संचालक मंडळाच्या सभेपुढे ठेवण्यात यावेत असाही निर्णय घेण्यात

अधिकृत अधिकारी

349

आलेला आहे. दि.२४/०१/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये देखील सरकारी कर्ज रोखे गुंतवणूकीस संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे. दि.११/०२/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये देखील विषय क्र. १३ ने सरकारी कर्ज रोखे खरेदी विक्री गुंतवणूक खरेदी विक्रीस सर्वानुमते मान्यता देण्यात आलेली आहे व सदर सभेच्या ठरावामध्ये मे. होम ट्रेड लि. यांचे मार्फत फिजीकल मोडमध्ये रोखे खरेदी केलेले आहेत. दि.०५/०३/२००२ च्या सभेमध्ये देखील विषय क्र. ३ च्या ठरावान्वये सरकारी कर्ज रोखे गुंतवणूकीमध्ये खरेदी विक्री व्यवहाराची नोंद घेवून त्यास सर्वानी मान्यता दिल्याचे दिसून येते. या संचालक मंडळाच्या सभमध्ये मे. होम ट्रेड लि. यांचेकडून फिजीकल मोडमध्ये रोखे खरेदी केलेली आहेत. दि. ११/०३/२००२ रोजीच्या संचालक मंडळ सभेत देखील रोखे खरेदी विक्री बाबतची माहिती तयार करुन कार्योतर मंजुरीसाठी संचालक मंडळ सभेमध्ये मांडण्यात यावी असे ठरविण्यात आलेले आहे. दि.२६/०३/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये विषय क्र.४ नुसार " ७.५०% GOI२०१० हा कर्ज रोखा फिजीकल फॉर्ममध्ये खरेदी करण्याचे ठरविण्यांत आलेले आहे .सदर कर्ज रोखा फिजीकल फॉर्ममध्ये प्रचलित बाजार भावापेक्षा किफायतशीर किंमतीमध्ये मिळत असल्याने नफा क्षमता वाढणार असल्याने व सदर प्रस्ताव मे. होम ट्रेड या पार्टीने बँकेस मांडल्याने सदर पार्टीकडून किफायतशीर दरात वरील कर्ज रोखा खरेदी करावा असे सर्वानुमते ठरविण्यात आलेले आहे "असा ठराव पारित केलेला आहे. दि. ०६/०४/२००२ च्या संचालक मंडळ सभेमध्ये विषय क्र. ३ हा "सरकारी कर्ज रोखे गुंतवणूक खरेदी विक्रीस मान्यता देणे "असा विषय असून सदरच्या सभेमध्ये" जो ७.५०%GOI २०१०, रु.५,६५,००,०००/- हा कर्ज रोखे फिजीकल मोडमध्ये मध्ये घेतल्याने सदर रोख्याची कागदपत्रे लवकर मागून घ्यावीत" असा ठराव करण्यात आलेला आहे असे इतिवत्तामध्ये नमुद केलेले आहे. अपचारी क्र.२ ते १८ यांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रामध्ये दि.२६/०३/२००२ रोजीच्या सभेचा अजेंडा नव्हता असे नमूद केलेले आहे.जर अजेंडा नव्हता तर ती सभा बेकायदेशीर ठरविणेसाठी या अपचारी प्रवर्तकांनी दाद का नाही मागीतली? अगर निबंधकास का कळविले नाही.?हे प्रश्न उपस्थित होतात. रिझर्व बँकेच्या दि.१९/०४/२००१,९/८/२००१,२२/१०/२००१ रोजीच्या परिपत्रकानुसार सरकारी गुंतवणूकीमधील रोखे खरेदी ही फिजीकल मोडमध्ये न करता एसजीएल मोडमध्ये खरेदी कराव्यात अशा सूचनांचे या उपरोक्त नमुद सर्व अपचारी प्रवर्तक क्र.१ ते १९ यांनी उल्लंघन केलेले आहे. या त्यांच्या या कत्यामुळे बॅकेस झालेल्या नुकसानीस उपरोक्त नमुद सर्व अपचारी प्रवर्तक क्र.१ ते १९ जबाबदार आहेत.

बॅकेने रोखे घोटाळा झाल्याचे लक्षात आल्यावर बॅकेने दि.२२/४/२००२ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये ठराव पारीत करुन सदरच्या व्यवहाराबाबतची चौकशी करण्याकरीता श्री.शंकरराव सुर्यवंशी व चार्टर्ड अकौटंट श्री शेखर साने यांची व्दिसदस्य समिती नेमलेली होती. त्याबाबतच्या ठराबाची प्रत व त्या समितीच्या अहवालाची प्रत बॅकेने सादर केलेली आहे. मात्र श्री .शंकरराव सुर्यवंशी यांची ॲड. कानिटकर यांनी उलट तपासणी घेतली त्यावेळेस" संचालक

350

